शनिवार । २९ ऑगस्ट १९८१ । एक रुपया

# माणूस



हरित क्रांतीचे
जनक
डॉ.नॉर्मन बोरलॉग
परिचयलेख
पृष्ठ–८

## उद्योगनगरी मुंबई

# संप, टाळेबंदी, हिंसाचार आणि डॉ. दत्ता सामंत

'कोणत्याही परिस्थितीत डॉ. दत्ता सामंत यांना अटक करायचीच असा चंगच पोलिसांनी आज बांधला होता असे दिसते. मात्र सायंकाळपर्यंत डॉ. सामंत यांनी पोलिसांना गुंगारा दिला.

काल मध्यरात्रीपासूनच डॉ. सामंत यांचा ठावठिकाणा पोलीस शोधत होते. बिनतारी संदेश यंत्रणेवरून त्याविषयी विचारपूस चालू होती. एखाद्या फार मोठ्या गुन्हेगाराला पकडण्याची तयारी करावी, तशीच ही जय्यत तयारी वाटत होती.

सायंकाळी पाच वाजता डॉ. सामंत मोटारीतून शिवाजी पार्कला आले. तेव्हा त्यांना पकडण्यासाठी पोलीस अक्षरशः धावले. परंतु डॉ. सामंत यांनी त्यांना खुणेनेच थांबविले व ते स्वतःच हसत हसत पोलीस चौकीत शिरले. ते म्हणाले, 'अहो कशाला काळजी करता? पोलिसांचे रीतीरिवाज मला नीट ठाऊक आहेत!' (महाराष्ट्र टाइम्स, २५ जून १९८१)

मुंबईच्या शिवाजी पार्कवर डॉ. दत्ता सामंत यांचा भव्य मेळावा शासनाने दंडुकेशाहीच्या बळावर हाणून पाडला. २४ जूनला घडलेल्या

→

या घटनेला सर्व वर्तमानपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली. मुंबईच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेली ही बॉक्स कोणाचंही लक्ष चटकन वेधून घेत होती. मुंबईच्या कामगार जगतात तर या घटनेने मोठी खळबळ माजवून दिलीच, पण गेली पाच-सात वर्षं या क्षेत्रात जाणवणाऱ्या अस्वस्थततेला एक नवं स्फोटक वळण या घटनेमुळे मिळालं. ठाणे-बेलापूर पट्ट्यात डॉ. सामंतांच्या युनियन्स असलेले सर्व कारखाने फटाफट बंद झाले. डॉक्टरांची सुटका झाल्याशिवाय काम सुरू होणार नाही, असाही कामगारांनी जाहीर करून टाकलं. अर्थात डॉ. सामंतांनी स्वतःच या कृतीला विरोध दर्शविल्यामुळे चार-पाच दिवसांनी कारखाने पुन्हा सुरू झाले. पण वातावरणातील अस्वस्थता कमी झाली नाही. त्यातच मुंबईच्या उच्च न्यायालयाने डॉ. सामंतांची अटक बेकायदेशीर ठरवूनही शासनाने त्यांना फेरअटक केली. वातावरणातला तणाव पुन्हा वाढला. पुन्हा कारखाने बेमुदत बंद झाले. पुन्हा कोर्टात खटला उभा राहिला. याही वेळी कोर्टाने सामंतांना मुक्त करण्याचा आदेश दिला. आता मात्र शासनाने शहाणपण दाखवलं. त्यामुळे सध्या मुंबईचं औद्योगिक जगत सुरळीत चालू झाल्यासारखे वाटते आहे. पण गेल्या आठ-दहा वर्षातील औद्योगिक घडामोडी लक्षात घेता ही शांतता कितपत आणि कुठवर टिकेल, याविषयी शंकाच आहे. मुंबईच्या या ख्यातनाम क्षेत्रावर हिंसाचाराची पुटं आणि छटा दिवसेंदिवस वाढतच आहेत. म्हणून मुद्दाम मुंबईतल्या काही कामगार-नेत्यांच्या खास भेटी घेऊन या घडामोडींवर चर्चा केली. बहुतेकांनी या घटनांबद्दल खेद व्यक्त केला. याला आळा घालण्यासाठी काही उपायही सुचवले.

¤

मुंबईतल्या कामगार क्षेत्राचे आजचं चित्र पाहिलं तर डॉ. दत्ता सामंतांच्या कारकीर्दीचा आढावा घेतल्याशिवाय ते पूर्ण होऊच शकत नाही. पण मी मुंबईत गेलो त्यावेळी डॉ. सामंत तुरुंगात होते. त्यामुळे त्यांची भेट होणं शक्यच नव्हतं. म्हणून त्यांच्या बरोबरीने या लढ्यात समरस झालेल्या त्यांच्या पत्नी सौ. विनिता सामंत व युनियनच्या इतर प्रमुख कार्यकर्त्यांची भेट घेतली.

अर्थात त्या काळात ही सर्वच माणसं अशा प्रचंड मानसिक दबावाखाली होती की त्यांना बोलतं करणं फार कठीण काम होतं. 'मुंबई सकाळ'चे वार्ताहर नागेश सामंत यांनी हे काम एका फोनवर करून टाकलं. त्यांचं आणि डॉ. सामंतांचं नातं नाही; असलंच तर एवढंच की, डॉक्टरांची संपूर्ण चळवळ श्री. सामंतांनी गेली दहा-बारा वर्षं जवळून पाहिली आहे, त्याबाबत वेळोवेळी डॉक्टरांशी चर्चा केली आहे, प्रसंगी सडतोड टीकाही केली आहे.

श्री. सामंतांबरोबर डॉक्टरांच्या घाटकोपर येथील घरी गेलो तेव्हा सकाळचे साडेनऊ वाजले होते. त्या दिवशी सकाळपासूनच पावसाने सततधार धरली होती. मध्य रेल्वेच्या लोकलसचं वेळापत्रक पार कोलमडलं होतं. सायन ते कुर्ला स्टेशनाच्या दरम्यान चार लोकल गाड्या एकामागे एक उभ्या होत्या. अनेकजण या त्रासाला कंटाळून रेल्वे रूळावरून पायीच निघाले होते.

डॉक्टरांच्या संघटनेचा मुंबईत आज असणारा दबदबा लक्षात घेता त्यांचं घरही आलिशान असेल असं उगाचच वाटत होतं. पण प्रत्यक्ष पाहिल्यावर हा भ्रमाचा भोपळा फुटला.

बाहेरच्या गैरेजवजा खोलीमध्ये विनिताबाई कार्यकर्त्यांशी काही तरी चर्चा करत होत्या. त्या स्वतःही डॉक्टर आहेत. पण केवळ त्यामध्येच न रमता मुंबई महापालिकेमध्ये कॉंग्रेस-आयच्या नगरसेविका म्हणूनही त्या प्रभावीपणे काम करत आहेत.

आम्ही गेल्यावर विनिताबाई झटकन पुढे आल्या. घरातल्याच डॉक्टरांच्या कार्यालयात आम्ही गेलो. कार्यालय म्हणजेही एक छोटीशी खोलीच होती. तिथे पाच-सात खुर्च्या दाटीवाटीने मांडलेल्या होत्या. विनिताबाईंच्या पाठोपाठ युनियनचे काही कार्यकर्तेही आले. आमची मुलाखतीला सुरुवात झाली.

वैद्यकीय पेशा स्वीकारलेले सामंत कामगार जगताकडे कसे वळले, हे सांगताना सौ. विनिताबाई म्हणाल्या, 'बालरोगशास्त्राचे तज्ज्ञ असलेल्या डॉक्टरांनी १९६०-६१ साली वैद्यकीय व्यवसायाला प्रारंभ केला. त्यावेळी ते सायकलवरून सर्वत्र पेशंट तपासण्यासाठी जात असत. अशीच भ्रमंती चालू असताना असलफा या खेड्यातील खाणीत काम करणाऱ्या कामगारांशी डॉक्टरांची भेट झाली. ही माणसं, त्यांचे कुटुंबीय वारंवार आजारी पडत आणि डॉक्टर त्यांच्यावर औषधोपचार करत असत. त्यांच्या घरी काही वेळा डॉक्टर व्हिजिटसाठी गेले तेव्हा डॉक्टरांच्या असं लक्षात आलं की, खाणीच्या मालकांकडून होत असलेल्या पिळवणुकीमुळे या कामगारांची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय होती. विविध रोगांनी त्यांना पोखरलं होतं. अज्ञान-अडाणीपणाने त्यामध्ये अधिकच भर टाकली होती. हे सर्व लक्षात आल्यावर डॉक्टरांनी त्या कामगारांना


# साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : तेरावा

२९ ऑगस्ट १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

संघटित करणं सुरू केलं. त्यांच्यामध्ये उत्साह आणि परिस्थितीविरुद्ध लढण्याची शक्ती निर्माण केली डॉक्टरांचं हे काम खाण-मालकांच्या लक्षात आल्यावर एकदा खाण-मालकानी त्याना बेशुद्ध पडेपर्यंत मारहाण केली. पण डॉक्टरानी आपलं काम सोडलं नाही. इथूनच डॉक्टरांच्या कामगार क्षेत्रातील कार्यास प्रारंभ झाला.

'पुढे, १९६७ साली डॉक्टर विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले व त्यांच्या सामाजिक कार्याला जास्तच वेग आला. विधानसभेत डॉक्टरानी खाण-कामगारासाठी किमान वेतनविषयक कायदा पास करून घेतला. त्यामुळे इतर उद्योगक्षेत्रातील कामगारांचेही लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. 'डॉक्टरांनी फत्तर फोडणाऱ्यांना एवढ मिळवून दिलं तर आपल्याला किती मिळवून देऊ शकतील,' या अपेक्षेनं एकापाठोपाठ एक कामगार युनियन डॉक्टरांकडे नेतृत्वाची मागणी करत येऊ लागल्या. भांडुपची ए. पी. आय. कंपनी, गोदरेज कंपनी इत्यादी ठिकाणी डॉक्टरांनी कामगारांना न्याय मिळवून दिला आणि कामगार क्षेत्रात डॉक्टरांचं स्थान पक्कं झालं.

'आजपर्यंत कोणत्याही कामगार संघटनेचं नेतृत्व घेण्यासाठी डॉक्टर स्वतः कधी उठून गेले नाहीत. कामगारांनीच त्याना खेचून नेलं. कोणतीही नवी युनियन डॉक्टराकडे नेतृत्वासाठी आली की डॉक्टर त्या कामगारांचे प्रश्न नीट समजावून घेतात. तसंच त्या युनियनमधले ऐंशी ते नव्वद टक्के कामगार एकजुटीने उभे असतील तरच त्यांचे नेतृत्व करण्यास डॉक्टर मान्यता देतात. कारण, कामगारांमध्ये एकजूट नसल्यास फक्त संघर्ष वाढतात आणि तुकडे पडत जातात, असं त्यांचं मत आहे.

'श्रमजीवी कामगाराना त्यांच्या श्रमांचा योग्य वाटा मिळाला पाहिजे व त्या दृष्टीने कोणत्याही कामगार संघटनेचं नेतृत्व स्वीकारल्यावर तिथे अपेक्षित 'आर्थिक बदल' घडून येणार असेल तरच आपण पुढे झालं पाहिजे, असं डॉक्टरांचं स्वच्छ मत आहे. त्यामुळे कोणत्याही कामगार संघटनेचं नेतृत्व स्वीकारण्यापूर्वी ते गुप्त पद्धतीनं मतदान घ्यायला लावतात व मगच त्या युनियनला संलग्नता दिली जाते कारण असा आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी कामगार वर्गाची एकजूट अतिशय आवश्यक असते, असं त्यांना वाटतं.'

डॉ. सामंतावर त्यांच्या टीकाकाराकडून घेण्यात येणाऱ्या आक्षेपांपैकी एक मुख्य आक्षेप म्हणजे, आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी ते कोणत्याही भल्या-बुऱ्या मार्गाचा अवलंब करण्यास मागे-पुढे पहात नाहीत. विशेषतः हिंसक हल्ल्याद्वारे दहशत निर्माण करून कारखान्याच्या व्यवस्थापनावर दबाव आणणं हे कामगार आंदोलनात त्यांचं एक मुख्य हत्यार असतं. या संदर्भात सौ. विनिताबाईंना विचारलं तेव्हा त्या एकदम उसळून म्हणाल्या,

'कामगार क्षेत्रात डॉक्टर लोकप्रिय होऊ लागल्यावर साहजिकच मालक वर्गाला त्याचा त्रास होऊ लागला. त्यामुळे त्यांनीच निरनिराळ्या मार्गांनी डॉक्टरांच्या संघटनेतल्या कामगारांना त्रास द्यायला सुरुवात केली. कित्येकदा कारखान्याशी काहीही संबंध नसलेल्या बाहेरच्या लोकांना भरीला घालून आमच्या कामगाराना गंभीर मारहाण करण्याचे प्रकार घडले. आमच्या संघटनेच्या कामगाराकडून आजपर्यंत एकदाही हिंसक मार्ग अवलंबिण्यात आलेले नाहीत. महात्मा गांधीप्रमाणे शांततामय, अहिंसात्मक, सनदशीर आंदोलनावर आमचाही विश्वास आहे. डॉक्टर आले की कंपन्या बंद पडतात असा ओरडा केला जातो, पण त्याना डॉक्टरकी सोडून या क्षेत्रात पडावं लागलं याला सध्याची परिस्थितीच जबाबदार आहे. आज कोणीही कामगारांची स्वच्छपणे बाजू घेऊन भांडत नाही, म्हणून डॉक्टराना त्याच्यासाठी उभं राहावं लागलं आहे.'

सौ. विनिताबाईंचं हे सगळं बोलणं ऐकत असताना एका गोष्टीचं सारखं कुतूहल वाटत होतं. स्वत ही डॉक्टर असणारी ही बाई या सामाजिक क्षेत्रात कशी काय पडली? त्यांचं उत्तर देताना विनिताबाई म्हणाल्या,

## महापालिकेचं व्यासपीठ...

'१९७२ सालापर्यंत माझा या क्षेत्राशी फारसा संबंध नव्हता पण त्या वर्षी डॉक्टराना गोदरेज प्रकरणी अटक झाली तेव्हा ते मला म्हणाले, 'मी आता तुरुंगात चाललो आहे, तेव्हा तू या क्षेत्रात उतर व आपलं काम पुढे चालव' त्यानंतर लगेच, १९७३ साली मी मुंबई महापालिकेची नगरसेवक म्हणून निवडून आले. गेल्या आठ नऊ वर्षात मी आमच्या परिसरात महिला मंडळ, लहान मुलांसाठी शाळा, खेळाची मैदानं, दवाखाने, झोपडपट्टयांची सुधारणा, शिवण वर्ग, पतपेढ्या इत्यादी उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत.

'मी पहिल्यापासून कॉंग्रेस-आयचीच सदस्य आहे मला विधान सभेवर जाण्यात फारसा रस नाही. कारण आपल्या भोवतालच्या परिसरात चांगल्या तऱ्हेने काम करण्यासाठी विधानसभेपेक्षा महापालिकेचंच व्यासपीठ जास्त उपयुक्त आहे, असं मला वाटतं.'

सौ. विनिताबाईंशी चाललेली आमची चर्चा भोवतालचे कार्यकर्तेही ऐकत होते. मधूनच त्यात सहभागीही होत होते. डॉ. सामंताकडे कामगार कशामुळं आकर्षित झाले, याचं स्पष्टीकरण करताना त्यांच्या युनियनचे एक प्रमुख कार्यकर्ते श्री. विद्याधर बुडबाडकर म्हणाले, 'कामगारांनी निव्वळ वेतनवाढीसाठी डॉक्टरांचं नेतृत्व स्वीकारलेलं नाही, त्यामागे असुरक्षिततेची भावना जास्त होती. डॉक्टर या क्षेत्रात उतरण्यापूर्वी आमच्या भागातील कारखानदारांनी सर्वत्र दहशतीचे वातावरण निर्माण केलं होतं संघटनेचं काम करणाऱ्यांना कामावरून काढून टाकलं जात असे. काही ठिकाणी त्याच्या बायकाची अब्रू लुटण्याचेही प्रकार घडू लागले होते. कामगारांच्या आर्थिक दुर्बलतेचा गैरफायदा घेऊन, थोडे पैसे देऊन त्यांची तोंड गप्प केली जात होती. मालक वर्गाच्या या कृत्यांमुळे या भागातला संपूर्ण कामगार लाचार आणि असुरक्षित बनला होता. यावर रामबाण उपाय म्हणजे डॉक्टराचं नेतृत्व, असं कामगाराना वाटू लागलं आणि त्यानी डॉक्टरांकडे धाव घेतली.

'कामगार डॉक्टराकडे गेले आणि डॉक्टरांनी ताबडतोब त्यांना संघटनेत सामील करून करून घेतलं, असं सहसा घडलं नाही. कित्येकदा त्यानी कामगारांना दोन-दोन, तीन-तीन वर्षं ताटकळत ठेवलं. ते कामगारांना म्हणायचे, 'तुमच्या मालकाचे हात वरपर्यंत पोचलेले आहेत. मी जर तुमच्यामध्ये आलो तर तुमच्या संसाराची वाट लागेल. पण कामगारही इरेला पडले होते.' ते लगेच उत्तर द्यायचे 'एवीतेवी आमच्या संसाराची वाट लागलीच आहे. तेव्हा तुम्ही अ त्याने तसा आणखी काय फरक पडणार आहे?'

□

श्री. एच. एम. पाटील हे डॉ. सामंतांच्या युनियनचे एक प्रमुख कार्यकर्ते डॉ. सामंत तुरुंगात गेल्यावर प्रक्षुब्ध कामगाराना शात ठेवण्यापासून तर हायकोर्टात सामंतांच्या खटल्यासाठी खेटे घालण्यापर्यंत विविध प्रकारची महत्वाची कामे श्री. पाटील पार पाडत होते. त्यांना भेटण्यासाठी 'मुबई सकाळ'चे वार्ताहर श्री. नागेश सामंत यानी फोन केला, तेव्हा पाटील गडबडीतच होते. दुसऱ्या दिवशी कोर्टाची तारीख होती. त्यामुळे त्यांनी आम्हाला तिथेच बोलावलं.

¤

गेले दोन दिवस पडत असलेल्या पावसाने आजही विश्राती घेतली नव्हतीच. सकाळपासून पाऊस कोसळत होता. साडेदहा-पावणेअकराच्या सुमाराला चर्चगेट स्टेशनच्या बाहेर पडलो तेव्हा अक्षरश. असंख्य मुबईकर हातातल्या छत्र्या सावरत आपापल्या ऑफीसांची वाट धरत होते. सर्व परिसर जलमय झाला होता. निरनिराळ्या आकारांच्या आणि रंगांच्या छत्र्यांखाली दडलेली माणसं पावसाचा मारा चुकवण्याचा प्रयत्न करत होती. त्यांच्या या प्रयत्नात सामील होऊन मीही मुबईच्या हायकोर्टाच्या दिशेने निघालो.

हायकोर्टाची इमारत पावसाने धुऊन निघाली होती. इमारतीच्या काळ्या दगडांचं राकटपण लांबूनही जाणवत होतं. का कुणास ठाऊक, या इमारतीकडे पाहताना डोळ्यांवर पट्टी बाधलेल्या आणि हातात तराजू घेतलेल्या न्यायदेवतेचं चित्र डोळ्यासमोर येत होतं

## डॉ. सामंतांचं सामाजिक कार्य

कामगार-चळवळीतील या कार्याबरोबरच डॉ. सामंतांनी खाण-कामगाराच्या वस्तीत शाळा सुरू केली. कुर्ला, विक्रोळी भाडूप, घाटकोपर, काजूपाडा, भटवाडी इत्यादी ठिकाणी त्यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून शाळा सुरू झाल्या. मुबईतल्या झोपडपट्ट्याच्या सुधारणांसाठी डॉ. सामंतानी सुरुवातीपासून काम केलं आहे, त्यासाठी त्यांनी बृहनमुबई झोपडीनिवासी व भाडेकरू महासघ स्थापन केला असून त्याद्वारे झोपडपट्टयामध्ये नळ, संडास, गटारे इत्यादी जीवनावश्यक सुविधा डॉ. सामंतानी मिळवून दिल्या आहेत. १९७१ साली घाटकोपरच्या पटेल चौकात त्यानी गरीब कुटुबासाठी अवघ्या १५०० रुपयात 'जनता कॉलनी' बाधून दिली. डॉ. सामंताच्या युनियनमार्फत कामगारांच्या वेल्फेअरकरता मात्र फारशी कामं झालेली नाहीत, हे सौ. विनितावाईच्या निदर्शनाला आणून दिलं असता त्या म्हणाल्या, 'हा आक्षप काही अशी खरा आहे. पण गेली सात-आठ वर्षं असंच चाललं आहे की, कामगारांसाठी एखादी विधायक योजना हाती घेण्याचं डॉक्टरांनी ठरवलं की, नेमकी कुठल्या तरी कामगार लढ्याच्या संदर्भात त्यांना अटक होते आणि योजना मागे पडते. आपलं वैद्यकीय ज्ञान व अनुभव याचा उपयोग करून कामगारांसाठी उत्कृष्ट रुग्णालय सुरू करावं, असं डॉक्टरांच्या मनात गेली काही वर्षं घोळत आहे. पण १९७२ सालापासून त्यांच्यामागे सारखं जेल लागल्यामुळे ही योजनाही अजून साकार होऊ शकलेली नाही.' ¤

कोर्टाच्या आवारात जिकडे पाहावे तिकडे काळे डगले घातलेली वकील मंडळी दिसत होती. बहुतेकाच्या हातात जाडजूड फायली-कागदपत्रं, अंगावर घोळदार झगे. जो तो आपल्या परीने रुबाबदारपणे चालण्याचा प्रयत्न करत होता. 'आक्रोश'मधला भास्कर कुलकर्णी मात्र कुठेच दिसत नव्हता.

¤

न्यायमूर्ती डी. एम. रेगे व न्यायमूर्ती डी. एन. मेहता यांच्या बेंचसमोर सुनावणी सुरू झाली होती. डॉ. सामंतांना अकोल्याच्या जेलमधून मुबईला आणल्यास मुबईच्या औद्योगिक क्षेत्रातील शाततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्यांना मुबईत आणू नये, असा अर्ज शासनातर्फे सादर करण्यात आला होता. डॉ. सामंतांच्या वतीने बॅ. रजनी पटेल यानी बाजू मांडली. एक कट्टर उजवा भाडवलदार कामगार-नेत्याचं वकीलपत्र घेऊन उभा राहिल्याचं हे दृश्य अनोखं होतं. अॅडव्होकेट धन कँटीनवाला बॅ. पटेलांचे सहाय्यक होते. शासनाचा अर्ज न्यायमूर्तींनी अर्ध्या तासातच फेटाळून लावला. त्यानंतर डॉ. सामंताचे दोन सहकारी श्री. श्रीरंग पाटकर आणि श्री. भास्कर तळेकर याच्या स्थानबद्धतेला आव्हान देणारे रीट अर्ज दाखल करून घेण्यात आले आणि कोर्टाचं कामकाज संपलं.

बॅ. पटेल बाहेर पडले. त्याच्या पाठोपाठ डॉ. सामंतांचे काही कार्यकर्तेही निघाले श्री. एच. एम. पाटील यांना गाठलं, पण तेही गडबडीत होते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी डॉ. सामंताच्या घाटकोपर येथील कार्यालयात भेटण्याचं ठरवून आम्हीही निघालो.

¤

दुसऱ्या दिवशी सकाळी युनियनच्या कार्यालयात गेलो. श्री. पाटील होतेच. डॉ. सामंताच्या अटकेच्या निषेधार्थ कामगारांनी कारखान्यावर टाकलेला बहिष्कार मागे घेण्यात आल्याचे त्या दिवशी सर्व वर्तमानपत्रांमध्ये जाहीर झाले होते. पण वृत्तपत्रांतल्या बातमीवर कामगाराचा विश्वास नव्हता. त्यामुळे युनियनच्या कार्यालयात कार्यकर्त्यांचे सारखे फोन येत होते. श्री. पाटील याच्याकडून दुजोरा मिळाल्यावरच कारखाने सुरू करण्याचे निर्णय घेतले जात होते

डॉ. सामंत म्हटलं की, कोणाच्याही डोळ्यासमोर 'गोदरेज' आणि 'प्रिमियर' ही दोन नावं येतात. त्यामुळे या दोन्ही कारखान्यांच्या आंदोलनांमध्ये डॉ. सामंतानी मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडवून आणल्याचा आरोप त्याच्यावर केला जातो. त्यामुळे त्या घटना घेऊनच श्री पाटील यानी बोलायला सुरुवात केली.

'१९७२ मध्ये गोदरेज कारखान्यामध्ये काही हिंसक प्रकार घडले. तेथील कॉलनीत राहणाऱ्या कुटुंबावरही हल्ले झाले. पण हे घडत असताना डॉक्टर तिथे नव्हतेच. ते कुठे तरी दुसऱ्याच कारखान्यामध्ये गेटमिटिंग घेत होते. त्यामुळे या सर्व प्रकारचा त्यांना पत्ताही नव्हता.

१९७६ साली डॉक्टरांनी गोदरेज कारखान्यामध्ये फक्त एक गेट मीटिंग घेतली होती. पण आमची युनियन तोडण्याचे प्रयत्न एक असंतुष्ट गट करत होता. त्यामुळे उद्योगपती गोदरेज यांच्यावरील हल्ला आणि पोलीस-अधिकाऱ्याचे खून या प्रकरणांशी आमचा

मलपृष्ठ १ वर

उत्तरमीमांसा : २० : । स. शि. भावे

# दलितांची दोन हजार वर्षांची नरकपुरी धर्मांतराने सुटणार नाही तर धर्मभावनेच्या समूळ त्यागानेच सुटेल !

'समजा हा देश मुस्लिम झाला तरी दलिताचे काय नुकसान होणार आहे?'

गेले काही दिवस हा प्रश्न मला अस्वस्थ करतो आहे.

प्रा. विलास वाघ यानी एका चर्चेत विचारलेला हा प्रश्न. (वृत्तान्त : 'केसरी', १५-८-८१).

ते पुढे म्हणाले, 'येथल्या नरकपुरीतून सुटण्यासाठी धर्मांतर आहे. धर्मांतरामुळे दलितात स्वाभिमान निर्माण होतो. एक वेळ मुसलमान बदलतील पण हिंदू बदलणार नाहीत.'

मला वाटले, वाघांची ही तीन विधाने उलट सुलट तपासून पाहिली तर, 'दलिताचे काय नुकसान होणार आहे? या प्रश्नाला उत्तर मिळू शकेल.

'एक वेळ मुसलमान बदलतील पण हिंदू बदलणार नाहीत'–हे विधान वास्तव म्हणता येणार नाही. हमीद दलवाईंनी, बदलण्याच्या शक्तीबद्दल हिंदुधर्मीयांचे वारंवार, जाहीर भाषणांतून, अभिनंदन केलेले आहे. 'हिंदुत्व नाकारणारे हिंदूतच निघाले. हे हिंदू परंपरेचे सामर्थ्य आहे', असे हमीद म्हणत असे. इतिहासातील आधारावर हमीदचे विधान उभे आहे.

मुसलमानी श्रद्धा ही अशी बदलणारी नाही. तत्वतःच ती श्रद्धा अपरिवर्तनीय आहे. इतिहासातही ती तशीच राहिली आहे. इराण, ईजिप्त, यांसारख्या समृद्ध संस्कृतीचे देश मुसलमानांनी इतिहासकाळात काबीज केले, पायदळी तुडविले. या परस्पर व्यवहारात या दोन महान सस्कृतीकडून मुसलमानांनी काहीही घेतले नाही. अशा पार्श्वभूमीवर, 'मुसलमान बदलतील' अशी आशा वाघाना खरोखरीच वाटते का?

'धर्मांतरामुळे दलितात स्वाभिमान निर्माण होतो.' हे वाघाचे आणखी एक विधान.

वाघसाहेब, हे तरी वास्तव आहे का? 'जन्माने मिळालेल्या धर्मात, अगर पूर्णपणे धर्मनिरपेक्ष भूमिकेवर, ज्या सामाजिक गटाना स्वाभिमान अनुभवता येत नाही, अशा गटाची, धर्मांतरानंतर नव्या धर्मात ससेहोलपटच होते, अशी आजवरच्या सामुदायिक धर्मांतरांची साक्ष आहे.

भारतातले सध्याचे बाटलेले मुसलमान यांचे धर्मांतर होऊन सहाशे ते हजार वर्षे झाली. पण अस्सल तुर्की परंपरा सागणारे मुसलमान या धर्मांतरितांना अजूनही कमीपणा देऊनच वागवतात. सर फेरोजखान नून, लियाकत अली, याचेपुढे, सध्याच्या पाकिस्तानचे निर्माते, कायदेआझम जिनांना धार्मिक शुद्धतेच्या मुद्यावर नेहमीच कमीपणा घ्यावा लागत असे. अशा परिस्थितीत, धर्मांतराने नवा स्वाभिमान निर्माण होईल व नव्या धर्मात नव्या स्वाभिमानाचा गौरव होईल, ही आशा फोल आहे.

पंचवीस वर्षापूर्वीचाच इतिहास पाहू. बौद्ध धर्माचा स्वीकार करून आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दलितांसाठी खऱ्या ज्ञानाचा, खऱ्या स्वाभिमानाचा मार्ग खुला करून दिला होता.

पण त्यांच्या किती अनुयायानी बाबासाहेब आंबेडकराचे खऱ्या अर्थाने अनुकरण केले? स्वत.ला 'नव-बौद्ध' म्हणवून घेण्यास त्यानी विरोध कसा केला नाही? ज्या जुनाट चालीरीतीची सवय लागलेली होती त्या ताडकन् फेकून द्याव्या, असा स्वाभिमान का निर्माण झाला नाही? 'बलुतं' मध्ये, जुन्या सवयींनी येणारा केविलवाणेपणा, दया पवारानी मोठ्या संतावल्या मनाने व्यक्त केला आहे.

बाबासाहेबानंतर ज्या कोणी पुढाऱ्यांनी, स्वतःची राजकीय करियर उभी करण्यासाठी स्वत.च्या दलित बांधवाचा उपयोग केला, आणि त्यांच्यात जागृती व्हावी यासाठी काहीही केले नाही–त्याचा तर येथे अजूनही उल्लेखच आलेला नाही. कारण अनेकांनी ते काम यापूर्वी केले आहे.

'येथल्या नरकपुरीतून सुटण्यासाठी धर्मांतर आहे'

प्रा. वाघाचे तिसरे विधान.

'येथल्या नरकपुरीतून सुटण्यासाठी' हा हेतू मला पूर्णपणे मान्य आहे, पण एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे हा नरकपुरीतून सुटण्याचा मार्ग मुळीच नव्हे.

स्वतंत्र, स्वाभिमानी वृत्तीला मुक्त वाव कोणत्याच धर्मात नाही. देव, परलोक, प्रेषिताच्या आज्ञा, उच्चनीचता, पुरोहितशाही ही नरकपुरी प्रत्येकच धर्मात असते. आगीतून तिरीमिरीने बाहेर पडायचे आणि अलगद फुफाट्यात जाऊन पडायचे, यात स्वाभीमानी वृत्तीची फसगतच होईल.

साराश, धर्मांतर ज्या तीन गोष्टीसाठी इष्ट असे प्रा. वाघ सागतात. त्या तीनही गोष्टी धर्मांतराने साध्य होणाऱ्या नव्हेत हे आतापर्यंत स्पष्ट झाले असेल.

प्रा. वाघानी चर्चेत हेच म्हटले असेल असे नव्हे, मी वृत्तांतावर अवलंबून लिहित आहे. वाघांचे म्हणणे थोडे वेगळे असेल तर, 'विपर्यास करण्याची माझी इच्छा नाही,' हे त्यानी कृपा करून लक्षात घ्यावे व मला क्षमा करावी.

एक खरे की, वर विचारात घेतलेली तीन उद्दिष्टे ही काही धर्मांतराने साध्य होणार नाहीत ही काळया दगडावरची रेघ आहे.

□

मग हिंदू दलिताची नरकपुरी कशी दूर व्हायची?

मुळात नरकपुरी आहे की नाही?

तर अशी नरकपुरी जरूर आहे. या विषयी जुने धर्ममार्तंड किंवा वर्णाश्रम कर्मविपाकावर पूर्ण श्रद्धा असलेले काही सनातनी, यांचेशिवाय कोणाचेही दुमत उरलेले नाही.

सवर्ण आई–वडिलांच्या पोटी जन्माला आलेले, पण शहाणपणाने स्वतंत्र विचार करणारे, दलितावर झालेल्या व होणाऱ्या जुलमामुळे अस्वस्थ होऊन अपराधी भावना अनुभवणारे, आणि दलिताच्या स्वाभिमानरक्षणासाठी आध्यात्मिक आणि वैचारिक

ऊब देण्याचा प्रयत्न करणारे-याची अखंड परंपरा हिंदू चौकटीतच कार्यरत आहे.

कबीर, नानक हे भारतीय संत; किंवा ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, चोखोबा, एकनाथ, तुकाराम, हे आपले संत; छत्रपती शिवाजी महाराजांसारखे क्रांतिकारक वृत्तीचे पुरोगामी शासक; लोकहितवादी, महादेव गोविंद रानडे, महात्मा फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, आगरकर, सावरकर, डॉ. बाबा आढाव, अशी सुधारकांची अखंड परंपरा हिंदू चौकटीतच निर्माण होऊ शकते हे लक्षात घ्यावयास हवे.

कारण, सर्व धर्मांच्या चौकटीपेक्षा हिंदू धर्माची चौकट ही जास्तीत जास्त लवचिक आहे.

अस्पृश्यता-उच्छेदाचा कायदा तीस वर्षांपूर्वीच झाला. तोही एकमताने. उपहारगृहे, सार्वजनिक जागा सर्वांस खुल्या झाल्या. राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा खाजगी विरोध असूनही 'हिंदू कोड' मंजूर झाले. (मुसलमानांचा आणि कोणत्याही कारणाने त्यांचा मागासलेपणा उचलून धरणारांचा, अशा सुधारणांना आजही विरोध आहे. इतर धर्मीयांचाही सुधारणेला विरोधच आहे.)

म्हणून प्रथम मी असे सुचवीन की हिंदू चौकटीतल्या या सुधारणावादी प्रवृत्तीचा आधार दलितांची नरकभूमी दूर करण्यासाठी होऊ शकेल.

☐

पण यावर जर प्रा. वाघ हसले, आणि म्हणाले, 'अहो भावे, असला कसला हा तुमचा भोळेपणा ? सुधारणावादी परंपरा चांगली हजारभर वर्षांची तरी जुनी आहे. मग आतापर्यंत तिचा प्रत्यक्ष प्रकाश असा काय पडलाय ? ते काही नाही, तुम्ही सारे सवर्ण लोक ढोंगी आहात, दुटप्पी आहात. तुम्हाला तुमच्या या क्रांतिकारक परंपरेचाही उदोउदो करायचा आहे, आणि आमची नरकपुरीही चालू ठेवायची आहे.'

तर या त्यांच्या वर्णनाला मी विरोध करू शकणार नाही एक गाव एक पाणोठा आणि मराठवाडा नामांतर या दोन्ही प्रकरणी सवर्ण हिंदूचा दुटप्पीपणा दिसून आलाच आहे.

तसे कशाला ? गेल्या महिन्या दोन महिन्यात यच्चयावत् नेत्यांनी धर्मांतराविषयी चिंता प्रकट केली आहे. धर्मांतराची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

दलितांचा मागासलेपणा, आणि परकी पैसा ही दोन कारणे सर्वांनाच सोयिस्कर झाली आहेत.

म्हणजे आता हे तर खरेच आहे की, परकी पैसा नसता, तर हे सारे दलित नाक मुठीत धरून सध्याची नरकपुरी सोसत राहिलेच असते की नाही ?

म्हणजे तर्क कसा प्रतिष्ठित आहे बघा.

नरकपुरी सोडण्यासाठी दलितांनी धर्मांतर केले काय ? तर नाही कस्मात् ? अभावात्. नरकपुरी तर दोन हजार वर्षे चालू आहे ! तेव्हा कोठे धर्मांतर झाले ? (दोन चारदा झाले, ते सोडा, तो मुद्दा गैरसोयीचा आहे. ) तर नाही. कां झाले नाही ? कारण परकी पैसा नव्हता. आज कसे झाले ? कारण परकी पैसा आहे.

मग या धर्मांतरात सवर्णांची नवी चूक कोणती आहे ? तर कोणतीच नाही.

¤

'ठीक आहे. मग दलितांनी काय करावे?'

'धीर धरावा. पैसा घेऊ नये. मनाचा मोठेपणा दाखवावा.'

'पण सर्वच पातळ्यांवर पैशाची देवाण घेवाण होते.'

'ते वेगळे, मते बदलणे, भेसळ करणे, वशिला लावणे, अशा किरकोळ बाबींसाठी पैसा वापरतात हे खरे. पण हे प्रकार इतके म्हणजे धर्मांतराइतके गंभीर नाहीत.'

'अलबत्. शिवाय धर्मांतरासाठी येणारा पैसा परकी आहे. हे फार वाईट. अहो, एखाद्या वेळी अर्थ व्यवस्था कोसळून पडायची.'

'पण मग स्मगलिंग, परकी कंपन्यांची आणि सरकारची लाच, आपले रजनीश-हा सारा परकी पैसाच नव्हे का ?'

'अहो, पैशांचा प्रश्न दुय्यम धरा. पण धर्मांतर ही रिलिजस कलॅमिटी आहे. पण तुमचे प्रश्न आणि चिकित्सा ज्या अर्थी संपत नाही त्या-अर्थी तुम्ही श्रद्धाळू दिसत नाही. श्रद्धाळू माणसाला कसे, कुठे थांबावे, हे कळते.'

¤

इथे आपण दुसऱ्या आणि खऱ्या परिणामकारक मार्गाशी येतो. दलितांनी नरकपुरीतून बाहेर पडायचे तर आज हा एकच मार्ग आहे.

कोणत्याही धर्म भावनेच्या चौकटीतून बाहेर पडणे. इहवादी, बुद्धिवादी होणे. सेक्यूलर होणे.

प्रा. वाघांना, मला वाटते. हा विचार पटेल.

मार्गदर्शक कोठे आहे ?

तर आहे.

पोतराजावर तुटून पडून विठ्ठल साठे यांनी हा मार्ग नुकताच दाखविला आहे.

या मार्गासाठी मात्र खरा स्वाभिमान, खरी हिंमत, याची गरज लागणार आहे.

मार्ग कठिण आहे. रक्त बंबाळ व्हायला होईल. पण लढाई संपल्यावर जे यश मिळेल, ते कायमचे असेल. ते दुसऱ्या कुणावर अवलंबून नसेल.

या यशाने, दलित समाज स्वतःच्याच नरकपुरीतून कायमचा बाहेर पडेल. इतकेच नव्हे तर सवर्णांच्या श्रद्धाबंधनातूनही तो कायमचा बाहेर पडलेला असेल.

☐


तिसरी आवृत्ती संपत आली

हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी ( सचित्र )
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अवतीभवती । शरद कृष्णन्

## राजभवनामधील राजकारण

राज्यपालाची जागा ही तसे पाहता सन्मानाची जागा. राज्य सरकार आणि केंद्र शासन यांच्यामधील हा दुवा. राज्य सरकारबरोबर राज्यपालांचे संबंध सर्वसाधारणपणे सलोख्याचे असतात. केंद्रामध्ये सत्तास्थानी असलेल्या पक्षाचे सरकार ज्या राज्यामध्ये आहे तिथे राज्यपालाला सभा-संमेलने भूषवणे आणि विधानसभेच्या अधिवेशनाच्या प्रारंभी राज्यसरकारचे धोरण स्पष्ट करणे यापेक्षा फारसे काम नसते; परंतु ज्या राज्यांमध्ये विरोधी पक्षाचे सरकार आहे अशा राज्यामध्ये काम करणे ही राज्यपालाच्या दृष्टीने तशी तारेवरची कसरत असते. राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपतीकडून होते आणि घटनेचे १५६ (१) कलम असे सांगते की, राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंतच राज्यपाल आपले काम करू शकतो. या कलमाचा तसा फारसा गैरवापर झाला नव्हता; परंतु जनता राजवटीमध्ये नेमल्या गेलेल्या अनेक राज्यपालाच्या बाबतीत सध्याच्या केंद्राचे धोरण अनुदार स्वरूपाचे आहे. राजकीय सोई पाहून आणि राजकीय दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवूनच या नेमणूका केल्या गेल्या असल्याने केंद्रामध्ये सत्तांतर झाल्यावर या मंडळींनी राजीनामे देणे उचित होते. पण समजा, त्यांनी ते दिले नाहीत तर त्यांची अपमानास्पद हकालपट्टी करण्याचीही काही आवश्यकता नव्हती; परंतु राज्यपाल हा आपला प्रतिनिधी आहे आणि आपली इच्छा असेपर्यंतच तो कारभार पाहू शकतो, त्याची नेमणूक, बडतर्फी आणि बदली हा सर्वस्वी आपला अधिकार आहे, असे केंद्राचे सध्याचे धोरण आहे. स्वपक्षीय शासन ज्या राज्यामध्ये आहे अशा ठिकाणीही तेथील सरकारला याबाबत विश्वासात घेतले जात नाही. राजस्थानच्या राज्यपालांचे उदाहरण याबाबत देता येईल. प. बंगालचे राज्यपाल टी. एन. सिंग यांच्या भवितव्याबाबत चर्चा चालू असताना अगदी अचानकपणे राजस्थानचे राज्यपाल श्री. रघुकुल तिलक याना बडतर्फ करण्यात आले. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना अथवा खुद्द राज्यपालानाही या गोष्टीची जराही कल्पना नव्हती. केंद्रीय गृहखात्याचे सहसचिव एक खलिता घेऊन आले. 'श्री. रघुकुल तिलक याना राजस्थानच्या राज्यपालपदाच्या जबाबदारीतून तावडतोब मुक्त करण्यात येत आहे,' असा हा दोन ओळींचा खलिता राजभवनावर देण्यात आला आणि प्रथेप्रमाणे लगोलग राज्याच्या मुख्य न्यायमूर्तींचा हंगामी राज्यपाल म्हणून शपथविधी झाल्यानंतरच हे सहसचिव परत दिल्लीला गेले.

श्री. तिलक यांची नेमणूक जनता सरकारच्या कारकिर्दीमध्ये झाली होती. त्यांची तब्येत अलीकडे ठीक नसते, यापेक्षा त्यांच्याविरुद्ध दुसरी कोणतीही विशेष तक्रार नव्हती; परंतु जे राज्यपाल जावेत असे केंद्र-सरकारला वाटते, अशा राज्यपालामध्ये अस्वस्थता निर्माण करण्याच्या हेतूनेच रघुकूल तिलक याना घरी बसवण्यात आले; त्यांचे वय किंवा ढासळती प्रकृती हे काही खरे कारण नव्हे! उत्तर प्रदेशसारख्या महत्त्वपूर्ण राज्याचे राज्यपाल श्री. पी. एम्. सिंग (वय ८०) हे तिलक यांच्यापेक्षा तीन वर्षांनी मोठे आहेत. त्यांची तब्येतही नादुरुस्त असते; परंतु त्यांची नेमणूकच विद्यमान केंद्र शासनाकडून झाली असल्याने त्यांच्या बाबतीत फारसा प्रश्न निर्माण होत नाही.

केंद्र शासनाने प. बंगालच्या राज्यपालांबाबत आपले धोरण स्पष्ट केलेच आहे. श्री. सिंग यांनी राजीनामा द्यावा अशीच केंद्र-शासनाची इच्छा होती. त्यांना तसे निरोपही गेलेले होते; परंतु तरीही श्री. सिंग यानी प्रारंभी त्याकडे दुर्लक्ष केले. श्री. सिंग राज्यसरकारला जवळचे वाटतात. एक तर त्यांची नेमणूक जनता शासनाकडून झाली आहे आणि दुसरे म्हणजे राज्यसरकारच्या कारभाराबाबत त्यांचे धोरण निःपक्षपाती आहे केंद्राला ते मानवण्यासारखे नाही. आपल्या मर्जीप्रमाणे अहवाल देऊ शकेल असा राज्यपाल केंद्राला हवा आहे. प. बंगालच्या राज्यसरकारची मुदत आता केवळ आठ-दहा महिन्यांची उरली आहे राज्यामध्ये ज्यावेळी विधानसभांच्या निवडणुका होतील, त्या वेळी तेथे बसू सरकार असणे फारसे सुखावह नाही. शक्य झाल्यास हे शासन बरखास्त करून तेथे राज्यपालांची राजवट आणण्याचा केंद्राचा इरादा आहे; पण असे करायचे तर त्याला राज्यपालाचा तशा स्वरूपाची शिफारस करणारा अहवाल हवा. श्री. टी. एन्. सिंग याचे एकंदर धोरण पाहता ते वस्तुस्थिती डावलून केवळ केंद्र सरकारला हवा म्हणून कोणताही अहवाल सादर करणार नाहीत. केंद्र शासनाच्या हे ध्यानात आले असल्यामुळेच श्री. सिंग याना तातडीने हलवण्याची हालचाल सुरू झाली. याबाबत ज्योती बसूनी विचारणा केली तर असे काहीही घडत नसल्याचे सांगण्यात आले; परंतु प्रत्यक्षात इंदिराजीचे दूत म्हणून श्री. हरिकिसन शास्त्री यांना प. बंगालच्या राज्यपालांकडे पाठवण्यात आले आणि त्यांनी राजीनामा द्यावा असे त्यांना सुचविण्यात आले. श्री. शास्त्री कलकत्त्याला गेल्याची बातमी हेतुपूर्वक प्रसृत करण्यात आली. श्री सिंग यांच्यावर मानसिक दडपण आणण्याचा हा प्रकार यशस्वी ठरल्याने त्यांची बडतर्फी टळली. आपल्या जबाबदारीतून आपल्याला त्वरित मुक्त करावे, अशी इच्छा आता श्री. सिंग यांनी व्यक्त केली आहे. श्री. सुखाडिया यांची प. बंगालचे राज्यपाल म्हणून नेमणूक होत असल्याचे वृत्तही प्रसृत होईल, अशी दक्षता घेण्यात आली आहे. या सर्व प्रकारामुळे राज्य आणि केंद्र-यांच्यामधील दुवा म्हणज राज्यपाल, असे जे स्वरूप पूर्वी होते तें आता राहिलेले नाही. राज्यपाल हा आता केवळ केंद्राचा प्रतिनिधी झाला आहे. केंद्राला सोयीस्कर वाटेल असेच धोरण त्याने अवलंबिले पाहिजे. प. बंगालमधील निवडणुकीच्या वेळी तेथे बसू सरकार असेल अथवा नसेल; पण राजभवनामधील राज्यपाल हा मात्र इंदिरा काँग्रेसला सोयीस्कर वाटेल असाच असला पाहिजे, अशी विक्षिप्त आग्रही भूमिका घेतली गेल्याने श्री. सिंग यांची परिस्थिती जास्त अवघड झाली. त्यांनी राजीनामा न देण्याबाबत प्रारंभी जे थोडे-फार ताठर धोरण स्वीकारले त्यामुळे केंद्राला आक्रमक हालचाली कराव्या लागल्या आणि राज्यपालाच्या या महत्त्वपूर्ण

जागेबाबत केंद्रसरकार किती पक्षीय भूमिकेतून पाहते, हे स्पष्ट झाले. श्री. सिंग यांनी जाणे आणि त्यांच्या जागी श्री. सुखाडिया अथवा अन्य कोणी येणे हा तसा आता उपचाराचा भाग झाला आहे.

श्री. सिंग यांच्या पाठोपाठ हरियानाच्या राज्यपालपदी असलेले श्री. तपासे पुन्हा महाराष्ट्रात माघारी घेण्याची शक्यता आहे त्यांनी राजीनामा द्यावा, असे त्यानाही सुचवण्यात आले आहे. जनता सरकारने त्यांची उत्तर प्रदेशचे राज्यपाल म्हणून नेमणूक केली होती. त्यांना उ. प्रदेशातून हरियानामध्ये हलवून केंद्राने आपली पहिली नाराजी व्यक्त केली असेच धोरण महाराष्ट्राच्या श्री. सादिक अलीबाबत राबवण्यात आले. सादिक अलीची नेमणूक महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून झाली होती. पुढे केंद्रात शासन बदलल्यावर सादिक अलीना महाराष्ट्रातून तामिळनाडूमध्ये पाठवण्यात आले. त्यापूर्वी तामिळनाडूच्या श्री. प्रभुदास पटवारींना एखाद्या कारकूनाला घरी बसवावे अशा पद्धतीने घरी बसवण्यात आले. अर्थात तो केवळ अपवाद नव्हता, हे श्री. तिलक यांना ज्या पद्धतीने वागविण्यात आले त्यावरून स्पष्ट झाले आहे. श्री. सादिक अली कदाचित् आपली मुदत मद्रासमध्ये पूर्ण करतील; परंतु श्री. तपासे याचे काही खरे दिसत नाही. कोणतीही कुरकुर न करता ते लखनौहून चंदीगढला गेले; पण आता तिथेही त्यांना उरली-सुरली मुदतही पूर्ण करून दिली जाईल असे दिसत नाही. त्याच्याकडे राजीनामा मागण्यात आल्याच्या बातमीबद्दल पत्रकारानी त्यांची भेट मागितली असता त्यांनी ती नाकारली. अगदी लगोलग नाही तरी चार-सहा महिन्याच्या काळात श्री तपासे परत आले तर आश्चर्य वाटू नये.

राज्यपालांबाबतचे केंद्र शासनाचे हे धोरण भूषणावह खास नाही. राज्य आणि केंद्र याच्यामध्ये या प्रश्नावरून तणाव निर्माण होण्याचीही दाट शक्यता आहे. विशेषत, प. बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसू या गोष्टीचे जरूर भांडवल करतील. तसे ते त्यांना करता येऊ नये, अशी केंद्राची इच्छा आहे. केंद्र शासन जर श्री. रघुकुल तिलक आणि प्रभुदास पटवारी यांना बडतर्फ करू शकते तर ते हीच गोष्ट श्री. टी. एन. सिंग याच्या बाबतीतही करू शकते. पण तसे केले तर ज्योति बसू त्याचा राजकीय लाभ उठवतील, अशी केंद्र सरकारची खात्री असल्याने शक्यतो श्री. सिंग यांनी आपण होऊन राजीनामा द्यावा, असे केंद्र सरकारला वाटते. आणि त्या दृष्टीने त्यांच्यावर पुरेसे दडपण आणून आपल्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावे, असे पत्र त्यांच्याकडून लिहून घेण्यात केंद्र शासन यशस्वी झाले आहे.

राज्यपालाच्या बदलीबाबत आणि बडतर्फीबाबत केंद्रशासन घटनेच्या १७६ (१) या कलमाकडे बोट दाखवून आपल्याला सोयीस्कर असा अर्थ काढते आणि स्वत.च्या मर्जीप्रमाणे त्याबाबत कारवाईही करते. घटनेच्या ७५ (२) कलमाप्रमाणे पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत कारभार पाहू शकतील, असेही सूचित होते. पण म्हणून राष्ट्रपती आपल्या मर्जीप्रमाणे केंद्रीय मंत्रीमंडळ बुडवू शकत नाहीत. तसे ते करू शकतील, असे घटनेचा अर्थ लावणारा कोणीही पंडित सांगू शकत नाही. मग राज्यपालाच्या बदली-बडतर्फीबाबत असा अर्थ का लावला जातो? यामुळे राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत राज्यपाल सत्तेवर राहू शकतील, घटनेचे असे कलम सांगत असले तरी प्रत्यक्षात मात्र राष्ट्रपतीची मर्जी म्हणजे पंतप्रधानांची मर्जी, असाच अर्थ लावावा लागतो कारण घटनेमधील ४४ व्या दुरूस्तीप्रमाणे याबाबत पतप्रधान जो सल्ला देतील तो राष्ट्रपतीवर बंधनकारक असतो. फार तर राष्ट्रपती याबाबतची शिफारस फेरविचारार्थ मत्रिमंडळाकडे परत पाठवू शकतात. मंत्रिमंडळाचा निर्णय पूर्ण विचाराती झालेला असल्याने या फेरविचाराला फारसा अर्थ नसतो, हेही राष्ट्रपतीना माहीत असल्याने याबाबतच्या शिफारशीवर सही व शिक्कामोर्तब करण्यापेक्षा राष्ट्रपती फार काही करू शकत नाहीत. जनता सरकारने केलेली ही ४४ वी दुरूस्ती राष्ट्रपतीना यापेक्षा दुसरा पर्याय उपलब्ध करून देत नाही. यापूर्वी याबाबत असलेल्या सर्वसाधारण संकेताचा फायदा राष्ट्रपतीना मिळत असे. परंतु ४४ व्या घटना दुरूस्तीने ही लवचिकता नष्ट करून टाकली आहे पंतप्रधान इंदिराजी त्याचा उदड फायदा घेत असून राज्यावरील आपली पकड घट्ट करण्यासाठी राज्यपालांचा त्या वापर करत आहेत. अगदी तात्त्विक भाषेमध्ये बोलायचे तर घटनेच्या चौकटीत राहूनच त्या राज्यपालाना नाचवत आहेत; पण राजकीय संकेताचा विचार करता आणखी एक वाईट पायंडा पडतो आहे, हेही या संदर्भात लक्षात घ्यायला हवे.

## □ केरळच्या अँथनींना मधाचे बोट

फाटाफुटीच्या आणि विघटनाच्या बाबतीत रिपब्लिकन पक्ष हा एक अजब नमुना आहे, असे आजवर वाटायचे. पण कॉंग्रेसने सध्या त्यावरही मात चालवली आहे. अरस कॉंग्रेसमधून बाबुजीची हकालपट्टी झाली आहे, तर बाबुजीनी आपली स्वत.ची इंडियन नॅशनल कॉंग्रेस स्थापन केली असून श्री. देवराज अरस यांचीच हाकालपट्टी केली आहे. चव्हाणसाहेब इंदिरा कॉंग्रेसचे दार उघडण्याची वाट पहात त्या पक्षाच्या दारात निपचित पडून आहेत. म्हणजे अरस कॉंग्रेस नावाचा जो पक्ष आहे तो थोडया-फार प्रमाणात प्रादेशिक पातळीवर टिकून आहे. चव्हाणांनी अरस कॉंग्रेस सोडली आणि महाराष्ट्र विधानसभेमधील अरस कॉंग्रेसच्या आमदाराची सख्या ४९ वरून १० वर श्री. शरद पवारांसह आली. खुद्द श्री. अरस याच्या कर्नाटकची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. या पक्षाची थोडी-फार ताकद जर कुठे उरली असेल तर ती केरळमध्ये. तिथे प्रदेश पक्षाध्यक्ष श्री. ए. के. अँथनी यांनी अजून तरी पक्ष मजबूत ठेवण्यात यश मिळविले आहे. अर्थात त्यामुळेच तेथील आघाडी सरकार अजून टिकून आहे. तेथील अरस कॉंग्रेस सध्या अँथनी यांचे नेतृत्व मानत असली तरी सारे काही आलबेल आहे, असे मात्र नाही. अँथनी याचे नेतृत्व मान्य असले तरी त्यांच्यापेक्षा वेगळे मत असलेल्या आमदाराची संख्या चार ते पाच आहे. या मंडळीचे धोरण आज तरी बंडखोरीचे नाही. परतु आपण अरस कॉंग्रेसमध्ये राहिल्याने आपले भवितव्य धोक्यात आहे असे जर या मंडळीना वाटले तर कदाचित आजवर चिरेबंद असलेला केरळमधील अरस कॉंग्रेसचा बालेकिल्ला ढासळू लागेल. अरस कॉंग्रेसमधील ही वाढती चलबिचल पाहून श्री. अँथनीही थोडे-फार अस्वस्थ झालेले आहेत. त्यात निवडणूक आयोगाने इंदिरा कॉंग्रेस हीच खरी कॉंग्रेस, असा निवाडा

दिल्याने आपण काँग्रेसच्या या मूळ प्रवाहापासून अलिप्त राहू नये, असे अनेक कार्यकर्त्यांना आणि काही जबाबदार नेत्यांनाही वाटू लागल्यास आश्चर्य मानण्याचे कारण नाही. शिवाय, अखिल भारतीय पातळीवर अरस काँग्रेसची अक्षरशः विल्हेवाट लागत असताना राज्य पातळीवर आपला पक्ष फार काळ टिकाव धरू शकणार नाही, असे अनेक कार्यकर्त्यांना वाटू लागले आहे. अरस काँग्रेसमधील ही अस्वस्थता लक्षात घेऊनच प्रथम प्रदेश इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस श्री. के. एम. चेंडी यानी अँथनी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यानी इंदिरा काँग्रेसमध्ये सामील व्हावे, असे आवाहन केले. त्या पाठोपाठ बोलभांड सी. एम. स्टिफन यानी तर चक्क असे घोषित करून टाकले की, अँथनी आणि त्याचे सहकारी जर लगेच इंदिरा काँग्रेस मध्ये आले तर त्याचे मनमोकळे स्वागत केले जाईल; मात्र या बाबतचा निर्णय त्यानी आता लाबणीवर टाकू नये, कारण आमचे जे आवाहन आहे, ते विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन केले आहे. इंदिरा काँग्रेसकडून अशा मनमोकळ्या स्वागताच्या घोषणा झालेल्या असल्या तरी श्री. अँथनी अशा प्रकारे हात बांधून इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्यास राजी नाहीत. ते स्वाभिमानी व तत्त्वनिष्ठ नेते आहेत. इंदिरा गांधी चिकमगळूरमधून निवडणूक लढवत असताना अरस काँग्रेसने त्याना पाठिंबा जाहीर करताच अँथनी यानी केरळच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन या प्रकरणी आपला निषेध नोदवला होता. आताही त्याना इंदिरा काँग्रेसचे राजकारण जराही पसत नाही. त्यामुळे श्री. स्टीफन यांच्या आवाहनाची चेष्टा करून त्यानी या आवाहनाची गंभीरपणे दखल घेण्याची गरज नाही, असे मत व्यक्त केले आहे.

आज केरळमध्ये असलेले आघाडी सरकार पाडण्याची इंदिरा काँग्रेसची इच्छा आहे. श्री. अँथनी याच्या पक्षाने जर आपला पाठिंबा काढून घेतला तर इ. के. नायनार याच्या नेतृत्वाखालील हे सरकार सहज कोसळून पडेल. इंदिरा काँग्रेसला नेमके हेच हवे आहे, ही गोष्ट श्री. अँथनी पुरेपूर ओळखून असल्याने इंदिरा काँग्रेसने पुढे केलेले मधाचे बोट त्याना लोभवू शकत नाही. शिवाय, पक्षात येणाऱ्या प्रत्येकाची काळजीपूर्वक छाननी करून त्यांना पक्ष प्रवेश देण्याचे धोरण असताना आपल्याच बाबतीत हा अपवाद का केला जात आहे हे न समजण्याइतके अँथनी भोळे नाहीत. त्यामुळे अँथनी सध्यातरी आपल्या राज्यापुरतेच पहात आहेत आणि आपल्या पक्षाचे वेगळे अस्तित्व ठेवणे फायदेशीर आहे, ही गोष्ट ते ओळखून आहेत. त्यामुळे सध्या तरी स्टिफन आणि कपनीच्या प्रयत्नांना यश येईल असे दिसत नाही.


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे


## □ विधानसभेचे पावसाळी अधिवेशन

सीमा भागामधील आमदाराच्या उपोषणाने विधान सभेच्या अधिवेशनाची नांदी झाली आहे. हे अधिवेशन सत्ताधारी पक्षाचे बळ वाढूनही या पक्षाला फारसे सुखावह ठरणार नाही. २८८ सदस्य संख्या असलेल्या या गृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे आता २२० पेक्षा जास्त आमदार आहेत. अधिकृत विरोधी पक्ष आता अस्तित्वात नाही. विरोधी पक्षनेते शरद पवार आता केवळ एका गटाचे नेते झाले आहेत आणि त्यांच्या मागे असलेली आमदाराची संख्या ४९ वरून १० वर आली आहे. अन्य विरोधी पक्षही विस्कळीत आहेत. तरीही सत्ताधारी पक्षाला हे अधिवेशन फारसे सुखावह ठरणार नाही. पक्षातर्गत गटबाजी आणि मंत्रिमंडळामधील फेरबदलाबाबत झालेली फटफजिती यामुळे मंत्रिमंडळामध्ये एकजूट नाही मुख्यमंत्री अंतुले काहीसे नरम आहेत. ज्या मंत्र्याना वगळणार असे सूचित करण्यात आले होते ते सर्व मंत्री आपल्या जागी सुस्थिर आहेत. मुख्यमंत्र्याची दिल्लीमध्ये जी फजिती झाली त्यामुळे ते स्वत ही अस्वस्थ आहेत. शिवाय अनेक वादग्रस्त विषय या अधिवेशनात चर्चिले जाण्याची शक्यता आहे. मुंबईच्या फुटपाथवरील झोपडपट्ट्या पाडण्याबाबत जो आक्रमक पाऊले उचलण्यात आली ती या प्रकरणी झालेल्या गदारोळामुळे आणि न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेमुळे मदावली आहेत. सचिवालय हलवण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी जी घोषणा केली आहे त्याबाबतही गृहामध्ये बरीच उलटसुलट चर्चा होण्याची शक्यता आहे. डॉ. दत्ता सामत-प्रकरणी सरकारचे चागलेच हसे झाले आहे. या वादग्रस्त नेत्याची सुटका करण्याचे न्यायालयीन आदेश येताच त्याची सुटका झाली खरी; परंतु त्याना पुन्हा लगोलग पकडण्यात आले व अकोला येथे नेण्यात आले. पुन्हा प्रकरण न्यायालयात गेले न्यायालयाने पुन्हा आदेश देताच डॉ. सामताना अकोल्याहून मुंबईला आणण्यात आले आणि न्यायालयाने पुन्हा त्यांची सुटका केल्याने त्यांना सोडून द्यावे लागले. डॉ. सामत आपल्या कामगार क्षेत्रामधील कामामुळे काय मोठे असतील ते असोत, परंतु सरकारचे या प्रकरणी जे हसे झाले त्यामुळे सरकारची नाचक्की झाली आणि कामगार क्षेत्रात हडेलहप्पी धोरण अवलंबिणारे डॉ. सामंत आणखी मोठे होऊन अधिवेशनात सहभागी होत असल्याने या प्रकरणी सरकारचे वाभाडे काढण्याची संधी विरोधी पक्ष सोडणार नाही.

विरोधी पक्ष असावा तेवढा बलशाली नाही हे खरे असले तरी-काही मान्यवर नेत्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाला धारेवर धरण्याचा प्रयत्न जरूर करील. विरोधी पक्षाची आघाडी उभी करण्याचे प्रयत्नही चालू आहेत. ते यशस्वी झाले नाहीत तरी काही किमान प्रश्नावर समान भूमिका घेऊन अधिवेशनात काम करणे संभवनीय आहे. तात्पर्य, प्रचड संख्याबल पाठीशी असूनही सत्ताधारी पक्षाच्या दृष्टीने हे अधिवेशन फारसे सुखावह ठरणारे नाही. □

## डॉ. नॉर्मन बोरलॉग

# ज्याने अन्नस्वावलंबनाचा शास्त्रीय पुरस्कार करून तिसऱ्या जगताचा चेहरामोहराच पालटून टाकला....

### लेखक : डॉ. बोरोले, कृषि संशोधन केंद्र, निफाड

सन १९७० च्या डिसेंबर महिन्याची १० तारीख शेतीशी संबंधित असणाऱ्या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत आनंददायी ठरली. या दिवशी डॉ. नॉर्मन बोरलॉग या कृषि शास्त्रज्ञाची, त्यांनी केलेल्या मौलिक गहू संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक विजेते म्हणून निवड करण्यात आली. डॉ. बोरलॉग हे अशा रीतीने शेती शास्त्रातील एकमेव नोबेल पारितोषिक विजेते ठरले. डॉ. बोरलॉग यांच्या संशोधनामुळे विकसनशील देशांमध्ये हरित क्रांतीचे पर्व सुरू झाले व जगातील करोडो लोकांची उपासमारीची विवंचना दूर झाली. हे काम करताना डॉ. बोरलॉग यांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले; परंतु त्यांची प्रखर ध्येयनिष्ठ व दांडगा उत्साह यामुळे त्यांनी अडचणींवर मात करून मानव जातीवर उपकार केले.

अशा ह्या थोर शास्त्रज्ञाचा जन्म एका शेतकरी कुटुंबात २५ मार्च १९१४ रोजी अमेरिकेतील आयोव्हा राज्यातील 'सौदे' या लहानशा खेड्यात झाला. त्यांच्या या कुटुंबातील प्रमुख व्यक्ती म्हणजे नॉर्मनचे आजोबा मि. नेल्स. ते शेतीमध्ये अत्यंत दक्ष व प्रगत विचाराचे होते. त्यांची एकूण १२० एकर जमीन होती. शेत जमिनीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन शेतकऱ्यांना मार्गदर्शक होता. शेतजमिनीकडे ते बँकेच्या रूपाने पहात होते. या बँकेतून पिकाच्या रूपाने काढलेल्या रकमेची परतफेड केल्यास, शेतकरी जेवढी मेहनत करेल त्या प्रमाणात त्याना मोबदला मिळतो, असे त्यांचे मत होते. मि. नेल्स यांना शिक्षणाची फार आवड होती. आपल्या मुलाने शिकून मोठे व्हावे म्हणून त्यांनी डॉ. नॉर्मन बोरलॉगचे वडिल मि. हेन्री यांना शिक्षणासाठी शेजारच्या शहरात पाठवले; परंतु मि. हेन्री आपल्या वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करू शकले नाहीत, व शिकत असतानाच ते मिस् क्लोरा व्होला या ठेंगण्या, सुंदर व लाजाळू युवतीच्या प्रेमात पडले व तिच्याशी ते विवाहबद्ध झाले आणि एक दिवस शिक्षण सोडून आपल्या वडिलांच्या शेतावर परतले व शेतीचे काम करू लागले. हेन्री व क्लोरा यांना तीन अपत्ये होती. दोन मुली व एक मुलगा हा मुलगा म्हणजेच नॉर्मन बोरलॉग होय.

डॉ. बोरलॉग यांचे व्यक्तिमत्व घडविण्यात त्यांच्या आजोबांचा फार मोठा व महत्त्वाचा वाटा आहे. नॉर्मनला लहानपणापासूनच आईवडिलांपेक्षाही आजोबांचाच लळा जास्त होता व आजोबाही आपल्या नातवाला मोठ्या कौतुकाने 'नार्म' म्हणून हाक मारीत असत. त्याने शिकून खूप मोठे व्हावे असे त्यांना वाटे व म्हणूनच नॉर्मन ५ वर्षांचा होताच, त्यांनी त्याला आपल्या खेड्यापासून ५ मैलावर असलेल्या 'न्यू अरेगॉन' शहरात शिक्षणासाठी पाठवले. नॉर्मन हा त्याच्या वर्गातील सर्वात लहान विद्यार्थी होता. शाळेत असताना नॉर्मनच्या जीवनात एक प्रसंग घडला की, ज्यामुळे जीवनात सारासार विचार करून वागण्याचे संस्कार त्या वेळी त्यावर घडले. तो प्रसंग शाळेतून परत येतानाचा होता. शाळेचा रस्ता बर्फातून होता. शाळेतून परतत असताना त्याला खूप थकवा आला व शेवटी अंगात त्राण न राहिलेला नॉर्मन तेथेच बर्फात बसून राहिला. बर्फात तसेच बसून राहणे आरोग्यास हितकारक नसल्याने, त्याच्याच शाळेत, त्याच्यापेक्षा वयाने मोठी असलेल्या चुलत बहिणीने त्याला बर्फात बसून राहिल्याने होणाऱ्या शारीरिक ताणाची कल्पना दिली. पण नॉर्मन खूपच थकलेला असल्याने त्याने तिकडे लक्ष दिले नाही. शेवटी नॉर्मन ऐकेना म्हणून तिने त्याला मारही दिला व हळूहळू घरी नेले. त्याच्या आजोबांना ही गोष्ट समजली व त्यावेळी त्यांनी नॉर्मनला बर्फात बसून राहिल्याचे दुष्परिणाम समजावून सांगितले. त्यामुळे होणाऱ्या शारिरीक त्रासाची कल्पना दिली व अशा वेळी माणसाने सारासार विचार करून मार्ग काढावा असा उपदेश केला. हा त्याच्या जीवनातील प्रसंग नॉर्मनला बरेच काही शिकवून गेला.

नॉर्मनच्या वडिलांनी ५६ एकरांचे शेत विकत घेतले होते. नॉर्मनला शेतीची मुळातच आवड असल्याने त्यांनी आपल्या वडिलांना शेतात काम करण्याबद्दलची आपली इच्छा बोलून दाखविली. तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला दिलेले उत्तर मार्मिक आहे. ते म्हणाले, 'नॉर्मन तू शिक्षण घे, ज्ञान मिळव. आता मिळविलेल्या ज्ञानामुळे तुला पुढे पोट भरण्यास मदत होईल.' ( Fill your head now, it will help to fill your belly in future. )

बोरलॉगचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर बोरलॉग कुटुंबाने त्याला पुढे शिकविण्याचे ठरविले. बोरलॉगच्या पुढील शिक्षणाकरिता त्याची शिक्षिका सिना बोरलॉगने पुढाकार घेतला.

वयाच्या १४ व्या वर्षी प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर बोरलॉग यांना पुढील शिक्षणाकरिता क्रेसो' या शहरात पाठविण्यात आले. हायस्कूल शिक्षणात बोरलॉग यांना वनस्पतीशास्त्र, विशेषत: 'झाडे व त्यांची वाढ' यामध्ये फार रस असल्याचे त्याचे शिक्षक हॅरी

**भारतातल्या गहू संशोधकांचे एक चर्चासत्र नुकतेच पुण्यांतील कृषिमहाविद्यालयात पार पडले. राहुरीच्या महात्मा फुले कृषिमहाविद्यालयाने आयोजित केलेल्या या चर्चासत्रामध्ये भाग घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषितज्ज्ञ डॉ. नॉर्मन बोरलॉग हेही येणार होते. काही अपरिहार्य कारणांमुळे ते येऊ शकले नाहीत. त्यांच्या महान कार्याची ही ओळख.**

थ्रथेडर याचे लक्षात आले व त्यानी आपणास अवगत असलेले शेती विषयक सर्व ज्ञान बोरलॉगना देण्याचा कसून प्रयत्न केला अशा रीतीने बोरलॉग यांच्या मूळच्या शेती विषयक आवडीस योग्य प्रोत्साहन मिळाले.

अभ्यासाचे बाबतीत ही प्रगती होत असतानाच, शारीरिकदृष्टया सुद्धा बोरलॉग याना हायस्कुल जीवनात योग्य मार्गदर्शन लाभले याच शाळेचे प्राचार्य डेव्हिड बार्टेलमा यांचेही लक्ष बोरलॉगकडे वेधले गेले. डेव्हिड हे त्या शाळेचे क्रीडा शिक्षक म्हणून देखील काम करीत होते. बोरलॉगच्या यशस्वी जीवनात त्यांचे फार महत्त्वाचे स्थान आहे.

एकदा फुटबॉल खेळताना बोरलॉगना त्यांनी संतापाने भांडताना पाहिले. त्यानी लागलीच बोरलॉगना आपल्याजवळ बोलावून घेतले. संतापाच्या कारणांची चोकशी केली. अशा विद्यार्थ्यास योग्य मार्गदर्शन झाल्यास तो उत्कृष्ट क्रीडापटू होईल हे जाणले. त्यानी बोरलॉगला कुस्ती पथकात दाखल होण्यास सांगितले. त्याचवेळी कुस्तीत प्राविण्य दाखवून त्या क्षेत्रात नावलौकिक मिळविण्याकरिता शिस्त व संयम या गुणाची आवश्यकता असल्याचे बोरलॉगचे मनावर बिबवले. त्याचबरोबर आपल्या आचार विचारात शिस्त ठेवण्यासही त्यानी बोरलॉगना बजावले अशा शिस्तप्रिय क्रीडा शिक्षकाचे मार्गदर्शनाखाली बोरलॉग त्यांच्या हायस्कूलमधील उत्कृष्ट तालीमबाज बनला. त्याने कुस्तीत प्राविण्य तर मिळविलेच, पण फुटबॉल मध्येही तो उत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून ओळखला गेला.

वयाच्या १८ व्या वर्षी त्यांचे हायस्कूलमधील शिक्षण पूर्ण झाले. त्यावेळी त्यांनी अभ्यासात तसेच खेळात प्राविण्य मिळवून शाळेतील *आदर्श विद्यार्थ्याचा मान पटकाविला.*

## नोकरी करून शिक्षण

हायस्कुल शिक्षणानंतर विद्यापीठातील उच्च शिक्षण बोरलॉगने घ्यावे म्हणून त्याच्या आजोबांनी त्याना प्रोत्साहन दिले. त्यांनी बोरलॉगला सागितले की, तू काहीही कर, पण उच्चशिक्षण घे; परंतु बोरलॉग याची आर्थिक परिस्थिती उच्च शिक्षण घेण्याइतपत चांगली नव्हती, म्हणून तीव्र इच्छा असूनही काही मार्ग सापडेना. स्वतः बोरलॉग व त्यांचे कुटुंबातील लोक याना हा आर्थिक प्रश्न भेडसावत असतानाच एक योगायोग जुळून आला. क्रेसो शहरातील फुटबॉल सघाचा संघनायक व नंतर मिनेसोटा विद्यापीठाच्या संघाचा हाफबॅक चॅपलिनचे लक्ष बोरलॉगकडे गेले व ते स्वतः बोरलॉगला मिनेसोटा विद्यापीठात घेऊन जाण्याकरिता बोरलॉगच्या घरी आले. त्यावेळी बोरलॉगने त्याना पैसा, राहण्याची सोय इ अनेक अडचणी सागितल्या. तेव्हा चॅपलिनने त्या सर्व अडचणी दूर करून मदत करण्याचे आश्वासन बोरलॉगना दिले आणि मग अवघ्या ६० डॉलरच्या आपल्या भाडवलासह बोरलॉग उच्च शिक्षणासाठी निघाले. वस्तुतः ६० डॉलरपैकी २५ डॉलर बोरलॉगला आपली शिक्षण फी भरावी लागणार होती, बाकी उरलेल्या पैशात कसे भागणार ? पण *यातून चॅपलिनने एक मार्ग काढला. दोघानी एका खोलीत राहावयाचे.* शिवाय जेवणाकरिता चॅपलिनने बोरलॉगना एका हॉटेलमध्ये वेटरचे काम मिळवून दिले. हॉटेलमध्ये दररोज तीन तास काम केल्यावर बोरलॉगला तीन वेळ जेवण मिळणार असे ठरले. त्यानुसार दररोज सकाळ-संध्याकाळ बोरलॉग हॉटेलमध्ये वेटरचे काम करू लागले.

बोरलॉग हॉटेलमध्ये काम करीत असताना एके दिवशी काळेभोर केस असलेली आनंदी व सुदर मुलगी बोरलॉगच्या नजरेस पडली. दोघांची नजरेला नजर भिडली आणि ती मुलगी मार्गारेट गिबसन बोरलॉगकडे आकर्षिली गेली. मार्गारेट गिबसन ही स्कॉटिश. ती बोरलॉगपेक्षा २ वर्षांनी मोठी होती. तिचे वडील रेल्वेत मोठे अधिकारी होते. बोरलॉगच्या तुलनेने तिची सांपत्तिक स्थिती खूपच चांगली होती.

मिनेसोटा येथील फार्म बोरलॉगना फार आवडले. त्यानी वनस्पतीशास्त्र, वनशास्त्र, वनस्पतीरोगशास्त्र व इतर सर्वसाधारण शेतीविषयक विषयाचा अभ्यास करण्याचे ठरविले. परंतु आयोव्हा व मिनेसोटा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात फारच फरक असल्याने प्रत्यक्ष अभ्यास करताना त्यांना खूप अडचणी आल्या; पण तरीही चिकाटी न सोडता सर्व पदाधिकाऱ्यांना भेटून त्यांनी कृषि महाविद्यालयात प्रवेश मिळविला व वनस्पतीशास्त्र हा विषय अभ्यासासाठी निवडला. बोरलॉगपुढे पुन्हा एक विवंचना उभी राहिली, ते ज्या हॉटेलमध्ये काम करीत होते त्या हॉटेल मालकाचे दिवाळे निघाल्याने त्यांना दुसरीकडे काम शोधावे लागले; पण तेथेही एका

दिव्याला बोरलॉगना तोंड द्यावे लागले. कारण या नवीन हॉटेलमध्ये ज्या वेळी गिऱ्हाईक येत नसत त्या वेळी बोरलॉगनाही जेवण मिळत नसे; पण ऐनवेळी बोरलॉगना त्यांच्या नशिबाने साथ दिली, प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनी सुरू केलेल्या नॅशनल यूथ या संस्थेमार्फत बोरलॉगना आठवड्यातून १५ तास काम मिळाले व त्याबद्दल त्यांना आठवड्याला ३ डॉलर्स मिळू लागले.

विद्यापीठ जीवनातील आणखी एक प्रसंग सांगावयाचा म्हणजे, एकदा कुस्तीसाठी तयारी करताना त्याचे वजन १४५ पौंडापेक्षा जास्त असल्याचे आढळल्याने, त्याचे शिक्षकाने वजन कमी करण्यासाठी त्यास उपाशी राहण्यास सांगितले. त्यावेळी बोरलॉगने ५ दिवस अगदी कडकडीत उपाशी राहून काढले. पाणीसुद्धा न पिता I त्यावेळी एका मित्राने त्यांची थोडीशी मस्करी केली तेव्हा रागाच्या भरात बोरलॉग त्याला मारावयास उठले; पण नंतर मात्र आपल्या अशा वागण्याचा बोरलॉगना पश्चाताप होऊन त्यांनी आपल्या शिक्षकाजवळ माफी मागितली. आपण जनावरासारखे वागलो असेही सांगितले. या प्रसंगाविषयी बोरलॉगने मार्गारेटजवळ व्यक्त केलेले विचार खरोखरच मननीय आहेत. बोरलॉग म्हणाले, ' मी रानटी पशुसारखा वागलो, कारण मी उपाशी होतो व मला वाटते की, उपाशी मनुष्य हा उपाशी पशुपेक्षा वाईट असतो. (Hungry man is worse than a hungry beast).

इ. स. १९३५ मध्ये बोरलॉगच्या आजोबाचे निधन झाले. त्या वेळी बोरलॉगना आपल्या घरी जावेसे वाटत होते; पण त्याच्या वडिलांनी आपला स्पष्ट नकार कळविताना बोरलॉगला सांगितले की, ' तू शिकत असताना या निमित्ताने आलास तर ते आजोबांच्या, माझ्या व तुझ्या आईच्या इच्छेविरुद्ध होईल म्हणून तू येऊ नये. ' या वडिलांच्या निरोपावरून त्या कुटुंबाला शिक्षणाचे महत्त्व किती वाटत होते हे स्पष्ट होते. या दुःखद प्रसंगी मार्गारेटने मात्र त्यांना सहानुभूती दाखविली.

उन्हाळ्यात बोरलॉगने एका कंपनीत १·८० डॉलर रोजाने नोकरी धरली; पण त्यांनी पैशाची गरज असल्याने दुप्पट काम करावयास सुरुवात केली. बोरलॉगला मदत करण्याचे हेतूने मार्गारेटनेही प्रुफरीडरची नोकरी करण्यास सुरुवात केली. नंतर त्यांना ज्युनियर फॉरेस्टर म्हणून नोकरी मिळाली. यावेळी त्यांच्या हाताखाली चार नोकर होते, कुणाचे तरी नेतृत्व करण्याची ही सुरुवात झाली. त्यामुळे बोरलॉग याना फार आनंद झाला. वयाच्या २३ व्या वर्षी त्यांची नॅशनल फॉरेस्ट सर्व्हिसेसमध्ये विशेष शिक्षणासाठी निवड झाली. एक वर्षाचा हा कोर्स पूर्ण झाल्यावर त्यांनी मार्गारेटशी लग्न केले. लग्नाचे वेळी शेतीच्या हंगामाचे दिवस असल्याने त्यांचे आई-वडील त्याचे लग्नाला हजर राहू शकले नाहीत; पण त्याच्या दोघी बहिणी पालमा व शारलोटी या मात्र हजर होत्या.

याच सुमारास डॉ. स्टॅकमन या वनस्पतीशास्त्रज्ञाची कीर्ती त्यांनी ऐकली. त्यांनी पहिल्या महायुद्धाच्या आधीच तांबेऱ्यावर काम सुरू केले होते व काही नवीन प्रजातीही शोधल्या होत्या. त्यांनी दिलेल्या तांबेऱ्यावरील व्याख्यानाने बोरलॉग इतके प्रभावित झाले की, त्यांनी डॉ. स्टॅकमनच्या मार्गदर्शनाखाली आणखी शिक्षण घेण्याची आपली इच्छा मार्गारेटजवळ व्यक्त केली आणि त्यानुसार डॉ. स्टॅकमन यांना भेटून त्यांचे मार्गदर्शनाखाली आपल्या पदव्युत्तर शिक्षणास सुरवातही केली. डॉ. स्टॅकमन यांनी बोरलॉगवर आपल्या संशोधनाच्या कामात सहाय्यक म्हणून जबाबदारी सोपविली. यावेळपर्यंत डॉ. बोरलॉग दांपत्याचा संसार लहानशा खोलीत थाटलेला होता. लग्नानंतर ३ वर्षांनी हा संसार विद्यापीठाच्या ४ खोल्यांमधील घरात हलविण्यात आला.

बोरलॉग यांनी वयाच्या २६ व्या वर्षी मास्टर ही पदवी संपादन केली तेव्हा त्यांचे आईवडिलांना खूपच आनंद झाला. बोरलॉगने नंतर पीएच. डी.ला जायचे ठरविले. पण त्याआधी इ. स. १९४१ मध्ये त्यांना डी. डी. टी. औषध तयार करण्यासाठी संबंधित असलेल्या कंपनीत बऱ्यापैकी नोकरी मिळाली. या नोकरीमुळे त्यांना वर्षाला २८०० डॉलर्स मिळत ही नोकरी मिळाल्यावर बोरलॉगने एक जुनी गाडीही विकत घेतली.

## मेक्सिकोतील गरिबीचे दर्शन

२७ सप्टेंबर १९४३ रोजी बोरलॉग दांपत्यास पहिली मुलगी झाली. त्यांनी मुलीचे नांव ' जेनी ' ठेवले.

मेक्सिकोमधील अन्नटंचाई दूर करण्यासाठी व पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी अमेरिकेतील रॉकफेलर प्रतिष्ठानाने त्या देशास मदत करावयाचे ठरविले. त्यानुसार १९४४ साली हॅरॉर याचे नेतृत्वाखाली रॉकफेलरचे पथक मेक्सिकोत गेले. त्याकामी हॅरॉर यांनी वनस्पती रोगशास्त्रज्ञ म्हणून बोरलॉग यांची निवड केली. त्यावेळी अमेरिकेतील मनुष्यबळ कायद्यातील तरतुदीनुसार काम करावे लागत असल्याने, त्यांना या कार्यक्रमांत सहजासहजी जाता येत नव्हते. बोरलॉग DDT प्रोग्राममध्ये काम करत असल्याने सक्तीच्या लष्करी सेवेतही त्यांना घेण्याचे नाकारण्यात आले, परंतु मोठ्या कष्टाने आणि प्रयत्नांनी त्यांनी रॉकफेलर पथकात समावेश करून घेतला व ते वयाच्या ३० व्या वर्षी मेक्सिकोत आले. मेक्सिकोचा दौरा करीत असताना मेक्सिकोतील गरिबी पाहून तर त्यांना धक्काच बसला. हा देश १० दशलक्ष एकर मका व १ दशलक्ष एकर गहू पेरत असूनही दरवर्षी किमान ३० दशलक्ष डॉलर्स गव्हाच्या आयातीवर खर्च करीत असल्याचे त्यांना दिसून आले. जमिनीची धूप झाल्याने ती नापिक बनलेली. शेतकऱ्यांना खताची माहिती नव्हती. जमिनीतून पिक काढल्यावर जमिनीला काही तरी परतफेड करावयास हवी हे त्यांना माहितच नव्हते. त्यांनी या देशाबद्दल आपल्या पत्नीलाही कळविले होते की, हा भाग अत्यंत गरीब, मनोभंग करणारा असा असून येथे झाडेसुद्धा वाढत नाहीत, ती खुरटी बनलेली आहेत.

या भागाची पाहणी करताना बोरलॉग यांना कधी अत्यंत गलिच्छ डासांचे माहेरघर असलेल्या हॉटेलमध्ये तर कधी शेडमध्ये, कधी गोठ्यात तर कधी एखाद्या ट्रकखाली आसरा घेऊन राहावे लागे. त्याचा परिणाम असा झाला की, बोरलॉग आजारी पडले व ते वैतागले व आपणास वेड लागते की काय असेही त्यांना वाटू लागले.

परंतु मेक्सिकोतील लोकांची ही हलाखीची स्थिती पाहून या लोकाना मदत, मार्गदर्शन व उपदेश याची अत्यंतिक गरज आहे, असे बोरलॉगला वाटू लागले. जमिनीची मशागत कशी करावी, रोगापासून पिकाचे रक्षण कसे करावे, या बाबतीत त्यांना मार्गदर्शन करा-

यला हवे हे बोरलॉगला जाणवले. गहू आयात करण्यासाठी लागणारा पैसा जर मेक्सिकोतील जमिनीत व शेतकऱ्याच्या खिशात गेला तर या लोकांची उन्नती होईल, असे बोरलॉगला वाटू लागले.

नोव्हेंबर १९४४ मध्ये आपल्या फिरतीच्या प्रवासाहून परतल्यावर त्यांना मार्गारेटचे पत्र मिळाले. त्यात त्यांना दुसरे अपत्य झाल्याचे व ते जन्मतःच भयानक आजाराने पछाडलेले असल्याने, त्याची फार दिवस जगण्याची आशा नसल्याचे मार्गारेटने लिहिले होते. अशा कौटुंबिक अडचणीच्या परिस्थितीत ते अमेरिकेत मार्गारेटला भेटावयास गेले. तेव्हा ते इतके निराश झाले की, पुन्हा मेक्सिकोला न जाण्याचा त्यानी आपल्या मनाशी निर्णय घेतला. एवढेच नव्हे तर पूर्वीच्या आपल्या कंपनीतच नोकरी करण्याचे त्यांनी ठरविले.

त्यानी आपला हा निर्णय मार्गारेटला सांगताच तिने मोठ्या बाणेदारपणाने आपल्या पतीस धीर दिला. आपण या लहान मुलाकरिता एवढे निराश होऊ नये. माझ्या या लहान मुलास भवितव्य नाही पण माझ्या पतीला उज्वल भवितव्य असल्याने तुम्ही मेक्सिकोला जायलाच हवे असे ती मोठ्या निर्धाराने बोरलॉगना म्हणाली आणि मग १९४५ मध्ये बोरलॉग मेक्सिकोला परत आले आणि आपले दुःख विसरण्यासाठी त्यानी स्वतःला कामात गुंतवून घेतले.

मेक्सिकोजवळच चिपांगो येथील १५० एकर शेतातील गव्हावर त्यानी संशोधन करावयास सुरुवात केली. बियाण्याची पाकिटे वगैरे पाहिल्यावर 'मला फक्त हवा, जमीन व सूर्यप्रकाश यांची जरूरी आहे, तसेच काही शेतकऱ्याच्या भेटी घेणे आवश्यक आहे', असे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितले. नंतर शेतकऱ्यांकडून मका व गहू या पिकांची माहिती घेतली. अपार कष्ट केले आणि प्रत्येक बियाण्याचा निरनिराळ्या परिस्थितीत अभ्यास केला. आपल्या संशोधनात बोरलॉगला गव्हावर नारिंगी ठिपके दिसले व या तांबेऱ्याच्या ठिपक्यामुळे पुढील अनर्थाची कल्पना बोरलॉगसमोर उभी राहिली. मेक्सिकोमध्ये तोपर्यंत तांबेऱ्याचा प्रतिबंध करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न झाला नव्हता किंवा शेतकऱ्यांना पण याबाबतीत माहिती दिली गेली नव्हती.

बोरलॉग यानी त्यांच्या मेक्सिकोतील दौऱ्यात एक गोष्ट विशेष जाणवली ती ही की, मेक्सिकोतील अधिकाऱ्यांबद्दल तेथील शेतकऱ्यांना अत्यंत घृणा व तिरस्कार वाटे. अधिकारी वर्ग शेतकऱ्याना मदत व मार्गदर्शन करताना शेतकऱ्याला अडाणी, मूर्ख व आळशी समजत होते. म्हणून शेतकरी त्यांना रक्तशोषण करणारे जळवे म्हणत असत. मेक्सिकोची कृषि प्रगती खुंटण्यास हे महत्त्वाचे कारण असल्याचे डॉ. बोरलॉग यांचे निदर्शनास आले. बोरलॉग यांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून बियाणे जमा करून पिकात सुधारणा घडवून आणली. इ. स. १९४६ मध्ये चिपागो येथे पहिल्यादा १८०० जाती लावल्या. गव्हाचा प्रमुख शत्रू म्हणजे तांबेरा. काळ्या तांबेरा रोगावर प्रतिबंधक जात शोधण्याचा अभ्यास बोरलॉगने सुरू केला. या वेळपर्यन्त काळ्या तांबेऱ्याच्या सुमारे ३००० प्रजाती अस्तित्वात होत्या. त्यामुळे त्यांचे संशोधनाचे काम मोठेच जिकिरीचे होऊन बसले.

मेक्सिकोतील गव्हाच्या शेतात काम करीत असताना बोरलॉगना असे आढळून आले की, त्यावेळची गव्हाची एकही जात मेक्सिकोकरिता योग्य नव्हती. मेक्सिकोतील सर्वात चांगल्या जातीपासून दर एकरी फक्त सुमारे ११ बुशेल उत्पन्न मिळे.

**शेतात काम करीत असताना झाडे आपल्याशी बोलतात व आपल्या वाढीकरिता आणि आरोग्याकरिता काय पाहिजे हे सांगतात, असे बोरलॉग आपल्या मेक्सिकन मित्रांना सांगत असत.**

मेक्सिकोच्या उत्तरेकडील याकी व्हॅली गव्हासाठी प्रसिद्ध होती. तेथील रॉबर्टो माउरेर या शेतकऱ्याबरोबर गव्हाच्या पिकासंबंधी बोरलॉगने बरीच चर्चा केली, तेव्हा त्याने गव्हाच्या काही जातीबद्दल बोरलॉगला बरीच उपयुक्त माहिती दिली. गव्हाची 'बॅरिंग्टन' जात रोगास प्रतिकारक असल्याचे त्यांनी सांगितले पण तिची प्रत फार हलकी असल्याचेही त्याने बोरलॉगला सांगितले. बोरलॉगने, त्या भागातील शेतीविषयी एखादे संशोधन केन्द्र आहे काय, असल्यास तेथे काय काम चालते यासंबंधी माहिती मिळविण्याचे ठरविले. तेव्हा भूतपूर्व प्रेसिडेंट डॉन राडाल्फो कॅलस यांनी इ. स. १९३० मध्ये असे संशोधन केंद्र सुरू केल्याचे समजले. पण त्यानंतर संशोधन केंद्राकडे दुर्लक्ष झाल्याचे समजले. जमिनीच्या सुपिकतेबद्दलही चौकशी केली. यॅाकी व्हॅलीमध्ये गव्हाचे उत्पादन चागले होईल, असे त्यानी आपल्या सहकाऱ्याना सांगितले असता त्यांचे सहकारी बोरलॉगना विरोध करू लागले. त्यांचे म्हणणे असे होते की, आपणास अगदी दुर्बल घटकासंबंधी काम करावयाचे आहे आणि यॅाकी व्हॅली सोनोरा हा भाग त्यामानाने बराच प्रगत आहे. तर बोरलॉगचे मत असे होते की, देशाच्या प्रगतीसाठी विशिष्टच भाग घ्यावा किंवा घेऊ नये असे नसून ज्यामुळे झपाट्याने पुढे जाता येईल त्या भागातही काम करण्यास हरकत नसते. आपल्या सहकाऱ्यांच्या विरोधास न जुमानता त्यांनी सोनोरा भागास भेट देण्याचे ठरविले. सोनोरा मेक्सिकोपासून सुमारे १८०० कि. मी. दूर होते. प्रवासाच्या सुखसोईही नहत्या. पण बोरलॉगने साऱ्या गोष्टीना तोंड द्यायचे ठरविले. त्यांनी त्या भागातील संशोधन केंद्र पाहिले. ते बरेचसे दुर्लक्षिलेले दिसले. त्यानी त्या भागातील तलावांची पाहणी केली आणि इतरही खूप माहिती मिळविली. त्यासाठी त्यांना खूपच कष्ट सहन करावे लागले. प्रवासातील दगदग तर होतीच पण राहण्याचीही सोय नव्हती. त्याना तीन दगडाची चूल मांडून त्यावर जेवण तयार करावे लागले. अडगळीच्या खोलीत झोपावे लागले. त्या खोलीतील उंदरांचा त्रास सहन करावा लागला. पण आलेल्या अडचणींनी बोरलॉग निराश झाले नाहीत.

बोरलॉगने आणखी काही भागात प्रवास केला तेव्हा त्यांना तांबेऱ्याच्या तीन प्रकाराची माहिती मिळाली. तेथील शेतकरीही त्यांना अधिक प्रगतिशील वाटले. तेव्हा या भागात काम केल्यास मेक्सिकोची अन्नटंचाई लवकर दूर करता येईल. याची त्याना खात्री पटली आणि सोनोरा भागात प्रवास केल्याचे सार्थक झाले, असेही त्यांना वाटू लागले. चिपागो येथे त्यानी पेरलेल्या गव्हाच्या जातींपैकी दोन जाती त्यांना तांबेरा प्रतिबंधक असल्याचे दिसून आले. या जातीचा शक्य तितक्या लवकर प्रसार करण्यासाठी बोरलॉगने यॅाकी येथे एका हंगामात व चिपागो येथे दुसऱ्या हंगामात पेरणी करून एका वर्षात दोनदा पीक घेण्याची कल्पना साकार केली. ही कल्पना

परंपरागत पैदासशास्त्रापेक्षा वेगळी असल्याने बोरलॉगला त्याचे मेक्सिकोतील व अमेरिकन मित्राकडून विरोध झाला. परंतु बोरलॉगना स्वतःच्या कामाविषयी खात्री होती व त्यानी त्याच्या कल्पनेप्रमाणे काम केले. ह्या त्यांच्या प्रयत्नांमुळे गव्हाच्या उत्पादनात नेहमीचा कालावधी कमी कमी होऊन, शिवाय तांबेरा प्रतिबंधक जातीच्या निर्मितीत फार मोलाची भर पडली. बोरलॉग याच्या मते दोन हंगामात व दोन अक्षांशामुळे पिकाच्या मूळ रचनेत फरक पडत नाही. त्याचा हा विचार शास्त्रशुद्ध ठरला. चिपागो येथील गव्हाच्या जाती 'याकी' टेकड्यात, लावताना बोरलॉग याना अनेक अडचणीना तोंड द्यावे लागले. अहंकार, प्रवासाची गैरसोय, जमिनीची वेळेवर योग्य मशागत इ. कितीतरी अडचणी बोरलॉगसमोर होत्या. एवढेच नाही तर जमीन तयार करण्यासाठी लागणारी अवजारेही त्यांना मिळू शकली नाहीत. तेव्हा त्यांनी स्वतः नांगर ओढला. केवढी ही चिकाटी. केवढा हा दांडगा आत्मविश्वास !

आपणास चांगल्या वाटणाऱ्या जाती बोरलॉगना इतर शेतकऱ्यांच्या शेतात लावून त्याची क्षमता अजमावून पहावयाची होती. त्यासाठी त्यांनी तीन मदतनीस घेतले. पण ते जेव्हा अगदी पांढरा स्वच्छ पोशाख करून शेतात कामाला आलेले बोरलॉगनी पाहिले तेव्हा बोरलॉग त्याच्यावर खूप रागावले, कारण पांढरे कपडे घातलेले अधिकारी शेतात, प्रत्यक्ष मातीत काम कसे काय करणार, या मताचे बोरलॉग होते. बोरलॉगचे हे तत्व किती प्रामाणिक आणि श्रेष्ठ आहे हे सांगावयास नकोच.

शेतकऱ्याच्या काही वेडगळ समजुती, अंधश्रद्धा असल्याचेही बोरलॉगच्या प्रत्ययाला आले. एका शेतकऱ्याने आपल्या शेतात लोखंडी नांगर चालविण्यास विरोध केला. त्याचे म्हणणे असे की, जमिनीस लोखंड लावल्याने तिची उष्णता निघून जाईल व जमीन नापीक होईल. तेव्हा बोरलॉगने त्याची समजूत घातली. असल्या वेडगळ समजुतीनी आणि अधिकाऱ्याच्या प्रतिष्ठेचा हव्यासामुळे मेक्सिकोतील लोक उपाशी रहात असल्याचे बोरलॉगने तेथील शेतकऱ्याना व अधिकाऱ्यानाही सांगितले. मानवतेची सेवा करणाऱ्या बोरलॉगचा स्पष्टवक्तेपणा आणि निर्भिडपणा त्याच्या आंतरिक तळमळीतून निर्माण झाला होता.

चिपागो येथे तयार झालेली सुप्रिमा, केनिया, राहो इत्यादी जातीची बियाणे सोनोरा येथे लावण्याचे बोरलॉगने ठरविले. पण तेथील संशोधन केंद्राची शोचनीय अवस्था पाहून बोरलॉगना मनस्वी वाईट वाटले. ते केंद्र सुधारावे अशी त्याना आत्यंतिक तळमळ लागलेली असूनही त्यावेळच्या परिस्थितीत त्याना एक केंद्र सुधारण्याचे काम अतिशय अवघड होते. शिवाय तेथील शेतकऱ्यांचा असहकार बोरलॉगने जमीन तयार करण्याकरिता जनावरे, अवजारे इ. आवश्यक गोष्टी तेथील स्थानिक शेतकऱ्याकडे मागितल्या त्यावेळी प्रत्ययास आलेल्या होताच. त्यांनी मदत तर केली नव्हतीच, उलट बोरलॉग करीत असलेल्या कामाविषयी टिंगल करून तुच्छता दर्शविली आणि याला कारण म्हणजे त्याना आपल्या अधिकाऱ्याबद्दल वाटणारा तिरस्कार. त्यांच्या या अशा वागण्याने बोरलॉगना खूप संताप आला आणि त्याचबरोबर भीक मागण्याचाही कंटाळा आला. पण पेरणी वेळेवर होणे आवश्यक होते. त्यासाठी दुसऱ्या दिवशी केंद्रातील एका नोकराच्या मदतीने त्यांनी लाकडी नांगर काढला, तो दुरुस्त केला व स्वतः तो नांगर ओढला. दोन तास त्यांनी स्वतः नांगर ओढल्याने सारे अंग ठणकू लागले होते. पण तरीही संध्याकाळी त्या तयार केलेल्या जमिनीत त्यांनी डझनभर जाती लावल्या. दुसऱ्या दिवशीही असेच काम केले. तिसऱ्या दिवशी केंद्राजवळच राहणारा एक शेतकरी त्यांच्याजवळ आला आणि विचारू लागला की, तुम्ही असे शिपायासारखे, कामगारासारखे काम का करीत आहात ? तेव्हा बोरलॉगने त्याला उत्तर दिले की, 'मी थोड्याच दिवसात गव्हाची एक नवीन जात शोधून काढणार आहे. या हंगामात जर हे बी लवकर तयार झाले तर पुढच्या हंगामात दुसऱ्या भागात देता येईल !' बोरलॉगच्या या उत्तराचा त्या शेतकऱ्यावर खूपच परिणाम झाला आणि मग त्याने आपली अवजारे त्यांना दिली. तीन दिवसांच्या मेहनतीनंतर बोरलॉगना ही मदत मिळाली.

नंतर बोरलॉग मेक्सिकोला परतले. त्यांना यॉकी खोऱ्यात तयार झालेल्या पिकाची कापणी करावयाची होती. त्यासाठी तयारी करणे आवश्यक होते. त्यांनी बाजारातून मशीनचे जुने व सुटे भाग विकत आणून मशीन तयार केले. परंतु प्रतिष्ठित डायरेक्टर हॅरॉर हे बोरलॉगच्या यॉकी खोऱ्यात जाण्याच्या अगदी विरुद्ध होते. हॅरॉर चे मत असे की, आपणास येथील दारिद्र्याविरुद्धची मोहीम जिंकायची आहे, तर बोरलॉगचे म्हणणे असे होते की, याकी खोऱ्यात खरी क्षमता आहे आणि या क्षमतेचा उपयोग आपण देशाच्या दारिद्र्यावर मात करण्यासाठी करून घ्यायला हवा. आपला यॉकी खोऱ्यात काम करण्याचा मार्गच बरोबर आहे, असेही त्यांनी हॅरॉरला सांगितले.

बोरलॉग अतिशय कष्ट करून निरनिराळ्या जातीची निर्मिती करीत होते. ते काम झपाट्याने होण्यासाठी संशोधन केंद्राबरोबरच त्यांना चांगल्या शेतकऱ्यांच्या शेतावर या नवीन गव्हाच्या जातीची चाचणी करावयाची होती. याकी खोऱ्यात पिकांची कापणी करून परतत असताना बोरलॉगला तांबेऱ्याने उध्वस्त झालेली शेते दिसली. ओंब्यामधील दाणे सुरकतून गेलेले दिसत होते. अशा एका शेताची पाहणी करीत असताना तर एका शेतकऱ्याने बोरलॉगला 'आमचे शेतात आपण काय करीत आहात' असे दरडावून विचारले. या त्याच्या वागण्यातून मेक्सिकन शेतकऱ्याची आपल्या सरकारी अधिकाऱ्याविषयीची घृणाच व्यक्त होत होती. पण मग बोरलॉगच्याबरोबर असलेल्या माणसाने त्याचा 'ग्रेट अमेरिकन फाउंडर' असा परिचय करून देऊन त्यांच्या कार्याची रूपरेखाही सांगितली. बोरलॉग हे तांबेरा-प्रतिबंधक जाती तयार करीत आहेत, ते येथील बी 'तोलुका' येथे चाचणीकरिता नेत आहेत, लवकरच ते शेतकऱ्यांना तांबेरा–प्रतिबंधक जाती विपुल प्रमाणात उपलब्ध करून देतील, असे त्या माणसाने सांगताच त्या शेतकऱ्याला खूपच आश्चर्य वाटले. त्याने बोरलॉगला एकदम मिठी मारली आणि आपणास थोडे तरी बियाणे देण्याबद्दल त्यांना विनंती केली. बोरलॉगला बियाण्याचे पद्धतशीर गुणन करावयाचे असल्याने ते त्या शेतकऱ्याला बियाणे देण्याला जरा नाराज होते. पण त्या शेतकऱ्याने जेव्हा मिळणारे बी शेजारच्या इतर शेतकऱ्यांना देण्याचे वचन दिले त्यावेळी बोरलॉगने त्याला थोडे बियाणे दिले.

पुढच्या हंगामात यॉकीहून आणलेले बियाणे पेरल्यावर बोरलॉगला असे आढळून आले की, ते बी गोड असल्याने पक्षी खाऊन टाकीत आहेत. तेव्हा त्यानी आपल्या सहकाऱ्यांसह रात्री अंधार पडेपर्यंत राखण केली. नंतर काही बी चिपांगो येथे रूपार्टच्या ताब्यात देऊन ते स्वतः सुमारे ७००० फूट उंचीवर असलेल्या तोतुकाला सुप्रिमा, फान्टेरा व केनियाचे प्रत्येकी दोन पौंड बियाणे घेऊन गेले. तेथे त्याचे मित्र स्पूरलॉग याच्याकडे ते गेले. त्यावेळी स्पूरलॉग घरी नसल्याने त्यांच्या पत्नीजवळच त्याना एखाद्या सुरक्षित जागेबद्दल विचारले. तिने आपल्या घरात भिंतीत बसविलेली तिजोरी असल्याचे सांगितले. त्यात नोकरांच्या पगाराची मोठी रक्कम असल्याचे त्यांना सागण्यांत आले. पण बोरलॉगने आपल्या मित्राच्या पत्नीला तिजोरीतील ते सर्व पैसे बाहेर काढायला लावून आपण आणलेले बियाणे त्या तिजोरीत ठेवले. एवढेच नाही तर ते बियाणे हजारो रुपयांपेक्षा अधिक किमती असल्याचे सांगितले.

बोरलॉगने काही शेतकऱ्यांना ते बी दिले व त्याचबरोबर पिकाला नत्र खत देण्यासही सांगितले. यावेळेपर्यंत मेक्सिकन शेतकऱ्यांना नत्र खताचा वापर माहित नव्हता इतकेच नव्हे, तर ते त्याला विष मानीत.

बोरलॉगचे कार्यक्षेत्र आता बरेच व्यापक बनले होते. शेतकऱ्यांकडून बियाण्याची मागणी वाढत होती एवढेच नाही, तर बियाणे अपुरे पडत होते. शेतकरी तांबेरा–प्रतिबंधक बियाणे व खते वापरण्यावर भर देऊ लागले होते. याचवेळी एक शेती पदवी शिक्षण घेत असलेला विद्यार्थी नारवेझ याने बोरलॉगकडे कामास येण्याबद्दलची इच्छा व्यक्त केली आणि बोरलॉगने त्याला होकार देऊन आपल्याकडे कामाला येण्याबद्दल सांगताच त्याला आपल्यासाठी स्वर्गाचे दारच उघडले, असे वाटू लागले. त्याला अपरिमित आनंद झाला. शिक्षण पूर्ण झाल्यावर तो बोरलॉग बरोबर काम करू लागला.

तोतुका व बोहिओ या भागात मात्र गहू नीट वाढत नव्हता. ते रॉकफेलर प्रतिष्ठानचे कार्यक्षेत्र होते. कारण तेथील जमीन नापीक झालेली होती. त्याउलट चिपांगो येथे मात्र गहू चांगला येत होता. रॉकफेलर प्रतिष्ठानची सल्लागार समिती मेक्सिकोतील काम पहावयास आली असता बोरलॉगचे गुरू स्टॅकमन यांनी याकीचे बियाणे चिपांगोला चांगले वाढत असल्याचे पाहून आनंद व्यक्त केला. पण त्याचे डायरेक्टर हॅरॉर मात्र अजूनही आपला विरोध दर्शवित होते. त्याच्या मते फक्त बोहिओ भाग एवढेच त्याचे कार्यक्षेत्र होते.पण बोरलॉगच्या मते मात्र, याकीमधील कार्यक्रम हा गव्हाच्या उत्पादनाच्या दृष्टीने खूपच महत्वाचा होता. बोरलॉगने तर डायरेक्टरला एकदा असे सांगितले की, 'तुम्ही एका बाजूला मेक्सिकोच्या लोकाना पुरेसे अन्न देण्याचा प्रयत्न करावयास सांगता आहात आणि दुसऱ्या बाजूने माझ्यावर नियंत्रण लादता आहात, हे मला मान्य नाही. मी राजीनामा देत आहे. तुम्ही माझ्याऐवजी दुसऱ्या कुणाची नेमणूक करा.'

अशा रीतीने हॅरॉरशी निकराचे बोलणे करून घरी परतलेल्या बोरलॉगच्या हाती, हॅरॉरला एका शेतकऱ्याने लिहिलेल्या पत्राची प्रत पडली. त्या पत्रात बोरलॉगने दिलेल्या गव्हाच्या जातीची खूपच स्तुती केलेली होती. शिवाय रॉकफेलर प्रतिष्ठानने हाती घेतलेल्या समाजकार्याबद्दल बोरलॉग व हॅरॉर याचे आभारही मानलेले होते. आणखी त्याचबरोबर प्रतिष्ठान बोरलॉगला त्याच्या कामात अधिक सोई उपलब्ध का करून देत नाही, अशीही पृच्छा केली होती.

## स्वर्गीय देणगी देणारा देवदूत

दुसऱ्या दिवशी आपले सहकारी रूपार्टसमवेत ऑफिसमध्ये राजीनामा देण्यासाठी बोरलॉग आले असता स्टॅकमनने बोरलॉगची चांगलीच हजेरी घेतली. 'तुम्ही बिघडलेल्या मुलासारखे वागलात' असे खडसावले. स्टॅकमन बोरलॉगचे गुरू असल्याने त्यांनी स्टॅकमनचे बोलणे ऐकून घेतले व राजीनामा देण्याचेही रद्द केले. मात्र तेव्हापासून बोरलॉगना त्यांच्या इच्छेप्रमाणे, तत्वाप्रमाणे काम करण्याची परवानगी मिळाली. मग सहाजिकच बोरलॉगने यॉकी खोऱ्यात मोठा कार्यक्रम हाती घेतला. अनेक शेतकऱ्याना नवीन बियाणे देण्यास सुरुवात केली. बोरलॉगचा उत्साह व त्याचबरोबर त्याची लोकप्रियताही वाढली कामाचा व्याप खूपच वाढला. बोहिओमध्ये ज्या शेतकऱ्याना त्यांनी बियाणे दिले होते त्यांनी तर बोरलॉग भेटल्यावर अक्षरशः त्यांच्या पायावर लोटांगण घातले. गव्हाचे नवीन बियाणे म्हणजे त्यांना जणू स्वर्गीय देणगी वाटू लागली आणि ती देणगी देणारा बोरलॉग त्यांना प्रत्यक्ष देवदूत वाटू लागला.

इ. स. १९५३/१९५४ मध्ये बोरलॉगने अभ्यासपूर्ण असे काही लेख लिहिले. तेव्हा त्या लेखांमुळे आंतरराष्ट्रीय संशोधकाचे लक्ष बोरलॉगकडे वेधले गेले. याकी व चिपांगो ही दोन केंद्रे जगातील गहू संशोधनाची मुख्य आकर्षणे बनली. जगाच्या कानाकोपऱ्यातून या संशोधन केंद्रात सकराकरिता बियाणे येऊ लागले. इ. स. १९५४ मध्ये बोरलॉगनाही आपल्या कामाबद्दल समाधान वाटू लागले.

याचवेळी मेक्सिको सरकारने सोनोरा भागात अगदी उच्च पद्धतीचे संशोधन करण्याकरिता रॉकफेलरच्या मदतीने 'सियानो' म्हणून स्वतंत्र यंत्रणा उभारली. इ. स. १९५५ साली बोरलॉगच्या संचालनाखाली मेक्सिकोने गव्हाचे दुप्पट उत्पादन केले. याच सुमारास नारीन ब्रेव्हर या ठेंगू जातीचे बियाणे त्यानी बियास शीतकरणाची प्रक्रिया देऊन रुजविले. यापासून निघालेल्या रोपट्याने बोरलॉगचे लक्ष वेधून घेतले. या रोपास खूप फुटवे व जास्त दाणे असलेल्या ओंब्या पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांच्या आनंदाला उधाण आले. उत्साहाला अधिकच भरते आले. ठेंगू, जास्त उत्पादक, तांबेरा–प्रतिबंधक, शिवाय संवेदनाशील वाण त्यांना गवसले होते. डॉ. आलफ्रेडो, डॉ. जॉन गिब्लर यानी संकराकरिता तांबेरा–प्रतिबंधक शक्तीचे उत्कृष्ट वाण निवडून संकर केले. या संकरापासून योग्य असे बियाणे मिळते किंवा नाही याबद्दल मात्र ते साशक होते. या जातीबरोबर तांबेरा–प्रतिबंधक लर्मा रोझो या जातीचा संकर बोरलॉग यानी केला व नवीन जाती तयार केल्या.

इ. स. १९५६ साली मेक्सिकोने गव्हाचे विक्रमी उत्पादन काढले. या गहू क्रांतीच्या वेळी बोरलॉगजवळ ५०,००० जाती व संकर होते. बोरलॉगच्या या नेत्रदीपक यशास मेक्सिको येथील वृत्तपत्रानी खूपच प्रसिद्धी दिली. जिराईत भागातील उत्पन्न जेथे १० बुशेल होते ते आता ४५ ते ६० बुशेलपर्यंत वाढले होते. या उज्वल यशामुळे जगातील विकसनशील देशाचे लक्षही मेक्सिकोतील कार्यक्रमाकडे वळले. गहू उत्पादनाचा कार्यक्रम त्यांच्याही देशात सुरू करण्या-

बद्दल विचारणा करण्यात आली. तेव्हा असाच कार्यक्रम चिली देशात सुरू करण्याचे ठरले. बोरलॉग यांनी या नवीन कार्यक्रमाचे सचालक म्हणून डॉ. रूपर्ट यांची शिफारस केली.

इ. स. १९५७ साली बोरलॉग यानी आपला मुलगा विली यास याकीतील आपला कार्यक्रम दाखविला. आपल्या मुलाने आपल्या या नवीन जाती निर्मितीच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे अशी बोरलॉगची इच्छा होती. पण त्याची ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. विलीला जीवशास्त्राच्या अभ्यासात मुळीच रस नव्हता. त्याला अर्थशास्त्राची आवड असल्याने तो तिकडे वळला.

बोरलॉगचे गुरू स्टॅकमन यांना मात्र आपल्या आदर्श व विद्वान विद्यार्थ्याची, बोरलॉगची खूपच काळजी वाटू लागली होती. बोरलॉग बऱ्याच वर्षापासून सौ. मार्गारेटपासून दूर रहात होते आणि म्हणूनच स्टॅकमन यांनी बोरलॉगना गहू प्रकल्प सोडण्याचा सल्ला दिला. पण बोरलॉग यांनी ते मान्य केले नाही. त्याचे ध्येय त्याना अजून गाठायचे होते. त्यांनी सांगितले, 'मेक्सिकोतील शेतकऱ्याच्या स्वावलंबनाकरिता मी आतापर्यंत १३ वर्षात ४० जाती शोधून काढल्या आहेत आणि त्या जातींनी आता उच्च पातळीही गाठली आहे; पण आणखी नवीन जाती शोधून काढणे आवश्यक आहे.' याचवेळी मेक्सिको सरकार व रॉकफेलर प्रतिष्ठान यामध्ये वितुष्ट निर्माण झाले आणि त्यावेळचे मंत्री मेनोझ यांनी रॉकफेलरचे लोक अमेरिकेच्या हित-संबंधाकरिता मेक्सिकन शेतकऱ्यांचा उपयोग करून घेत आहेत, असे मत व्यक्त केले व त्यांनी मेक्सिको सोडून जावे असे फर्मान काढले. पण ज्या शेतकऱ्याना बोरलॉगच्या कार्याची माहिती होती त्यांनी सरकारकडे शिष्टमंडळ नेऊन बोरलॉगच्या कार्याचे महत्त्व आणि उपयुक्तता सरकारला पटवून दिली; शिवाय रॉकफेलर प्रतिष्ठानची रास्त भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. इतर देशात आमंत्रण असता-नाही बोरलॉग मेक्सिकन लोकांसाठीच झटत असल्याचे त्यांनी सागि-तले तेव्हा या शिष्टमंडळाच्या प्रयत्नांचा योग्य तो परिणाम झाला. पण रॉकफेलर प्रतिष्ठानचा कार्यक्रम यापुढे स्वतंत्र न राहता त्यावर मेक्सिको सरकारची देखरेख राहील, असे ठरविण्यात येऊन कार्यक्रम पुढे चालू राहिला.

इ. स. १९५९ साली बोरलॉग यांनी दक्षिण अमेरिकेतील ब्राझिल, बोलेव्हिया, पेरू, इक्वेडोरे या देशाच्या विनंतीनुसार त्या देशांची पाहणी केली. बोरलॉग यांनी वयाच्या ४६ व्या वर्षी मेक्सिकोतील गहू कार्यक्रमाच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेतली. बोरलॉग हे मेक्सिकन लोकांच्या प्रेमाचे व आदराचे स्थान बनले. ते बोरलॉगला उपकारकर्ता मानू लागले. बोरलॉगला संशोधनात यशाबरोबर कीर्ती तर मिळालीच, पण त्याचबरोबर अनेक लोकांचे प्रेमही लाभले. मेक्सिकन लोक त्यांना गव्हाच्या क्रांतीचे जनक संबोधू लागले. जाग-तिक शेती संस्थेनेही मध्य-पूर्व देशातील शेतीची पाहणी बोरलॉगने करावी अशी मागणी केली. पण ही मागणी मान्य झाली नाही. पण जेव्हा फेब्रुवारी १९६० मध्ये जागतिक अन्न संघटनेने मध्य-पूर्व देशात गहू व बार्लीच्या उत्पादनासंबंधी चालविलेल्या कार्यक्रमाबद्दल परि-संवाद आयोजित केला तेव्हा रॉकफेलर प्रतिष्ठानतर्फे बोरलॉग यांनी या परिसंवादात भाग घेतला. परिसंवादातील त्यांच्या विचाराचा चागलाच परिणाम झाला. या देशात गहू कार्यक्रम राबविण्यास चालना मिळाली. यावेळी जरी भारत देश यामध्ये सहभागी नव्हता तरीही प्रतिष्ठानचे कार्यालय दिल्लीत भारताचे अन्नधान्य समस्येची कारणे शोधीत होते.

## भारताच्या उपासमारीचा शोध

जागतिक अन्न संघटनेच्या वतीने संशोधक व प्रशासक गटांनी आफ्रिका, अल्जेरिया, लिबिया, इजिप्त, जॉर्डन, लेबेनॉन, पाकिस्तान, इराण व भारत या देशांमध्ये दौरा काढून तेथील अन्नधान्य-टंचाई कशी दूर करता येईल यासंबंधी अभ्यास करण्यास सुरवात केली. या दौऱ्याच्या वेळी बोरलॉगला भारतात उपाशी लोक जास्त असल्याची जाणीव झाली. शिवाय भारतातील लोक जमीन व तिला लागणारे द्रव्ये याबाबतीत पूर्णपणे निष्काळजी असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आले. एवढेच नाही तर येथील सामाजिक परिस्थिती वैज्ञानिक प्रगतीच्या अगदी विरुद्ध दिसली. रॉकफेलर प्रतिष्ठानच्या सदस्यांनी असा निष्कर्ष काढला की, भारतातील शास्त्रज्ञ हे ब्रिटिश राजवटी-तील वातावरणातच वावरत असून ते शेतकऱ्याना काही मदत करीत नाहीत. येथील शिक्षण हे निरुपयोगी असून येथील पदवीधरांच्या पदव्या केवळ पुस्तकी ज्ञानावर आधारलेल्या आहेत, त्यांना व्याव-हारिक पाया नाही. येथील पदवीधराना सत्य शोधण्याची तळमळ नाही. भारतात नैसर्गिक संपत्ती भरपूर असूनही जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा भारतात उपासमार जास्त आहे आणि याला कारण म्हणजे भारताची वाढणारी भरमसाठ लोकसंख्या. त्याच-बरोबर आणखी एक कारण म्हणजे, भारतीय संशोधकांना विकासाची तळमळ वाटत असली तरी नोकरशाहीमुळे विकास घडवून आणणे अवघड झाले आहे. आशियात विद्वत्ता आहे आणि तिचा योग्य उपयोग केला गेला तर भारताच्या समस्या सुटतील अशी त्यांची खात्री झाली. त्यासाठी तरुणांना शिक्षण देऊन नवीन रक्ताला, नवीन विचारांना वाव देणे आवश्यक आहे. तसेच नवीन साधनसामुग्रीचा वापर व जमिनीला पुरेसे अन्न द्यायला हवे, असे मत त्यानी व्यक्त केले. मात्र त्यासाठी तरुणांनी कष्ट उपसण्याची व पडेल ते काम करण्याची तयारी ठेवणे आवश्यक होते.

या वेळपर्यंत नवीन नारीन ठेंगू जातीने बरेच यश मिळविले होते. अमेरिकेत गव्हाच्या उत्पादनाचा दर एकराला २१६ बुशेल असा विक्रम गाठला होता. पण अमेरिकेतील गहू हे प्रकाश संवेदनात्मक तर बोरलॉगच्या मते ठेंगू गहू हे प्रकाश–असंवेदनात्मक असल्याने जगात फार मोठ्या क्षेत्रात उपयोगात आणण्यास योग्य होते.

भारतात इ. स. १९६२ मध्ये पहिल्यांदा ठेंगू जातीचे बियाणे तांबेरा–प्रतिबंधक नर्सरी योजनेखाली दिल्लीत आले. दिल्ली येथील कृषि अनुसंधान संस्थेच्या शेतात झुडुपासारखी उगवणारी चार रोपटी भारतीय शास्त्रज्ञ डॉ. स्वामीनाथन याचे दृष्टीस पडली. वास्तविक डॉ. बोरलॉग आणि डॉ. स्वामीनाथन हे दोघे समान विचाराचे शास्त्रज्ञ जगाच्या दोन टोकाला सारख्याच ध्येयाने काम करीत होते. एकमेकापासून खूप दूर. एकाच ध्येयाने प्रेरित झालेले, पण कार्यक्षेत्र एकमेकांपासून खूप दूर. त्या दोघांच्या मते तांबेरा व उंची गव्हाच्या उत्पादनाच्या दृष्टीने हानिकारक होते. इ. स. १९६२ मध्ये बोरलॉगला भारतात बोलावण्यात आले. तेव्हा त्यांच्याजवळ सोनोरा ६४ व

लर्मा रोहो ६४ या नवीन जाती होत्या. बोरलॉगने भारतातील ६० कोटी लोकाना पुरेसे अन्न वस्त्रे देता येणे शक्य असल्याचा रिपोर्ट डॉ. स्वामीनाथनना दिला. बोरलॉगचे मते, अन्न व शांतता या दोन्ही गोष्टी जागतिक घडामोडीत एकमेकांपासून वेगळया करता येणार नाहीत. भारतातील पुरेशा अन्नोत्पादनाबाबत त्याना विश्वास होता. पण त्याचबरोबर फार मोठे धैर्यही आवश्यक होते.

भारतात मेक्सिकन जातीपासून चांगले उत्पादन येईल अशी बोरलॉगला खात्री वाटत असल्याने त्यांनी भारत व पाकिस्तानात अन्नधान्य उत्पादनाची चुरशीची भावना निर्माण करून भारतात ९०० पौंड सोनोरा ६४ हे बियाणे पुरविले.

१९६३ साली मेक्सिकोचे प्रेसिडेंट परदेश दौऱ्यावर असताना त्यांना मेक्सिकोच्या प्रगतीबद्दलचे प्रशंसोद्गार लोकाकडून ऐकावयास मिळाले. तेव्हा या प्रगतीला कारणीभूत ठरलेल्या डॉ. हॅरॉर, बोरलॉग व वेल हाऊस यांचे त्यांनी अभिनंदन केले आणि मेक्सिकोप्रमाणे जगातील विकसनशील देशातही प्रगती व्हावी, अशी इच्छा प्रगट केली. त्यानुसार ऑक्टोबर १९६३ मध्ये मेक्सिकोतील उपक्रमाचे आतरराष्ट्रीय कार्यक्रमात रूपांतर केले. जगातील गहू कार्यक्रमाचे पहिले संचालक होण्याचा मान बोरलॉगना मिळाला. त्यामुळे सहाजिकच बोरलॉगच्या कामाचा व्याप वाढला. त्यामुळे कुटुंबातील मंडळीकडे लक्ष देण्यासही पुरेसा वेळ मिळेनासा झाला त्यांचा मुलगा व मुलगी अमेरिकेत शिक्षणासाठी गेल्याने सौ. मार्गारेट घरी एकटयाच असायच्या. हा एकटेपणा विसरण्यासाठी त्या वाचनात आपले मन गुतविण्याचा प्रयत्न करीत असत. त्या म्हणायच्या, 'प्रेमाच्या भरात फार मोठया विद्वान माणसाशी लग्न केल्याने मला चागल्याबरोबर वाईटाचाही स्वीकार करावयास पाहिजे'

१९६३ साली नवीन बियाणे पूर्वीच्या दहा पट उत्पादन देऊ शकतील अशी डॉ. स्वामीनाथन यांची खात्री पटली. पण बोरलॉगच्या मते बियाणे हे एक साधन होते. या साधनाचा योग्य उपयोग करून घेण्याकरिता आधुनिक लागवड पद्धतीची सूत्रे अमलात आणणे आवश्यक होते. १९६४ च्या सुमारास हरित क्रांतीची चिन्हे दिसू लागण्यास सुरुवात झाली होती. पण नेहमीप्रमाणे भारतातील संशोधक व अधिकारी वर्ग यांनी बोरलॉग याना भारतीय रूढी, प्रथा माहित नाहीत व त्यामुळे त्याची हरित क्रांतीची स्वप्ने चुकीची आहेत, अशी टीका करावयास सुरुवात केली. त्यावेळी बोरलॉगने त्यांना अगदी समर्पक उत्तर दिले. ते म्हणाले, 'जगात कोणत्याही कोपऱ्यात जा; माणसाचे पोट एकाच प्रकारचे असते. त्यामुळे माणसाला पहिल्यांदा पोटासाठी पुरेशा अन्नाची गरज असते!'

भारतातील गहू कार्यक्रमाकरिता कॅनेडियन शास्त्रज्ञ डॉ. अँडरसन यांची निवड करण्यात आली. ते १५ ऑगस्ट १९६४ ला भारतात आले. त्यांनी भारतातील शास्त्रज्ञांच्या सहकार्याने भारतातील गहू उत्पादनाचा कार्यक्रम आखला. आणि त्याच वर्षी त्या कार्यक्रमाला अगदी थोडया प्रमाणात सुरुवातही झाली. मेक्सिकोहून बियाणे मागविण्यात आले. मेक्सिकोची बियाणे परदेशी पाठविण्यापर्यंत जी प्रगती झाली त्यामुळे आनंदित होऊन मेक्सिकोच्या शेतकऱ्यांनी ही प्रगती घडवून आणणाऱ्या बोरलॉगना ५००० डॉलरचा चेक अर्पण करून त्याच्याबद्दलची कृतज्ञता प्रगट केली. पण बोरलॉगने निःस्वार्थीपणे तो चेक परत केला.

भारतात आणि पाकिस्तानात अन्नधान्य उत्पादनाची क्षमता विपुल प्रमाणात असल्याची बोरलॉगची खात्री होती आणि म्हणूनच ते स्वतः कष्ट करीत होते. त्यांना ऑफिसच्या खोलीत बसून राहण्याचा कटाळा येई. ते म्हणत, 'मला स्वच्छ हवेत शेतात राहणे आवडते. मला भिंतीत अडकून राहणे आवडत नाही.' आणि आपल्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे आचरणही होते. त्याचा प्रत्यय त्यांनी रॉकफेलरच्या ऑफिसची जबाबदारी स्वीकारली तेव्हा सर्वांनाच झाला.

एकदा पाकिस्तानने विकत घेतलेल्या बियाण्याच्या चेकसंबंधी काही तरी घोटाळा झाला होता. तेव्हा त्यांच्या प्रशासनास दोष देण्यात येऊ लागला असता त्यानी कार्यालयाची जबाबदारीची कामे करण्याचेच नाकारले. त्यानंतर त्यांना ऑफिसच्या कार्यालयाचा फोन आला असता आपण आजारी असल्याची थाप त्यांनी ठोकून दिली.

भारतात गहू कार्यक्रमाची ते मोठया आस्थेने चौकशी करीत असत. वारंवार भारतास भेटी देत. १९६७ साली भारतात मोठा दुष्काळ पडला. त्यावेळी ७ लाख एकर जमिनीत गव्हाचे पिक डुलत होते. बोरलॉग यानी त्या वेळी बऱ्याच भागातून दौरा केला. शेकडो शेतकऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. नवीन जातीच्या लागवडीत येणाऱ्या अडचणीचा शोध घेतला. काही शेतकऱ्यानी नवीन बियाणे खोल पेरल्याने कमी प्रमाणात उगवले होते, तर काही ठिकाणी खताच्या वापराची अडचण दिसली. एका समारंभात बोरलॉगने सांगितले की, मी तुमच्या लोकसभेचा मेंबर असतो तर दर १५ मिनिटाला खतांसंबंधी बोलत राहिलो असतो. भारतीय शेतीच्या संबंधात खताचे एवढे महत्त्व होते. उत्पादन कार्यक्रमास अधिक गती मिळावी म्हणून भारताचे तेव्हाचे शेतीमंत्री सुब्रम्हण्यम यांनाही ते भेटले. श्री. सुब्रम्हण्यम याना बोरलॉगच्या कार्यक्रमाचे महत्व पटलेच होते. प्रशासनाच्या वेगवेगळया मंत्र्याना भेटून त्यानी शेतकऱ्यांकरिता खते व कूपनलिकाना अग्रक्रम देण्याची विनंती केली.

शास्त्रज्ञानी आपले शास्त्र कसे समाजोपयोगी आहे हे न घाबरता प्रशासनाच्या नजरेस आणून द्यायला हवे, हे बोरलॉग याचे वागण्यातून दिसून येते.

भारतातून बोरलॉग पाकिस्तानात गेल्यानंतर तेथेही नवीन जाती चांगल्या वाढत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तेथेही कार्याला गती येण्यासाठी त्यानी प्रेसिडेंट अयुबखानांची भेट घेतली. अयुबखान त्याच्याशी सहमत झाले. त्यानी ती योजना नीट आखून देण्यास बोरलॉगना सागितले आणि ती योजना राबविणार असे आश्वासनही दिले. एवढेच नाही तर कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी मदत करण्याचेही आश्वासन दिले. त्यामुळे अर्थातच पाकिस्तानातही या कार्यक्रमाला चागलीच गती मिळाली.

इ. स. १९६८ मध्ये नवीन मेक्सिकन जातीनी चागलीच पकड घेतली. नवीन जातीच्या बियाण्याची एकेक ओबी १४ (रु. ११०) डॉलरपर्यंत विकली जात होती. केवढी ही जबरदस्त पकड व प्रगती ! त्याचवेळी बोरलॉगनी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गाधीची भेट घेतली. भारतात अन्नधान्य उत्पादनाचे फार मोठे कार्य आपणास करावयाचे आहे व त्यासाठी संशोधकात उत्साह व सामर्थ्य निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यानी श्रीमती गाधींना सांगितले. श्रीमती गाधीनी जर या कार्यक्रमास पाठिंबा दिला व पुढाकार घेऊन

शतकऱ्यांना प्रोत्साहन दिले तर १९७० पर्यंत भारत जगातील नंबर तीनचा धान्य पिकविणारा देश होऊ शकेल असेही बोरलॉगने श्रीमती गांधीना सांगितले तेव्हा बोरलॉगच्या विचाराशी श्रीमती गांधी सहमत होऊन त्यांनी प्रोत्साहनही दिले.

डॉ. बोरलॉग यांनी भारतात ४ कोटी एकर जमीनीच्या उत्पादनासाठी पुरेसे पाणी असल्याचे श्रीमती गांधीनी सांगितले. त्यानाही ते विचार पटले. देशाच्या उन्नतीसाठी जे जे आवश्यक असेल ते ते करावयाचे ठरवून श्रीमती गांधीनी तशी योजना ताबडतोब आखली व त्याप्रमाणे अन्नधान्य उत्पादनाचे उद्दिष्ट ठरवले. १९६७ च्या सुमारास सौ. मार्गारेट बोरलॉग यांच्याबरोबर भारतात आल्या. परंतु ऐनवेळी बोरलॉगच्या कार्यक्रमात बदल झाल्याने त्यांना परत जावे लागले. मध्यंतरी विली हा आकोलहामा येथे शिक्षणासाठी गेला होता. तर बोरलॉगच्या मुलीचे म्हणजे जेनीचे विमानदलात नोकरी करणाऱ्या माणसाशी लग्न झाले होते. त्यावेळीही बोरलॉग लग्नाला हजर राहू शकले नव्हते. केवढा विचित्र योगायोग म्हणायचा हा ! कारण बोरलॉगच्या लग्नाच्या वेळी त्यांचे आई-वडील हजर राहू शकले नव्हते.

इ. स. १९६८ मध्ये जेनेटिक परिसंवादात गहू-पैदास व त्याचा जागतिक अन्न परिस्थितीवर परिणाम या विषयावर त्यांनी भाषण केले. त्यावेळी त्यांनी भारतातील आणि पाकिस्तानातील गहू उत्पादनातील क्रांतीची माहिती दिली. ही क्रांती म्हणजे अकस्मात व आपोआप होणारा बदल नाही किंवा एखादी जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे हा बदल झालेला नसून त्याला अनेक कारणे असल्याचे बोरलॉगनी सांगितले. त्यासाठी अविश्रांत आणि व्यावहारिक पातळी सांभाळून संशोधन करावे लागले होते. नवीन योजना धाडसीपणे राबविल्या गेल्या होत्या. अनेक अडीअडचणींना तोंड द्यावे लागले होते. हे सारे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. एवढेच नाही तर भारतात खताची टंचाई असून तेथील शेतीला खताचा पुरवठा होणे आवश्यक आहे आणि तो पुरवठा झाल्यास भारताचे शेतीपासून उत्पादन वाढेल असे सांगितले. अमेरिकन टीकाकारांनी भारताच्या शेतीबद्दल टीका करण्यापेक्षा त्यांना खत पुरवावे असे सुचविले. त्याचबरोबर संशोधकांचा एक वर्ग निर्माण होऊ पहात आहे, त्याची त्यांनी हेटाळणी केली. अनुमान न निघणाऱ्या संशोधनावर करोडो रुपये खर्च होत असल्याबद्दल नापसंती व्यक्त केली. संशोधकाने आपण करीत असलेला खर्च योग्य रीतीने होत आहे की नाही हे पाहण्याची आवश्यकता असल्याचेही सांगितले. त्यांच्या मते संशोधकाने कल्पना व पद्धतीमध्ये कॅटेलिस्टप्रमाणे वागले पाहिजे.

श्रीमंत देश चैनीखातर अशा रीतीने बराच खर्च अगदी सहजरीत्या करू शकत असले तरी गरीब देशाला ते शक्य नाही, असेही त्यांनी प्रतिपादिले. त्यावेळी बऱ्याच अमेरिकन शास्त्रज्ञांनी बोरलॉगवर कडक टीका केली. उलट ऑस्ट्रेलियातील वनस्पती संशोधन संघटनेचे प्रमुख डॉ. जॉन फॉक यांनी मात्र त्यांच्या विचाराचे समर्थन केले. त्यांनी बोरलॉगची स्तुती केली. याचवेळी अमेरिकेत बोरलॉगवर कडक टीका होऊ लागली. डॉ. विल्यम पॅडलॉक यांनी १९७५ च्या दुष्काळासंबंधी आणि अमेरिकेच्या विकसनशील देशात धान्य पुरवठा करण्याबाबतच्या धोरणावर मत मांडताना बोरलॉगवर कडाडून टीका केली. जगाला पुरेसे अन्न देण्यासाठी कृषि संशोधनावर अवलंबून राहण्यात काहीही अर्थ नाही; ते देण्यास कृषि-संशोधन असमर्थ आहे, असे त्यांनी म्हटले. पॅडलॉकने बोरलॉगच्या संशोधनाची टिंगलही उडविली. गव्हाच्या क्रांतीचे श्रेय बोरलॉगच्या संशोधनास न देता हवामानामुळे व चांगल्या पावसामुळे गव्हाच्या उत्पादनात क्रांती झाल्याचे त्यांनी सांगितले. बोरलॉग-संशोधित नवीन जातीमुळे क्रांती तर झाली नाहीच, उलट त्यामुळे कनिष्ट जाती मात्र उपयोगात आणल्या गेल्या, असे पॅडलॉकने प्रतिपादन करून बोरलॉगवर टीकेची झोड उठविली.

डॉ. पॉल एहरलीच यांनीही आपल्या 'लोकसंख्येचा बॉम्ब' या पुस्तकात, '१९७५ च्या दुष्काळात करोडो लोक अन्न-टंचाईमुळे मृत्युमुखी पडतील' असे भाकित केले. बोरलॉगने याही टीकेला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. लोकांनी चांगली बाजू लक्षात घ्यावी, योग्य दृष्टीने विचार करावा, असे त्यांनी लोकाना आवाहन केले.

## भारत–पाकिस्तानात क्रांती

इ. स. १९६९ मध्ये भारतात गहू उत्पादन वाढीचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. हा कार्यक्रम एवढा शिस्तबद्ध व मोठा होता की, त्यापुढे रशिया, कॅनडा, अमेरिका यांचाही कार्यक्रम फिका पडला. भारताच्या तुलनेने या सर्व देशांचा कार्यक्रम अगदीच मामुली ठरला. श्रीमती इंदिरा गांधीनी देशातील अन्नधान्य उत्पादनाचे उद्दिष्ट दहा कोटी टन निश्चित केले. या हरित क्रांतीच्या वेळी भारत आपली ६०% खताची गरजही भागवू लागला आणि गहू कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला. पाकिस्तानतही गहू कार्यक्रम यशस्वी ठरला. अशा रीतीने गहू उत्पादनात मेक्सिकन जातीमुळे क्रांती घडून आली. याला प्रमुख कारण म्हणजे, बोरलॉगचे परिश्रम. त्यांची चिकाटी आणि त्याचे संशोधन लक्षात घेऊन पाकिस्तानच्या अध्यक्षानी बोरलॉगला सर्वोच्च बहुमान 'सितारा-ए अिम्तिआज' बहाल केला. पाकिस्तानात अयुबखानांनंतर नवीन आलेल्या शासनाने शेतकऱ्यानी केलेले भरमसाठ उत्पन्न पाहून शेतकऱ्यांच्या गव्हाच्या किंमती, आधार किंमतीच्या २५ टक्क्याने कमी करून टाकल्या. शासनाने शेतकऱ्यावर केलेला हा अन्याय सहन न होऊन बोरलॉगने शासनास कळविले की, आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याकरिता शेतकरी लोक जिवापाड प्रयत्न करीत आहेत आणि अशा परिस्थितीत तुम्ही मात्र गव्हाच्या किंमती कमी करून ८० % लोकांचा विश्वासघात करीत आहात. त्यांच्या कष्टाचे चीज न करता त्यांच्यावर धडधडीत अन्याय करीत आहात. यावेळी सारासार विचारशक्तीने निर्णय घेण्याची आत्यंतिक गरज आहे. कारण अन्न-धान्याच्या बाबतीतील देशाची स्वयंपूर्णता ही देशाच्या प्रगतीस अत्यावश्यक आहे. बोरलॉगचे हे विचार लक्षात घेऊन नंतर मात्र याह्याखानाने आधार किंमतीबद्दल बोरलॉगकडून आवश्यक ती माहिती घेतली. अशा रीतीने भारत-पाकिस्तानात हरित क्रांती बोरलॉग यांनी घडवून आणली.

भारत, पाकिस्तान त्याचबरोबर आणखीही बऱ्याच विकसनशील देशात अशा रीतीने अन्न-धान्य उत्पादनाच्या वाढीत गहू कार्यक्रमाचा फार मोठा वाटा आहे. या कार्यक्रमामुळे जगातील करोडो उपाशी लोकांना अन्न मिळू लागले व जगात शांतता, स्थैर्य निर्माण करू

शकले, ह्याला मुख्यतः बोरलॉगचे संशोधनच कारणीभूत ठरले आणि म्हणूनच त्याच्या कार्याचा गौरव करण्याकरिता १० डिसेंबर १९७० मध्ये त्याना शांततेचे नोबेल पारितोषिक देण्याचे जाहीर करण्यात आले. ह्या निर्णय दूरध्वनीवर त्याना घरी कळविण्यात आला. त्या-वेळी ते तोलुका येथे गव्हाचे शेतात काम करीत होते. सौ. मार्गारेट यांनी त्यांना हा निर्णय प्रत्यक्ष कळविला. त्यावरही हातातील काम संपवूनच ते उठले. नंतर जमलेल्या लोकाकडून अभिनंदनाचा स्वीकार केला. संशोधनासाठी साध्या वेषात शेतात प्रयोग करणारा बोरलॉग नोबेल पारितोषिकाचा मानकरी बनला. साऱ्या जगात त्याने मानाचे स्थान मिळविले. कृषि शास्त्रज्ञाला मिळालेले हे पहिले पारितोषिक होय. यावरूनच आपणास बोरलॉगच्या कर्तृत्वाची साक्ष पटते अन्न आणि शांतता ही दोन तत्त्वे, या दोन गोष्टी किती परस्परसंबंधित आहेत, जागतिक शांततेच्या, स्थैर्याच्या दृष्टीने किती महत्त्वाच्या आहेत हे बोरलॉगने जगाला दाखवून दिले.

शांतता पारितोषिक कमेटीच्या चेअरमननेही बोरलॉगबद्दल प्रशंसोद्गार काढले. ते म्हणाले – बोरलॉग म्हणजे अदमनीय (Indomitable) पुरुष, की जो गव्हाच्या तांबेरा रोगाविरुद्ध व लाल फितीविरूद्ध जगातील कोणत्याही पुरुषापेक्षा जिद्दीने लढला व ज्याने करोडो उपाशी मानवाना भाकरी दिली. सर्व समाजाचा चेहरा मोहराच बदलून टाकला.

कररहित असे ७८००० डॉलरचे हे बक्षिस मिळाल्यावर बोरलॉग आपल्या जन्मभूमीस परतले. २० डिसेंबर १९८० मध्ये क्रेसो येथे शहरपित्याने नॉर्मन बोरलॉग याचा सत्कार केला. याच वेळी आयोव्हाचे राज्यपाल यानी बोरलॉगचा आयोव्हाचा सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ म्हणून गौरव केला. त्यावेळी बोरलॉगने तरूणामध्ये आपल्या इतर बांधवांच्या हालाखीच्या परिस्थितीबद्दल असलेली बेपर्वाई किंवा उदासीनता, तरूणाचा आत्मसंतोषी स्वभाव, त्याच्यातील ध्येयशून्यपणा याबद्दल चिंता आणि खेद व्यक्त केला. त्याचबरोबर अमेरिकेतील खते, किटकनाशके व रसायने याबद्दलच्या दृष्टिकोनाबद्दलही कडक टीका केली.

भारतातही नॉर्मन बोरलॉग याना बरेचसे बहुमान देण्यात आले. पतंनगर विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स पदवी उल्लेखनीय होय. एवढा हा बहुमान मिळाल्यानंतर ते पुन्हा एकदा श्रीमती गांधीना भेटले. त्यावेळी हरित क्रांतीने भारतात बरीच मजल गाठली होती. भारताने अन्न-धान्य उत्पादनाचे उद्दिष्ट गाठले होते. कृषि क्षेत्रावर जास्त भर देण्याची विनंती बोरलॉगने श्रीमती गांधीना केली.

इ. स. १९७१ मध्ये अमेरिकेने शरीर स्वास्थ्याच्या कारणावरून डी. डी. टी. वर बंदी घातली होती. तेव्हा जगभर निरनिराळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या. जागतिक अन्न संघटनेने (F. A. O.) त्याबाबतीत मतमतांतराची माहिती करून घेण्याकरिता एक परिसंवाद आयोजित केला. त्यात बोरलॉगही भाग घेणार होते. ते रोमला जात असतानाच केनडी विमान तळावरच त्याना आपली बहिण शारलोटे हिच्याकडून आपल्या वडिलांच्या निधनाची बातमी समजली. याआधी आपल्या कामाच्या व्यापामुळे ते आपले आजोबा व स्वतःचा मुलगा स्कॉटो याच्या अंत्यविधीस, अंत्यसंस्काराच्या वेळीही उपस्थित राहू शकले नव्हते. यावेळी मात्र त्यानी जागतिक अन्नसंघटनेमधील आपल्या भाषणाच्या वेळेत बदल करून घेऊन भाषण संपताच ते वडिलांचे अंत्यविधीसाठी रवाना झाले. अगदी शेवटच्या क्षणी ते तेथं पोहोचू शकले. व्यक्तिगत सुख-दुःखाची पर्वाही न करणारे बोरलॉग खरोखर महान होते. ते खऱ्या अर्थाने दीनाचे कैवारी, मानवतेचे पुजारी होय हा थोर शास्त्रज्ञ अजूनही जनकल्याणासाठी आपले आयुष्य वेचित आहे. अजूनही त्याचे आपले क्षेत्रातील संशोधन सुरूच आहे. सर्व मानवजातीची अन्नाची समस्या कशी सुटेल, हा त्याच्या चिंतनाचा विषय आहे. □


योद्धा शेतकरी

लेखक : विजय परुळकर

सचित्र आवृत्ती
पंचरंगी मुखपृष्ठ
किंमत : रुपये छत्तीस

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

श्यामचा संसार– (कथा २० )

फिरोज रानडे

# राजकपूरचे दुःख-श्यामचे दुःख

'अहो आताच कोणी तरी सांगत होतं की, नर्गिस गेली हो!' म्हणून हळहळत राधाने श्यामला ही बातमी सांगितली.

ती बातमी ऐकून श्याम सुन्नपणे म्हणाला, 'अरेरे, गेली ना बिचारी ती शेवटी!'

राधाने ती बातमी सांगितली त्या वेळी वार कोणता होता, सुट्टी होती की कामाचा दिवस होता, सकाळ होती की दुपार होती, हे आता श्यामच्या काही लक्षात नाही. दुःखाच्या बातम्या ऐकताच आपले मन एकदम बधीर होतं– म्हणून तर तसे होत नसेल ना?

'नर्गिसच्या मृत्यूबद्दल ऐकून देशातल्या हजारो लोकांप्रमाणे श्यामही सुन्न झाला होता. नर्गिसच्या आजारपणाबद्दलच्या बातम्या, अमेरिकेत तिच्यावर होणारे उपचार, इलाज करणाऱ्या डॉक्टरानी नर्गिस सुधारते आहे म्हणून दाखवलेले आश्चर्य, सुनील दत्तने तिच्यावरच्या उपचाराकरता केलेला अमाप खर्च व ते सर्व उपचार यशस्वी व्हावेत म्हणून त्याने देवाजवळ केलेल्या प्रार्थना व याचना ह्याबद्दलची वर्तमानपत्रात येणारी माहिती श्यामही हजारो लोकाप्रमाणे काळजीयुक्त उत्सुकतेने वाचत होता.

नर्गिस जाण्याआधी थोडी बरी होऊन काही दिवसांपूर्वी मुंबईला आली होती. त्याबद्दलही सिने-मासिकातून आलेले स्वागतपर लेख श्यामने वाचले होते; पण हे सगळे वाचताना व दत्त-कुटुंबाचे कौतुक करताना इतराप्रमाणेच श्यामच्या मनातही पाल चुकचुकत होती व ती पाल चुकचुकताना म्हणत होती की, काही वाटेल ते झाले तरी नर्गिस काही आता जास्त दिवस जगत नाही. त्यामुळे नर्गिसच्या मृत्यूची बातमी तशी अगदी अनपेक्षित होती असे नाही; पण मृत्यू अपेक्षित असो वा अनपेक्षित असो, तो प्रत्यक्ष आल्यावर त्याच्याबद्दलचे दुःख तो फक्त अपेक्षित होता म्हणून कमी का होत असते?

श्याम व राधा आसाममध्ये असतानाची गोष्ट. चिन्यांचे हिंदुस्तानच्या तिबेटलगतच्या भागावर आक्रमण होऊन ते परत गेले होते; पण ते जसे परत गेले तसे परत हल्लाही केव्हा करतील, ह्याचा काही नेम नव्हता. त्या आक्रमणाची भीती व त्याचे झालेले परिणाम अजुनी दिसत होते व जाणवत होते. हे आक्रमण आसाम पलीकडल्या अरुणाचल प्रदेशातच झाले असल्याकारणाने आसाममध्ये वातावरण फारच तंग होते. दररोजच्याच नव्हे तर अगदी सकाळ, दुपार सध्याकाळ तिन्ही वेळा बातम्या ऐकल्या जात. श्याम तर आकाशवाणी ऐकत असेच; पण त्याचबरोबर रेडिओ पेकिंग,बी. बी. सी., व्हॉईस ऑफ अमेरिका पण ऐकत असे.

पण व्हायचे काय की, व्हॉईस ऑफ अमेरिका अगदी सकाळी भल्या पहाटे ५–५॥ वाजता लागत असे. शिलाँगसारख्या थंडीच्या गावी सकाळी पाच-साडेपाचला उठून बातम्या लावणे मोठे कर्म कठीण काम होते; पण श्याम ते करत असे. सकाळचे पाच–साडेपाच म्हणजे राधा व मुलं याची अगदी मध्यरात्र असे.

असाच एक दिवस पहाटे उठून श्यामने रेडिओ लावला व व्हॉईस ऑफ अमेरिकाच्या बातम्या ऐकू लागला. तर पहिलीच बातमी म्हणजे जॉन एफ. केनेडीला टेक्सासमध्ये कोणा मोठ्या गावात, भर मिरवणुकीतून जात असता ठार मारण्यात आले होते. कोणातरी मायेफिरूने त्याला गोळ्या घातल्या होत्या! पुढच्या बातम्या ऐकण्यात काही अर्थ नव्हता. म्हणून त्याने रेडिओ बंद केला.

रेडिओ तर बंद केला पण पुढे काय करावे ते श्यामला सुचेना. घरात सगळे झोपलेले. खिडकीतून बाहेर पाहिले तर बाहेर इतके धुके की, बंगल्याची कंपाऊंड वॉल पण दिसत नव्हती. अशा वेळी बाहेर कोणाकडे कसे जाणार? त्याचवेळी एवढी दु.खाची व महत्त्वाची बातमी त्याला आपल्या जवळ ठेवणेही अशक्य झाले. छाती फुटून येते की काय असे वाटू लागले. मग त्याने राधाला सांगायाचे ठरवले. तिच्या जवळ जाऊन तो राधाला म्हणाला, 'राधा, अग अतिशय दुःखाची बातमी आहे बघ. केनेडीला कोणी तरी गोळ्या घालून ठार मारलं आहे बघ!'

राधा झटक्यात जागी झाली व विचारती झाली, 'आपल्या केनेडीला का? अग बाई!'

हो, जगात अशी कित्येक माणसं असतात की जी जग–व्यवहाराप्रमाणे आपली नसूनही 'आपली' झालेली असतात. केनेडी तशाच पैकी एक व नर्गिस सुद्धा त्याच 'आपल्या' लोकांपैकी.

श्यामचा तो सगळा दिवस असाच सुन्नावस्थेत गेला, काही करू नये, कोणाशी बोलू नये, असे त्याला वाटू लागले. त्याचे जेवणाचे पण मन होईना. पण राधा काय म्हणेल, मुलं काय म्हणतील? आपली, आपण उगाचच दुःख करतो म्हणून टिंगल करतील का? ह्या विचाराने त्याने थोडेसे खाऊन घेतले व बेडरूममधल्या पलंगावर येऊन तो पडला.

तेव्हढ्यात त्याचा कॉलजात पहिल्या वर्षाला जाणारा मोठा मुलगा बेडरुममध्ये आला. त्या मुलानी पण नर्गिसची बातमी ऐकली होती. पण त्याना वा त्याच्या पिढीला नर्गिस 'आपली' वाटण्याचे काहीच कारण नव्हते. कोणीतरी जुनी, खूप प्रसिद्ध, राजकपूर वगैरे बरोबर काम केलेली नर्गिस नावाची नटी वारली एवढेच त्याना जाणवले. एक नटी वारली तर बाबानी एवढे मनाला लावून घेण्याचे काय कारण असा प्रश्न त्या मुलाना पडला असावा.

बाबाना असे उदासपणे कॉटवर पडलेले पाहून तो कॉलेजच्या पहिल्या वर्षाला जाणारा मुलगा म्हणाला, 'एवढे काय तुम्ही मनाला लावून घेतले आहे बाबा? असा काय नर्गिसचा तुमचा सबंध होता?' असा प्रश्न अजाणपणे करून तो परत बाहेर गेला.

श्याम मनाशी विचार करू लागला, जगात दु.ख दाखवण्याची सुद्धा केव्हढी चोरी असते नाही ? कोणाच्या मरणाचे दुःख करावयाचे म्हणजे त्याच्याशी अगदी काही संबध असायला पाहिजे का ? आणि त्यांच्या पिढीचा व नर्गिसचा काही संबंध नव्हता असे तरी कसे म्हणावे ?

श्यामचा तारुण्याचा काळ राजकपूर-नर्गिसच्या बरसात, आवारा, श्री ४२० वगैरे सिनेमांचा काळ होता. मराठी लेखक म्हणतात तसे ते 'मंतरलेले दिवस' होते. श्याम काहीतरी कॉलेजच्या पहिल्या वा दुसऱ्या वर्षाला असावा. आपल्याला शोभो वा न शोभो, राजकपूर करतो म्हणून श्याम सकट सर्व मुले पॅन्टला खाली फोल्ड मारून 'आवारा' पॅन्टस् करत असत व बहुधा सगळ्या मुली, आपले नाकही नर्गिससारखे लांब असते तर किती छान झाले असते, असे मनाशी म्हणत व 'आवारा' पॅन्टी घालणाऱ्या मुलांच्या मागे लागत

राजकपूर, नर्गिस, लता मंगेशकर, शंकर–जयकिसन ह्याच्याबद्दल मोठ्या चविष्टपणे बोलले जावयाचे. राजकपूरसारखे निळे डोळे करणे शक्य नव्हते तर त्याच्यासारखे लांब झुपकेदार केस तरी ठेवावेत अशी प्रत्येकाची इच्छा असे. राजकपूरची, बरसातमध्ये वापरलेली, पाढरी टप् नसलेली ओल्डस् मोबाईल गाडी रस्ता–क्रॉसिंगला थावली की, क्षणात शेकडो लोक गोळा होत असत. श्याम व इतर मित्र अगदी कॉलेजात जाणारे असून सुद्धा राजकपूरला *पहाण्याकरता* त्याच्या गाडीकडे धावत असत.

इतर शेकडो लोकांप्रमाणे श्यामही जयकिशन हे शंकरच्या पिताजीचे नाव आहे असे समजून चालला होता. सिनेमात संगीत देण्याआधी शंकर–जयकिसन कसे साधे अशिक्षित पेटी वाजवणारे होते, वगैरे माहिती, फक्त आपल्यालाच कशी आहे व आपण फक्त तुलाच म्हणून सागतो आहोत, ह्या भावनेने एकजण दुसऱ्याला सांगत असे व दुसराही ते सर्व आपण प्रथमच ऐकतो आहोत ह्या कौतुकाने ऐकत असे.

लताबाई 'बरसात'च्या आधी किती वर्ष play back देत होत्या व त्यानी त्याआधी किती सिनेमांकरता गाणी म्हटली कोणास ठाऊक. पण सर्वसामान्य जनतेप्रमाणे श्यामही लताबाईंचा जन्म–सिनेमा 'बरसात'च समजून चालला होता. दिवाळीत उडणाऱ्या बाणाला काडी लावताच जसा तो क्षणात आकाशात झेप घेतो तसेच लताबाईंचे 'बरसात' मुळे झाले होते.

लताबाईंचे नाव होत होते. त्यांच्या साध्या रहाण्याबद्दल, त्यांच्या नेहमी पाढरी साडी नेसण्यावरूनही चर्चा होऊ लागली होती. मास्टर दीनानाथाचे नाव श्यामच्या पिढीने ऐकले ते लताबाईंचे वडील म्हणूनच.

त्यावेळी लताबाई आपल्या गाण्याचे जाहीर कार्यक्रम काही झाले तरी करत नाहीत, असे सर्वत्र बोलले जायचे, तेव्हा दादरच्या एका कल्पक माणसाने लताबाईंचा कार्यक्रम घडवून आणण्याची युक्ती काढली. त्याने मुळी मास्टर दीनानाथांचा जन्म–दिवसच साजरा करण्याचे ठरवले व त्याला लताबाईंना बोलावले. आता त्याला काय नाही म्हणणार लताबाई ?

तो कार्यक्रम दादरच्या डिसिल्व्हा शाळेच्या अंगणात होता. लताबाईंचा हा पहिला जाहीर कार्यक्रम ८ वाजता असूनसुद्धा ५–५॥ पासून लोक जमायला सुरुवात झाली होती. कार्यक्रमाला प्रवेश-पत्रिका होत्या. पण गर्दी एवढी वाढू लागली हे बघून संचालकांनी शहाणपणा दाखवून, पत्रे मारून जागा बदिस्त केली होती, ती मोकळी केली. एखादी जागा माणसानी फुलून जावी असं जसं वर्णन करतात तसे डिसिल्व्हा हायस्कूलचे पटांगण माणसांनी फुलून गेले होते. रस्त्यावर, आजूबाजूच्या चाळीच्या बाल्कनीतून एवढेच नव्हे तर कौलारु छपरावरसुद्धा शेकडो लोक बसले होते. पंडित नेहरू वा आचार्य अत्रे ह्याच्या व्याख्यानाला जशी गर्दी जमत असे तशी गर्दी जमली होती एवढे वर्णन केले म्हणजे पुरे !

कार्यक्रम सुरू झाला व नियोजकानी लताबाईंची प्रकृती बरी नाही म्हणून त्या फक्त दोनच गाणी म्हणतील असे जाहीर केले. लोक मनाशी म्हणाले दोन गाणी तर दोन गाणी. अमृताची अपेक्षा काय कोका–कोलाच्या सारखे बाटलीभर मिळेल अशी का करावयाची असते ? व दोन गाणी म्हणणार म्हटल्यावर निदान एकतरी 'बरसात'चे असणार ह्याची लोकाना खात्री होती.

प्रथम लताबाईंनी कोणता तरी राग आळवला पुरले गाणे तरी 'बरसात'चे असेल म्हणून लोकानी तो राग सहन केला. पण लताबाईंनी कमालच केली. त्यावेळी फार लोकप्रिय झालेले व सगळ्या महाराष्ट्रात प्रत्येक लग्न प्रसंगी हमखास वाजवले जाणारे 'जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा' हे गाणे म्हटले. लोकांनी हे मुलगी सासरी जाण्याचे दु खही सहन केले.

पण काय झाले, लताबाईंनी 'जा मुली जा' हे गाणे म्हटले व स्वतःच उठून त्या चालायला लागल्या ! ते पहाताच तेथे जमलेले हजारो लोक चवताळले व 'बरसात', 'बरसात' म्हणून हाकारा करू लागले. मग नियोजकानी सांगितले की, 'तुम्हाला सांगितले होते की, त्यांची प्रकृती बरी नाही; पण तुमच्या आग्रहास्तव एकच गाणे म्हणतील.'

आणि मग लताबाईंनी आपल्या सुरेल आवाजात 'मुझे किसीसे प्यार हो गया' हे गाणे म्हटले. गेल्या काही वर्षात लताबाईंचे पुष्कळ जाहीर कार्यक्रम झाले आहेत, त्यांच्या गाण्याच्या किता निघाल्या आहेत त्यामुळे गाण्याचे आता तेवढे कौतुक राहिले नाही; पण तीस वर्षांपूर्वी लताबाईंचे प्रत्यक्ष गाणे ऐकणे म्हणजे एक दैवी अनुभव होता. माणसाचा आवाज इतका गोड असतो ? आपण ऐकतो त्या रेकॉर्डप्रमाणे खरंच लताबाईंचा आवाज आहे, ह्या कल्पनेने व आपण लताबाईंचे गाणे प्रत्यक्ष ऐकतो आहोत ह्या कल्पनेने श्याम व इतर हजारो लोक आनंदाने गडबडा लोळायचे तेवढे बाकी राहिले होते !

*आणि नर्गिसबद्दल काय विचारावे ?* तिचे स्वप्नाळू डोळे बघून हजारो लोकांच्या डोळ्यावरची झोप उडाली होती. 'बरसात'मध्ये तर नर्गिस काय दिसायची ! आणि नर्गिस गाणे म्हणताना ? नर्गिसला पडद्यावर गाणे म्हणताना पहाताना सगळ्याना माहीत असे की हा आवाज लताबाईंचा आहे म्हणून; पण पडद्यावर नर्गिस ज्या वेळी 'फुल संग मुसकाये कलिया मैं कैसे मुसकाऊ। बादल देखकर भर आयी अखियाँ' पडद्यावर म्हणताना दाखवत, त्यावेळी वाटे ही नर्गिसच हे गाणे म्हणते आहे. तसेच अंदाजमधील 'उठाये जा उनके सितम !' ह्या गाण्याचा शब्दशः अर्थ जरी श्यामला कळला नाही तरी त्याला नुसते भडभडून यायचे. लताबाईंच्या आवाजाला ज्या २–४ मराठींचे

चेहरे 'सूट' होत असत त्यात नर्गिस होती.

अशी आयुष्यातली उर्मीची ४–५ वर्षे श्यामने व त्याच्या पिढीने राजकपूर, नर्गिस, लताबाई, शंकर–जयकिसन लोकांच्या सहवासात घालवली होती आणि श्यामचा कॉलेजच्या पहिल्या वर्षाला जाणारा मुलगा त्याला विचारत होता–त्याचा व नर्गिसचा संबंध काय होता व एवढे दुःख करायचे कारण काय म्हणून !

अशा सुन्नावस्थेत श्यामचा दिवस गेला संध्याकाळी दूरदर्शनवर काही तरी नर्गिसबद्दल दाखवतील म्हणून अगदी ६ वाजता T. V. लावला गेला. प्रथम येणाऱ्या रविवारी नर्गिसचा सगळघात वाईट सिनेमा दाखवण्याबद्दल सांगितले गेले. आता नर्गिसचे एवढे चांगले लोकप्रिय सिनेमे सोडून हा सिनेमाच दूरदर्शनवाल्यांना सुचावा ना, असा प्रश्न श्यामला पडून त्याला T. V. वाल्यांचा खूप राग आला व दुःख झाले.

मग नर्गिसचा भाऊ, नौशाद वगैरे सिनेमातल्या नर्गिसच्या सहकाऱ्यांच्या मुलाखती खती घेतल्या गेल्या व मग नर्गिसची अन्त्ययात्रा दाखवली गेली. त्यात पुष्कळ लोक दाखवले गेले; पण सगळ्याचे लक्ष गेले ते खूप सुटलेल्या, काळा गॉगल लावून हळूहळू चालत जाणाऱ्या राजकपूरकडे.

ज्या नर्गिसबरोबर त्याने आयुष्यातली १०–१२ वर्षं घालवली होती. जिच्याबरोबर स्वत: तर तारुण्याचा आस्वाद घेतलाच; पण हजारो नव्हे लाखो लोकाना तो घेऊ दिला होता. इंग्रजीत ज्याला legend म्हणतात तसे legend तयार झाले नर्गिस–राजकपूरबद्दल. आणि आता ती गेली तर राजकपूरला मोकळेपणी रडतासुद्धा येवू नये ना ?

कोणा तरी उर्दू-शायराची बेगम अख्तरने गायिलेली एक गझल आहे. 'इष्कमे गैरके जसबातने रोने न दिया' म्हणून. म्हणजे जगाच्या रितीरिवाजाच्या बंधनामुळे आपल्या माणसाच्या प्रेमाकरता मोकळेपणी रडतासुद्धा आलं नाही. कारण जगाच्या दृष्टीने तो परका होता ना ?

आज राजकपूरची तीच परिस्थिती झाली नसेल ना ? राजकपूर–नर्गिससारखे गुणीसौदर्यवान जोडपे कोणत्याही कारणाने एकत्र आले असते तरी त्यांचे प्रेम जमणेच नैसर्गिक होते. त्यात चुकीचे असे काही नव्हते. अशी त्याची प्रेयसी गेली–कायमची गेली; पण राजकपूरला काही मोकळेपणी दुःख दाखवता आले नाही. आपल्या श्यामला तरी कुठे दाखवता आले ?

माणसाला आपले दुःख मोकळेपणी दाखवता येऊ नये हीच खरी मोठी दुःखाची गोष्ट आहे. मग तो राजकपूर असो वा आपला श्याम असो. 'जसबातने रोने न दिया !' म्हणून मग मनातल्या मनात रडावे लागते व दुःख करावे लागते ! □

रंगभूमी

# जमान्याला गुलामगिरीचा जाब विचारणारी 'कमला'

सुमारे दोन–तीन महिन्यांपूर्वी एका बड्या गटाच्या इंग्रजी वृत्तपत्राने एक सनसनाटी बातमी प्रसिद्ध केली होती. स्त्रियांच्या विक्रीची; एका स्त्री–बाजाराची. लगेचच सुमारे आठ-पंधरा दिवसानी दुसऱ्या एका बड्या इंग्रजी दैनिकाने अशीच एक खळबळजनक बातमी जाहीर केली आदिवासी स्त्रियांच्या बाजाराची. ज्या देशात लोकशाही आहे, समाजवाद समानतेचा उद्घोष आहे त्या देशात हा स्त्रियांचा बाजार भरतो, ही बातमी खरोखरच भयानक आहे. त्यापैकी पहिल्या बातमीचा आधार घेऊन कलारंग निर्मित 'कमला' हे नाटक रंगभूमीवर आले आहे.

या देशात स्त्रियांचा बाजार चालतो, हे सिद्ध करण्यासाठी बातमी देणाऱ्या त्या पत्रकाराने पुराव्यादाखल एक बाईच विकत आणली होती. पण केवळ एवढ्याच एका घटनेवर, बातमीवर या नाटकाचे लेखक आणि मुरब्बी पत्रकार श्री. विजय तेंडुलकर थांबत नाहीत. या बातमीच्या पलिकडे ते डोकावतात, स्वतःच्या दृष्टिकोनातून पाहतात आणि त्यांना बरंच काही दिसतं. एका घरात एक स्त्री विकत आणल्यानंतर उठलेलं वादळ त्यांना दिसतं, मानवी जीवनाचे वेगवेगळे पैलू त्यांना आढळतात. आणि मग 'कमला' या नाटकाचं 'एका घटनेवर आधारित' असं स्वरूप न राहता सार्वत्रिक स्वरूप येतं.

या नाटकात सर्वात मोठा संघर्ष आहे तो मालक आणि गुलाम या नात्यामधला ! वृत्तपत्राचा मालक आणि पत्रकार, नवरा आणि बायको, समाज आणि स्त्री अशा स्वरूपांमधून हा संघर्ष लेखकाने फुलवला आहे. जुनी पत्रकारिता आणि नवी पत्रकारिता यांच्यामधील संघर्षही इथे आहे. आणि एक मोठा प्रश्न स्त्री मुक्तीचा, स्त्री–गुलामीचा या नाटकातूनच आपल्या समोर येतो.

जयसिंग जाधव हा दिल्लीमधील एका मोठ्या पेपरचा एक बडा बातमीदार. दंगेखून, जाळपोळ अशा काही घटनांची जराशी खबर लागताच स्वतःचा जीव धोक्यात घालून हा तिथे हजर. प्रत्येक गोष्टीचा 'आँखो देखा हाल' लोकापुढे मांडायचा. त्या घटनेमागची कारणमीमांसा द्यायची; भले कितीही आणि केवढेही 'बडे' लोक त्यात गुतलेले असेनात, त्यांच्यावर कोरडे ओढायचे. त्याचाच परिणाम म्हणून त्याच्या घरी दिवसातल्या कोणत्याही वेळी धमकीचे फोन येत असतात. पण हा काही त्याला डरत नसतो पत्रकारिता हे एक व्रत आहे, लोकांपर्यंत सत्य पोचवणे हा आपला धर्म आहे, आपले कर्तव्य आहे, अशा भावनेनेच तो त्याच्याकडे बघत असतो

असाच एक दिवस तो एक exclusive story आणतो; बातमीच नव्हे तर एक जिवंत पुरावाही आणतो. स्त्रियांचा बाजार या देशाच्या एका भागात चालतो, हे सत्य लोकापर्यंत पोचवण्यासाठी त्या ठिकाणी जाऊन एक स्त्री खरेदी करून तो आणतो. संपूर्ण देशातील एक अत्यंत exclusive scoop त्याच्याजवळ असतं. फक्त एक पत्रकार परिषद त्याला निर्वेधपणे पार पाडायची

असते; बस्स ! मग तो देशातल्या पत्रकारांमध्ये 'हिरो' ठरणार असतो.

पण हे सगळं एवढं सोप सहज नसतं. त्याची पत्रकार परिषद यशस्वी ठरते. दिल्लीतले सगळे पत्रकार अवाक् होतात. पण त्याच्या या मर्दुमकीचे फळ म्हणून त्याला नोकरीतून काढलं जातं. पण हा दणकादेखील सामान्य ठरावा एवढं मोठं एक वादळ त्याच्या घरातच उठलेलं असतं. आणि हा झंझावात आणतं कोण ? तीच अडाणी, अशिक्षित 'कमला.'

सरिता ही जयसिंगची पत्नी. नवऱ्याचा मूळचा विक्षिप्त स्वभाव आणि पत्रकार असल्याने त्याच्या वेळा–अवेळा, दिवसेदिवस बेपत्ता होणं, धमक्याचे फोन, रात्री–बेरात्री त्रासदायक वाटणारे फोन, घरी येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ हे सगळं ती निमूटपणे सहन करीत असते. हा सगळा त्रास सहन करत असतानासुद्धा तिला आपला नवरा कोणी तरी मोठा आहे याचं एक बारीक समाधान असतं.

पण यातूनही दबून राहिलेला असंतोष एक दिवस बाहेर पडतो. या स्फोटाला कारण ठरते 'कमला'. आपणदेखील गुलाम आहोत, हे सरितालाही कमल शिकवते.

इकडे सरिताचे काका, काकासाहेब मोहिते हे या नव्या पद्धतीच्या पत्रकारितेने अचंबित झालेले दिसतात. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी स्वातंत्र्य–लढ्यात भाग घेतलेला असतो. एक वृत्तपत्र चालवलेलं असतं. इंग्रजांवर टीकेची झोड उठवलेली असते. त्यासाठी तुरुंगवासही भोगलेला असतो; तरीही त्यांना हे धावपळीचं 'जर्नालिझम' काही समजतच नाही.

अशा या सगळ्या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा. त्यांच्या विचारांमधून या नाटकातला संघर्ष उभा राहतो आणि आपल्यालादेखील तो अस्वस्थ करतो.

जयसिंग जाधव या तडफदार, झुजार पत्रकाराची भूमिका विक्रम गोखले यांनी अत्यंत समर्थपणे केली आहे. या झुजारपणात कुठेतरी एक प्रचंड आत्मविश्वास आणि अहंकार यांचे मिश्रण आहे. हा अहंकार केवळ कर्तृत्वाचाच नाही, तर पुरुषी अहंकारदेखील आहे. म्हणूनच आपल्या बायकोने काहीही विरुद्ध केलेले त्याला खपत नाही.

घरात येणारे पाहुणे, ओळखीचे वगैरेंची तिने सरबराई केली पाहिजे, येणारा प्रत्येक फोन नोंदवून ठेवला पाहिजे, तो प्रवासाहून आल्यावर कुठे गेला होतात असे न विचारता आंघोळ, जेवण याची तयारी केली पाहिजे, एवढेच नव्हे तर आपल्या या विचित्र वागणुकीबद्दल तिने आपल्या नातेवाईकांजवळदेखील तक्रार करता कामा नये. पेपर्स अस्ताव्यस्त पडल्याबद्दल घरच्या नोकराणीवर तो ज्या अधिकाराने रागावतो, त्याच अधिकाराने बायकोने शय्यासुखास नकार दिल्याबद्दल तिच्यावरही रागावतो. कारण बायको नावाच्या गुलामाचा तो नवरा नावाचा मालक असतो.

जयसिंग जाधवच्या या प्रमुख व्यक्तिरेखेत विक्रम गोखले यांनी खरोखरीच जिवंतपणा आणला आहे. बातमी आपण सांगेपर्यंत फुटू नये म्हणून धडपड, ती चिंता, प्रेस कॉन्फरन्सच्या यशानंतरचा विजयोन्माद, स्वतःबद्दलचा पूर्ण आत्मविश्वास, सगळ्यांवर हुकुमत गाजवायची प्रवृत्ती आणि नंतर नोकरीतून आपल्याला काढून टाकलं आहे हे कळल्यानंतरचा आक्रस्ताळेपणा. राग आणि अगतिक रडणं हे सर्व प्रसंग, मूड्स् विक्रम गोखले सहजपणे दाखवतात. मूळचेच देखणे असल्याने खादीचा झब्बा आणि पायजमा या पत्रकारी वेषातही ते उत्तमच दिसतात. भूमिका आणि मुख्य म्हणजे चालू प्रसंग याचं त्याना सतत भान असतं. ह्यामुळेच दारू पिण्याचा प्रसंग झाल्यावर ते अतिझिंगल्याचा अभिनय करीत नाहीत की मधेच एखादं वाक्य शुद्ध बोलून जात नाहीत. स्वत:च्या पत्नीकडे शरीरसुखाची विनवणी करताना जयसिंगचा दुखावलेला अहंकार आणि थोडासा बालिश इनोसन्स यांचा सुरेख संगम साधून त्याप्रसंगी ते संवाद बोलतात. एकूण विक्रम गोखले बेस्ट !

सरिता आणि कमला या व्यक्तिरेखा काहीशा समान आहेत. कारण स्त्रीच्या गुलामगिरीची दोन रूपे त्या दाखवतात. पैकी सरिता रुपवान आहे, सुशिक्षित आहे. तिचं नवऱ्यावर प्रेमही आहे, नवऱ्याचा अधिकार मान्य करणारी आहे, त्यासाठी ती सगळा त्रास सहन करते, नवऱ्याच्या मोठेपणात समाधान मानते. तात्पर्य, ती बऱ्याच अंशी 'आदर्श भारतीय गृहिणी' आहे. बऱ्याच अंशी म्हणण्याचे कारण, आपल्याला स्वतंत्र अस्तित्व नाही, 'जयसिंग जाधवची बायको' एवढंच आपलं स्थान आहे, हे तिला मान्य आहे याबद्दलचा राग, असंतोष तिने प्रयासाने दाबून टाकला आहे. घरचे संस्कार म्हणा, समाजाची तशी रीत म्हणून म्हणा, तिने ते मान्य केलेलं आहे; करावं लागलं आहे. पण तिचा राग पूर्णपणे नष्ट झालेला नाही. म्हणूनच ती एकदा वैतागाने म्हणते, 'मी-देखील एक प्रेस कॉन्फरन्स घेणार आहे आणि त्यात पुराव्यादाखल दाखवणार आहे १९८१ सालात विसाव्या शतकात गुलाम बाळगणारा एक पुरुष ! लोकशाहीच्या आणि स्वातंत्र्याच्या गप्पा मारणारा हा पुरुष किती क्रूर आहे ते मी जगाला दाखवणार आहे !'

पण जेव्हा नवऱ्यावर बिकट प्रसंग येतो तेव्हा ती पुन्हा एकदा मागे हटते. आपले बंडखोर विचार ती परत एकदा दाबून टाकते. नवऱ्याला आधार देण्यासाठी ती त्याची साथीदार बनते.

कमलाची सगळी गोष्टच वेगळी आहे. ती प्रचंड अज्ञानाच्या अंधकारात सुखी आहे. शिक्षणामुळे, चार माणसात राहिल्यामुळे येणारा सुजाणपणा नाही, की त्यामुळे मनाचा कोंडमारा किंवा इतर कॉम्प्लिकेशन्स वगैरेची भानगड नाही. स्त्री मानाने जगू शकते, तिचे लग्न थाटाने वगैरे होते याचा तिला पत्ताच नाही. प्रत्येक स्त्रीला प्रत्येक पुरुषाने विकतच घेतलेले असणार, असा तिचा साधा सरळ विचार. जयसिंग जाधवने आपल्याला कशाकरता विकत घेतले आहे, पुढे तो आपले काय करणार आहे, हे तिला माहीतही नसते. त्याबद्दल काही चिंताही नसते.

'मालिक'ने आपल्याला विकत घेतले आहे ते ठेवण्यासाठीच, अशी तिची प्रामाणिक समजूत. याच भावनेतून तो सरिताशी बोलते. ती सरिताला विचारते, 'मालिकने तुला केवढ्याला खरेदी केले ?' सरिता उत्तरते, 'सातशे कलदार रुपयाना.' कमला म्हणते, 'सौदा फारच महागात पडला आणि एवढे पैसे खर्चून तू अजून त्याला मूल दिले नाहीस ? काळजी करू नकोस. मालिकला हवी तेवढी मुलं मी देईन. त्याच्या शेतीवाडीवर मी कष्ट करेन. मला ते येतं. आपण इथं बहिणी-बहिणी सारखं राहिलं पाहिजे आणि सभा-समारंभाना आपणी तू

जात जा, मला नाही ते जमायचं आणि हो, मालकांबरोबर पधरा रात्री मी झोपेन, पधरा रात्री तू झोपत जा.' सगळा कसा सरळ, स्वच्छ कारभार मुलं न होणं हा स्त्रीचाच अपराध, यावर तिची ठाम श्रद्धा.

आणि नकळतच, सुशिक्षित सरिताला कमला एक जोरदार धडा शिकवते. आपण गुलाम आहोत, हे भयाण सत्य सरिताला त्या क्षणी जाणवतं आणि अशा या भोळ्या स्त्रीचा फायदा घेऊन प्रेस कॉन्फरन्सच्या रूपाने तिचा बाजार भरवून आपला नवरा मोठेपणा मिळवतो आहे, याची तिला चीड येते. 'जो पुरुषार्थ गाजवतो तोच खरा पुरुष, मग खरं लिंग कोणतं का असेना, बाकीच्या बायका!' असं ती चिडून म्हणते ते याच कारणामुळे.

सरिताची भूमिका लालन सारंग यानी सुरेख केली आहे. त्याचा आवाज आणि एकसुरीपणा चागलाच खटकतो; पण आपल्या हालचालीनी आणि 'लूक्स'नी त्या या दोषावर मात करून प्रत्येक प्रसंग जिवंत ठेवतात.

कमलाची भूमिका चारुशीला साबळे यांनी केली आहे. या भूमिकेला काम कमी, पण महत्त्वाचं आहे. भेदरलेली, भोळसट कमला, साबळे यांनी छान उभी केली आहे. सरिता व कमला यांच्यामधील संभाषणाच्या प्रवेशात त्यांचं कसब दिसतं. तो पूर्ण सीनच फार सुरेख रीतीने लिहिलेला, दिग्दर्शित केलेला व सादर केलेला आहे.

दिग्दर्शक कमलाकर सारंग यानी काकासाहेब या माजी स्वातंत्र्यसैनिकाची भूमिका केली आहे. या काकासाहेबाच्या अंगात अजूनही एक जिल्हापत्र–ज्याला तेच लगोटीपत्र म्हणतात–चालवण्याची उमेद आहे. पण त्याना हे हल्लीचे प्रावपळीचे आणि सनसनाटी जर्नालिझम कळतच नाही. दंगे, खून, बलात्कार याच्या बातम्या देणारं हे रक्तपिपासू जर्नालिझम आहे, असं ते मानतात. पण या सनसनाटी बातमीदारीमुळेच आपला जावई एका आऊट हाऊसमधून या शानदार बंगल्यात राहायला आला, हे कटु सत्य ते फाडकन् बोलतात. प्रेस कॉन्फरन्समधला आचरटपणा आणि त्या सीध्या साध्या स्त्रीचा जयसिंगने तिथे पुन्हा एकदा माडलेला बाजारही त्याना पसंत नाही. जुन्या व नव्या पद्धतीच्या पत्रकारितेचा हा संघर्ष आहे.

हे नाटक दोन अंकी आहे आणि अत्यंत बंदिस्त, नेटके व वेगवान आहे. ज्याप्रमाणे स्त्रीच्या गुलामीबद्दल त्यात कॉमेन्ट्स आहेत तशाच, अगादर म्हटल्याप्रमाणे पत्रकारितेवर आहेत. 'स्वातंत्र्याचा वगैरे उद्घोष, सामाजिक कर्तव्याची जाणीव तुम्ही लोक इग्रजी वृत्तपत्रातून देता. ते वाचतात किती? तर जेमतेम २ टक्के लोक. ते काय समाज परिवर्तन करणार?' कारण या वृत्तपत्राच्या सुखी, सुस्त वाचकाना समाजाविषयी आस्था कुठे आहे? याप्रमाणेच प्रेस कॉन्फरन्सच्या प्रसंगातूनही पत्रकारितेच्या क्षेत्रावर टीका आहे. नोकरीतून काढून टाकल्यावर जयसिंग जे काही मालकाविरुद्ध व संपादकाविरुद्ध बोलतो तीही पत्रकारितेवरचीच टीका आहे.

अत्यत कमी सवादातून अचूक वातावरणनिर्मिती आणि पर्यायाने कथानक अत्यंत वेगाने पुढे सरकवणे हे तेंडुलकरांनी अप्रतिमरित्या करून दाखवल आहे. त्यामुळे अनेक महत्त्वाचे प्रश्न येऊनदेखील नाटक शब्दबंबाळ होत नाही. ते अत्यंत बोलकं आहे आणि दिग्दर्शक कमलाकर सारंग यानी नाटक फारच सुरेख बसवले आहे. एकतर पात्राची निवड अचूक आहे, त्याचप्रमाणे पात्राना दिलेल्या ॲक्शन्सही समर्पक व योग्य आहेत. आवश्यक त्याच गोष्टी स्टेजवर दिसतात. बंगला भारी पण भडक न करण्यात नेपथ्यकार बाबा पार्सेकर याचे कसब दिसून येतं.

विविध दिवे या घरात आहेत. त्यांची बटनंही तिथेच आहेत आणि या दिव्यांचा उपयोग प्रकाशयोजनेसाठी करून घेतला आहे. सकाळ व रात्र उत्तम तऱ्हेने जाणवते. विशेषत: सरिता व कमला यांच्या रात्रीच्या प्रवेशाच्या वेळची प्रकाशयोजना अप्रतिम. प्रत्येक प्रवेश व प्रत्येक अक योग्य त्या जागीच सपतो. त्या त्या वेळी उत्तम प्रकाश योजना आहे. हादरलेल्या आणि नशेत झोपलेल्या नवऱ्याच्या पायाशी सरिता बसते, अशा अनुत्तरित व समर्पक (नाटकाच्या दृष्टीने) शेवटाच्या वेळची प्रकाशयोजनाही छान आहे. त्याचप्रमाणे प्रेक्षकाला प्रवेशद्वार सरळ दिसते. त्या व इतर सर्व दारांची, जिन्याची रचना व योजना योग्य आहे.

इतर उल्लेखनीय बाबीमध्ये मोलकरीण (ललिता कारेकर), पत्रकार दोस्त जैन, (सुधीर जोशी), अजित मर्चंट याच पार्श्वसंगीत व अरुण मडकईकर यांचं ध्वनिसंयोजन एकूण उत्तम नाट्यसंहिता, उत्तम दिग्दर्शन, उत्तम अभिनय असलेले हे नाटक जरूर जरूर बघावे.

—निखिल गजेंद्रगडकर


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बलिदान–(कादंबरी)–बाबा कदम | रुपये | ३५/— |
| २. | सुखाचं फूल–(कथासंग्रह)–रविंद्र पिंगे | " | १५/— |
| ३. | सुखदा–(मुक्या मुलीवर कादंबरी)–अच्युत बर्वे | " | ४०/— |
| ४. | मी मुबईचा इन्स्पेक्टर–(१९६६ ते १९८१ या काळातील लेखकाचे पोलीस-अनुभव)–अरविंद पटवर्धन | " | ३०/— |
| ५. | हँग ओव्हर–(कादंबरी)–श्रीकात सिनकर | " | २५/— |

— ENGLISH —

| | | |
|---|---|---|
| 1. | Anatomy of an Illness–(Bestseller–Nonfiction an entertaining and instructive example of an inspired participation on the part of a patient in his own treatment)–Norman Cousins | $ 4·95 |
| 2. | Heartsounds – (Bestseller – experiences of a woman journalist when her doctor–husband became a heart patient)–Martha Weinman Lear | £ 1·50 |

* "आम्हाला हुंडा दिला नाही तरी चालेल! पण मुलीचं 'फिनिक्स' मध्ये आजीव सभासदत्व असेल तर आमचा होकार म्हणून समजा"! —मुलाची आई

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

चित्रपट

# आक्रित

## प्रेक्षक चित्रपटात गुंतून राहतात

चित्रा पालेकर निर्मित, श्री. अमोल पालेकर दिग्दर्शित 'ज्ञ'चा 'आक्रीत' हा मराठी रंगीत चित्रपट मुंबईच्या कोहिनूर या चित्रगृहात सुरू आहे. या चित्रपटाचे कथा, पटकथा संवादलेखन श्री. विजय तेंडुलकर यांनी केले आहे.

नदीकाठचे एक खेडेगाव. हे खेडेगाव बऱ्यापैकी आहे. कोणत्याच सुखसोयी नसलेले उजाड वगैरे खेडे नाही. गावात बस सर्व्हिस आहे. एक डॉक्टर आहे. मारवाड्याचे दुकान आहे. अशा या गावात मुगुटराव शिंदे (अमोल पालेकर) या नावाचे एक प्रस्थ आहे. गावात मुगुटरावाचे चौरसचौरस अंगण असलेले दुमजली घर आहे. सात्विक पत्नी, (रेखा सबनीस) दोन मुले असा संसार आहे. रुही (चित्रा पालेकर) ही मुगुटरावाची रखेली. गावाबाहेर तिचे वेगळे घर आहे. रुहीला मूल-बाळ नाही. देवाला पाच कोवळ्या मुलीचे बळी दिले तर तुला मूल होईल, शिवाय गुप्त धनही मिळेल असे एकदा एक भगत रुहीला सांगतो. अपत्यासाठी वेडी झालेली रुही भगताने सांगितलेले देवीचे मागणे पुरे करण्यासाठी गंग्या (विलास वंजारी), सपाट्या (प्रकाश कुलकर्णी) यांना गळ घालते. पदर आलेल्या पाच कोवळ्या मुलींच्या गुप्त भागाचे रक्त आणि मुडके आणायचे! काम जोखमीचे! ऐकून मुगुटरावही हादरतो. पण गुप्त धनाच्या आशेने, कोणत्याही प्रकारे शब्दात बांधले न जाता (हिरवा कंदिल सूचित करतो) खूनाचे भयानक 'आक्रीत' सुरू होते. वार्ताहरांमुळे रुहीची बहीण मैनीचा (राणी सबनीस) तलास लागतो. मैनीमुळे खून करणारे कळतात. गंग्या, सपाट्या, रुही यांना फाशीची शिक्षा होते. मुगुटराव शिंदे मात्र फुशारकीने म्हणतो 'आम्ही सुटणारच.' येथे चित्रपट संपतो.

प्रथमपासून शेवटपर्यंत प्रेक्षक चित्रपटात गुंतून राहातात. याचे कारण उत्कृष्ट वातावरणनिर्मिती, ठीक कथानक, ठीक व्यक्तिचित्रे. नदी, पोलीसचौकी, घरे (मुगुटरावांचे घर वेगळे, मारवाड्याचे घर वेगळे), दवाखाना, झाड, झाडाखाली शेंदूर फासलेले देव, त्यांच्यासमोर लिंब, नारळ, मिरच्या वगैरे, माणसांचे चेहरे, पोषाख, त्यांचे वागणे, बोलणे या सर्व वातावरणातून एका गावाचे व्यक्तिमत्व साकार होते. वातावरणनिर्मितीचे श्रेय छायाचित्रकार श्री. एस. डी. देवधर यांना जाते. खुनासारख्या सनसनाटी घटना, त्या भोवती पोलिसी चौकशीचा तमाशा, वार्ताहरांनी घेतलेल्या पोलीस इन्स्पेक्टर, आमदार वगैरेंच्या मुलाखती यामुळे कथानकाबरोबर प्रेक्षक वहात जातात. तीस-चाळीस लहानमोठ्या व्यक्ती या चित्रपटात आहेत. काही अपवाद वगळता बहुतेकांची व्यक्तिचित्रे चांगल्या प्रकारे उभी झाली आहेत. सारे काही समजून उमजून स्वतःपुरते जगणारा डॉक्टर, चमचा वृत्तीचा हणमंतराव, उदास पोलीस इन्स्पेक्टर, कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर, चोबडा हवालदार, वस्ताद नर्स, राकट पारधी अशी कितीतरी व्यक्तिचित्रे कथानक सजीव करतात.

'सर्वसाक्षी' आणि 'आक्रीत' या चित्रपटाच्या कथेत साम्य आहे. खेडेगाव, तेथील अंधविश्वास, अपत्य प्राप्तीसाठी नरबली या गोष्टी दोन्ही चित्रपटाच्या कथेत आहेत. परंतु 'सर्वसाक्षी' ची कथा नंतर 'तो' आणि 'ती' यांच्या कथेत बुडून जाते. ध्येयवादी शिक्षक, खलनायक ही नेहमीची मंडळीही त्यात आहेतच. 'आक्रीत'चे असे होत नाही. सत्ताधारी व्यक्ति आपले हात प्रत्यक्ष न गुंतवता सगळ्या प्रकारचे गुन्हे करून नामानिराळी राहू शकते आणि ती व्यक्ती ज्यांच्याकडून गुन्हे करवून घेते ते अडाणी मात्र गुन्हेगार ठरून बळी जातात, हा 'आक्रीत' या चित्रपटाचा केन्द्रबिंदू आहे. यामुळे 'सर्वसाक्षी'पेक्षा 'आक्रीत' अनेक अंगांनी उजवा वाटतो.

'आक्रीत' या चित्रपटाचे आणखी वैशिष्ट्य आहे, चित्रपट मराठी आहे, कथा ग्रामीण आहे, परंतु त्यात तमाशा नाही! ('आक्रोश' हा हिंदी चित्रपट असूनही त्यात तमाशा घातला होता.) घुसडायचाच म्हटला तर तमाशा सहज घुसडता आला असता. मुगुटरावाची आणखी एखादी भानगड! पण तो मोह लेखक-दिग्दर्शकांनी आवरलेला दिसतो. ते बरेच वाटते.

चित्रपट प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्यात यशस्वी असला तरी त्यात अनेक दोष आहेतच. मुगुटराव शिंदे ही या चित्रपटातील मुख्य व्यक्ती. पोलिसांशी त्याचे संधान. मारवाड्याकडे त्याचे वजन. गावातली पारधी जमात त्याच्या हुकुमाची ताबेदार. अशा या मुगुटरावाचे व्यक्तिमत्व अनेक प्रसंगातून दाखविले आहे. परंतु यातले काही प्रसंग मुद्दाम योजलेले, केवळ माहितीवजा वाटतात. रुहीच्या माडीवर एका पोलीस इन्स्पेक्टरला मुगुटराव मेजवानी देतो. ते दोघे खातात, पितात. या पलीकडे या प्रसंगात काय आहे? पोलीस इन्स्पेक्टरच्या किंवा मुगुटरावांच्या एखाद्या स्वभाववैशिष्ट्यावर त्यामध्ये प्रकाश पडत नाही. मेजवानीमुळे इन्स्पेक्टर खूष झाला असे वाटत नाही. मुगुटरावाने त्याला विश्वासात घेतले, उपकृत केले किंवा मैत्रीची गाठ पक्की केली, असेही वाटत नाही. भावनांची अभिव्यक्तीच नाही. त्यामुळे प्रसंग कोरडा कोरडा वाटतो. पोलिसात वजन ठेवण्यासाठी मुगुटराव नवीन आलेल्या इन्स्पेक्टरला मेजवानी देतो अशी केवळ माहिती हा प्रसंग आपल्याला देतो.

पारध्यांच्या वस्तीवर पोलीस छापा घालतात तेव्हा मुगुटराव मारवाड्याला तेवढे फक्त सांगतो. आणखीही एक-दोन वेळा तो मारवाड्याकडे निरोप देतो. परंतु मारवाडी कोणत्या प्रकारचे सहाय्य करतो, मुगुटराव त्याच्याकडे हक्काने मदत का मागतो ते स्पष्ट होत नाही. मारवाड्याच्या काही व्यवहारात मुगुटराव त्याला सांभाळून घेत असेल वगैरे गोष्टी आपण आपल्या 'जनरल नॉलेज'वर सोडायच्या. मुगुटराव दरोडा घातलेल्या गपाला वाचवतो, कोबडी चोरून पळून आलेल्या गंग्याला पाठीशी घालतो हेही प्रसंग मुद्दाम योजलेले वाटतात. त्यामानाने आमदार आले असता त्यांच्या वतीने मुगुटरावाचे आपणच वार्ताहराच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा चमचा ढवळणे हा प्रसंग सहज आणि स्वाभाविक वाटतो. मुगुटरावाची पत्नी, रुही आणि नर्स (चारुशीला साबळे) यांच्याबरोबरची शयनदृश्ये मुगुटरावांच्या

व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकत नाहीत, कथानकाचे महत्त्वाचे सूत्र हालवत नाहीत, आशयाला अधिक व्यापकता देत नाहीत. त्यामुळे तो पूर्णपणे अनावश्यक वाटतात. सवंग ठरतात.

गंग्या आणि सपाट्या सराईतपणे खून करणारे रागडे पारधी वाटू शकत नाहीत. त्याचे एकंदर दर्शन कोंबडी पकडावी तशी माणसे पकडून कापणाऱ्या शिकारी जमातीचे नव्हते. शेतावर काम करणाऱ्या गडीमाणसांसारखे ते दिसत होते. त्याचा अभिनय ठीक होता पण वेषभूषा, रंगभूषाच चुकीची वाटत होती. गंपा (दिलीप कुलकर्णी) बरोबर रांगडा पारधी वाटत होता. अगदी ओझरते एखादे मिनिटभरच आलेले मोमिनाचे कुटुंब, त्यांचे पोषाख वगैरेवरून सहजपणे दरिद्री मुस्लिम कुटुंब वाटू शकत होते. या पार्श्वभूमीवर गंग्या आणि सपाट्या यांचे दर्शन ( appearance ) जास्तच खटकते. रेखा सबनीस मराठा घरातल्या वाटत नाहीत. त्यांचा चेहरा ब्राह्मणी दिसतो. नऊवारी पातळ नेसण्याची पद्धत सारस्वती आहे. खानदानी मराठा स्त्रियाप्रमाणे त्यांच्या डोक्यावर पदर नाही, ही गोष्ट तर फारच खटकते. एका प्रसंगात गंग्या (विलास वंजारी) रुहीला चार-पाच वेळा म्हणतो, 'व्हय रुहीबाई'. ते बोलणे काहीसे खुनशी आणि गूढ स्वरात आहे. त्याची आवश्यकता वाटत नाही शेवटी इन्स्पेक्टर देशमुख (अरुण जोगळेकर) प्रेक्षकांशी बोलतात. ते चित्रपटाच्या प्रकृतीला मानवत नाही.

चित्रपटातील अभिनय एकंदर चांगल्या दर्जाचा आहे. चित्रा पालेकर यांचा अभिनय सर्वांत अधिक प्रभावी वाटतो. रुही अशिक्षित, अडाणी स्त्री आहे. अपत्य-प्राप्तीसाठी वेडी झाली आहे. बळी देण्याच्या कल्पनेला ती जरासुद्धा दचकत नाही, तरी ती क्रूर, निर्दय वाटत नाही. अपत्य-प्राप्तीच्या जबरदस्त, नैसर्गिक प्रेरणेमुळे बऱ्या-वाईटाचा विचारच न उरलेली अशी ती स्त्री वाटते. असे सूक्ष्म भेद दाखविणे एक कठीण आव्हान आहे. चित्रा पालेकर यांनी ते यशस्वीपणे पेलले आहे, त्यामुळेच बळीच्या कल्पनेस न दचकणारी रुही जेव्हा प्रत्यक्ष डोळ्यांनी बळी पाहते तेव्हा हादरते, पण विचलित होत नाही, ही गोष्ट खटकत नाही. मुगुटराव उलटतो तेव्हाचे रुहीचे बेभान होणे तर चित्रा पालेकर यांच्याकडून कमालीच्या जिवंतपणे अभिव्यक्त झाले आहे, (या गंभीर प्रसंगात त्या अमोल पालेकरांना मारतात म्हणन प्रेक्षक मजेत हसतात.) प्रेक्षकांना चित्रपटात गुतवून ठेवण्यात चित्रा पालेकर यांच्या अभिनयाचा फार मोठा वाटा आहे. श्री. अरुण जोगळेकर, बाळ कर्वे, दिलीप कुलकर्णी, गौतम जोगळेकर, राणी सबनीस या दुय्यम कलाकारांचे अभिनय उल्लेखनीय आहेत. कर्तव्यदक्ष पण हतबल इन्स्पेक्टर श्री. जोगळेकर यांनी उचित भानाने उभा केला आहे. वरच्या अधिकाऱ्याप्रमाणे आपला नूर बदलणारा चलाख, चोबडा हवालदार श्री. बाळ कर्वे यांनी सहजपणे रंगवला आहे. हा हवालदार सुरुवातीला मुगुटरावाच्या कलाने जाणारा आणि नंतर मुगुटरावाच्या मुलाशी गमजाने वागणारा, आहे, तरी ते वागणे अचानक 'ट्रान्सफर सीन' वाटत नाही. कारण कलाकाराला हवालदाराचे व्यक्तिमत्व उभे करणे जमले आहे. रागडेपणा, अडाणी-भाबडेपणा, तारुण्याच्या ताकदीची गुर्मी, प्रबळ वासना अशा गंप्याच्या व्यक्तिमत्वाच्या विविध छटा दिलीप कुलकर्णी यानी समर्थपणे दाखविल्या आहेत. पोरा-बाळात लडबडलेली, दयाळू तरीही बहिणीला बळीसाठी सहाय्य करणारी मैनी राणी सबनीस यानी सहजपणे साकार केली आहे. अजून आईने सांगितलेली कामे ऐकणारा, पण वडिलांची लफडी कळू लागलेला, त्यांना काही सुनवावे असे वाटू लागलेला कोवळ्या वयाचा, तारुण्याच्या उंबरठ्यावरचा मुलगा गौतम जोगळेकरने बरोबर उभा केलेला आहे. हनुमान काळोखे (हेमू अधिकारी), सतीश आळेकर (डॉ. धायमोडे), नर्स शिंदे (चारुशीला साबळे) यांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित सांभाळल्या आहेत. अमोल पालेकर यानी उभा केलेला मुगुटराव शिंदे मात्र योग्य वाटत नाही. मुगुटरावाचा बेरकीपणा, धूर्तपणा, स्त्रीलंपटता आपल्याला अमोल पालेकर जे शब्द उच्चारतात किंवा कृती करतात त्यातून 'कळते.' पण चेहऱ्यावरच्या भावदर्शनातून मुगुटरावाच्या व्यक्तिमत्वाचा साक्षात्कार घडणे होत नाही. अमोल पालेकरांचा चेहरा आणि शब्दाची फेक एकसुरी वाटते, हिंदी चित्रपटातील भूमिकांपेक्षा फार वेगळी भूमिका म्हणून असे झाले असू शकेल.

चित्रपटाचे 'आक्रीत' हे नाव योग्य आहे. भयंकर धक्का देणारे या अर्थी 'आक्रीत' हा शब्द ग्रामीण बोलीत वापरण्यात येतो. तो कथेच्या ग्रामीण वातावरणाने सुसंगत वाटतो. अपत्य-प्राप्तीसाठी आणि गुप्त धनासाठी चाललेले 'बळी'चे निर्घृण सत्र हे एक आक्रीत. बाकी सगळ्यांना फाशीची शिक्षा झाल्यावरही मी सुटणारच, हे मुगुटरावाचे आत्मविश्वासाचे बोलणे हेही तितकेच 'आक्रीत.'

'आक्रीत' पाहिल्यावर काही विचार मनात येतात– जुने सावकार वगैरे जाऊन, नवे राजकारणी आता ग्रामीण विभागात अंमल गाजवू लागले आहेत. त्यानी तेथे नवे प्रश्न निर्माण केले आहेत. प्रामुख्याने विजय तेंडुलकर यांच्यामुळे या गोष्टीची आमच्या हिंदी आणि मराठी चित्रसृष्टीला चाहूल लागली आहे. 'मंथन', 'आक्रोश', 'सामना', 'सिंहासन' (अरुण साधू) या चित्रपटातून ही चाहूल व्यक्त होते, या चित्रपटामुळे ग्रामीण जीवनाचे थोडे-फार आकलन नागर व्यक्तीला होऊ लागले आहे. त्याचे कुतुहल चाळवले जाऊ लागले आहे. ग्रामीण जीवनाचे भाबडे चित्र नागर लोकांच्या मनातून पुसले जाऊ लागले आहे, तरीही ग्रामीण जीवनाचे चित्रपटात होणारे हे दर्शन अजून सर्वंकष, सखोल वाटत नाही. ते जर आहे येथेच थांबले तर हळहळू सांकेतिक म्हणून निर्जीव वाटू लागेल. म्हणून ते आणखी परिपूर्ण होण्यासाठी चित्रसृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. चित्रपट हे लोकशिक्षणाचे, बोळापर्यंत पोचण्याचे फार प्रभावी साधन आहे. सुदैवाने सुजाणपणे विचार करणारे लेखक, दिग्दर्शक, कलाकार आता चित्रसृष्टीत शिरू लागले आहेत. भोवतालच्या जीवनाचे वास्तव चित्र, संघर्ष चित्रपटात आणतील अशी आशा वाटू लागली आहे. त्यांनी कृपया 'शयनदृश्ये' दाखविण्यात अडकू नये. ग्रामीण भागात नव्याने उभी राहिलेली आंदोलने, कोकणातली खेडी ओस पडून, मुंबईची गर्दी वाढणे यासारखे विषय हाताळले तर बरे होईल.

□

# संप, टाळेबंदी, हिंसाचार आणि डॉ. दत्ता सामंत : पृष्ठ २ वरून

काही-एक संबंध नसताना डॉक्टराना त्यामध्ये विनाकारण गोवण्यात आलं. शिवाय, याही वेळी, या घटना घडल्या तेव्हा डॉक्टर युनियनच्या ऑफिसमध्ये होते. पण आमची वाढती संघटना काही जणाना खुपत असल्याने व त्यावेळच्या राजकीय परिस्थितीमुळे डॉक्टराना अडकवण्यात आलं.

'प्रिमिअर कारखान्यात आमच्या युनियनने दिलेले लढे तसे ताजे आहेत. पण त्यामागे, या कारखान्यातील कामगाराच्या गेल्या अनेक वर्षांच्या हलाखीची पूर्वकहाणी आहे 'प्रिमिअर'मध्ये सुरुवातीला बरीच वर्षं श्री. आर. जे. मेहता यांची युनियन होती. ती युनियन फोडण्यासाठी याच कारखान्यातले एक अधिकारी श्री. गलगली गेली दहा-पंधरा वर्षं प्रयत्न करत होते. भाडोत्री गुडांचा वापर तर सर्रास चालू होताच, शिवाय कामगाराचे पैसे कापणे, धमक्या देणे, प्रत्यक्ष मारहाण करणे हे प्रकारही चालू होते. यामुळे कामगाराबरोबरच श्री. मेहताही वैतागले कामगारानी डॉक्टराकडे धाव घेतली. १९७८ च्या जुलै महिन्यात घाटकोपरच्या समाज मंदिरात मिटींग झाली

'सुरुवातीला डॉक्टर नेतृत्व स्वीकारायला तयार नव्हते. 'मला यामध्ये गुतवू नका', असं ते कामगाराना सागत होते, पण कामगार ऐकायला तयार नव्हते त्यामुळे ३ ऑगस्ट, १९७८ या दिवशी 'प्रिमिअर'वर डॉक्टरांची पहिली गेट मिटींग झाली आणि कारखान्यातलं सगळं वातावरण बदलून गेलं साहजिकच कारखान्याचं व्यवस्थापन आणि श्री. गलगली चिडले. भांडण-मारामाऱ्या उकरून काढण्याचा प्रयत्न करू लागले.

'याचीच परिणती आमच्या युनियनचा एक कार्यकर्ता गुरूनाथ वारडे याचा खून होण्यामध्ये झाली. २८ नोव्हेंबर या दिवशी गुरूनाथचा कांजूरमार्ग रेल्वे स्टेशनजवळ खून झाला तेव्हा श्री. गलगली त्या ठिकाणी हजर होते, असं गुरूनाथने स्वतः आपल्या मृत्यूपूर्व जबानीमध्ये म्हटलं आहे.

'गुरुनाथचा खून झाल्याची वार्ता कारखान्यामध्ये वाऱ्यासारखी पसरली आणि सर्व कामगारामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटली. या संतापाच्या भरातच श्री. गलगली याच्या बाजूच्या काही कामगारांना मारहाणही झाली. कंपनीच्या मॅनेजमेंटने टाळेबदी जाहीर केली.

'पुढे शासनाच्या मध्यस्थीने टाळेबंदी मागे घेतली गेली आणि काम चालू झालं. सुमारे सात-आठ महिने कारखाना सुरळीत चालला. पण नंतर श्री. गलगलीनी पुन्हा खुसपटे काढायला सुरुवात केली. नियमित कामगारांऐवजी कारखान्यामध्ये कंत्राट पद्धतीने माणसं घेतली जाऊ लागली. श्री. गलगली युनियनच्या कामगारांना शिवीगाळ आणि मारहाणही करत असत त्यामुळे वातावरण पुन्हा तंग होऊ लागलं आम्ही युनियनतर्फे कंपनीच्या व्यवस्थापनाला कळवलं की, श्री. गलगली याना कंपनीमध्ये येण्यास व्यवस्थापनाने मनाई करावी, अन्यथा परिस्थिती स्फोटक होण्याची शक्यता आहे. पण व्यवस्थापनाने काहीही हालचाल केली नाही. एक दिवस श्री. गलगली गड घेऊनच कारखान्यात आले त्यांनी एका कामगाराच्या घोबाडीतही मारली. त्यामुळे इतर कामगार चिडले आणि गलगलीना मारायला धावले. तेव्हा गलगली धावत सुटले. त्यांच्यामागून येणाऱ्या कामगारावर त्यानी पिस्तुलातून गोळी झाडली. त्यामध्ये शंकर पाटील हा कामगार जखमी झाला. आम्ही पोलिसाकडे तक्रार केल्यावर पोलीस म्हणाले की, श्री. गलगली यानी गोळी मारली नसून कंपनीच्या गेटवरील सुरक्षा अधिकाऱ्याने मारली आहे.

'२६ मार्च १९८० ला हा सर्व प्रकार घडल्यानंतर २७ मार्चपासून कारखान्यामध्ये बेमुदत संप सुरू झाला. पुढे पाच-सहा महिन्यांनी समझोता होऊन कारखाना पुन्हा सुरू झाला

'या सर्व घटनांमध्ये डॉक्टर कुठेही प्रत्यक्ष हजर तर नव्हतेच, पण यापैकी एकाही हिंसक घटनेशी त्याचा कोणत्याही प्रकारे संबंध नव्हता. त्यामध्ये डॉक्टराना हेतुपुरस्सर गोवण्यात आलं. डॉक्टर हिंसाचाराला कधीही प्रोत्साहन देत नाहीत, उलट असा प्रकार घडत असल्यास त्याला पायबंद घालण्याचाच प्रयत्न करतात. आपल्या मागण्या पदरात पडेपर्यंत आदोलन ताणून धरण्याचं तंत्र ते वापरतात. आणि त्यासाठी मोजावी लागणारी किंमत वाटाघाटीतील कराराद्वारे कामगाराना पुन्हा मिळवूनही देतात. प्रीमिअरचंच उदाहरण या संदर्भात लक्षात घेण्यासारखं आहे. कारखाना सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यानी मध्यस्थी केली त्यावेळी सर्व कामगाराना मिळून एकूण दोन कोटी पंधरा लाख रुपयाची वेतन वाढ मिळाली. पण नंतर डॉक्टरांनी कंपनीशी करार करताना आणखी चाळीस लाख रुपये पदरात पाडून घेतले, शिवाय मॅनेजमेंटने कामावरून काढून टाकलेल्या ३३ कामगारांना पुन्हा कामावर घेण्यात आलं'.

## शंभरातले दहा गरिबांसाठी ठेव !

सौ. विनितावाईंशी चर्चा चालू असतानाच डॉ. सामंताच्या वृद्ध मातोश्री खोलीमध्ये आल्या. आपल्या मुलाबद्दलच्या भावना व्यक्त करताना त्या म्हणाल्या, 'दत्ता अगदी चागलं काम करतो आहे. आमचे वाड-वडीलही असंच गरिबासाठी काम करत गेले. दत्ताला लहानपणापासूनच गरिबाविषयी कळवळा आहे. घरात देवापुढे ठेवलेला नैवेद्य तो कोणाच्याही नकळत गरिबांना वाटून टाकत असे. इतकंच नव्हे तर स्वतःच्या अगावरचा शर्टही तो भोवतालच्या गरीब मुलाना देऊन टाकत असे आणि त्या मुलाच्या अंगावर दत्ताचा शर्ट पाहिल्यावरच आमच्या हे लक्षात येत असे.

'दत्ता डॉक्टर झाला तेव्हा मी त्याला एकच सागितलं, तू रोज शंभर रुपये मिळवलेस तर त्यातले दहा गरिबांसाठी ठेव. आज तो जे काम करतो आहे ते खरोखरच उत्तम आहे. दुःख मात्र एकाच गोष्टीचं होतं, आम्ही इथे चागलं अन्न खात असतो आणि दत्ता मात्र कुठे तरी वणवण करत असतो.'

□

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

डॉ. सामंत कोणताही संप ' Direct Method ' ने लढवतात. लवाद, मध्यस्थ, कोर्ट अशा भानगडीमध्ये पडत नाहीत. एका अर्थी व्यवस्थापन व युनियन यांची सरळ सरळ शक्तिपरीक्षाच डॉ. सामंतांच्या लढ्यांमध्ये होत असते. त्यामुळे काही वेळा अशी शंका निर्माण होते की, सध्याच्या न्यायव्यवस्थेवर आणि इतर सामाजिक चौकटींवर त्यांचा विश्वासच नाही की काय? या संदर्भात श्री.पाटील यांना विचारलं तेव्हा ते म्हणाले, ' असा न्यायसंस्थेवर, सामाजिक चौकटीवर डॉक्टरांचा विश्वास नाही, असं काही मला वाटत नाही. पण अडचण अशी असते की, न्यायालयासमोर सादर केल्या जाणाऱ्या कागदपत्राच्या आधारेच मुख्यत्वे न्यायदानाचं काम चालतं आणि ही कागदपत्रं कंपनीचं व्यवस्थापन तयार करत असतं. त्यामुळे ती फसवी असतात. अशा फसव्या कागदपत्रांच्या आधारे न्यायालयं तरी कितपत न्याय देऊ शकणार ? त्यामुळे डॉक्टरांचा न्यायसंस्थेवर विश्वास नाही, असं नाही; त्यांचा कंपनीच्या ' बॅलन्स शीट 'वर विश्वास नाही. ' तसंच न्याय संस्थांच्या सध्याच्या प्रक्रियेत निर्णय मिळण्यासाठी लागणारा भयानक विलंब, हेही या ' Direct Method 'चं आणखी एक कारण आहे.

## कामगार खाणीतले व देवळातलेही

डॉ. दत्ता सामंत यांच्या मुख्य संघटनेचं नाव ' असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स ' असं आहे. त्याच बरोबर त्यांनी इतर कामगारांसाठी 'महाराष्ट्र जनरल वर्कर्स युनियन', गिरणी कामगारांसाठी 'सिल्क मजदूर सभा' आणि खाण-कामगारांसाठी 'खाण-कामगार युनियन' या अन्य तीन संघटना स्थापन केल्या आहेत.

महाराष्ट्रात त्यांच्या संघटनेची सुमारे तीन ते चार हजार युनिटस असून त्यामधील सुमारे आठ-दहा लाख कामगार डॉ. सामंतांचे कट्टर अनुयायी आहेत.

खाण-कामगारांप्रमाणेच डॉ. सामंतांनी हॉटेल-कामगार, तबेला-कामगार आणि मुंबईच्या जैन देवळांमधल्या पुजाऱ्यांच्या संघटना उभ्या केल्या आहेत. या देवळांचे एकूण सुमारे तीनशे ते चारशे पुजारी या संघटनेत आहेत.

' डॉक्टर आले की कंपन्या बंद पडतात, असा ओरडा आमच्याविरुद्ध केला जातो. पण तुम्ही जर आकडेवारी तपासून पाहिली तर सध्या मुंबईच्या औद्योगिक क्षेत्रात एकूण १३० लहान-मोठ्या फॅक्टऱ्या बंद आहेत आणि त्यापैकी फक्त १३ ठिकाणी संप चालू आहे. कित्येक फॅक्टऱ्यांच्या मॅनेजमेंटनी, त्यांच्या कामगारांनी डॉक्टरांचं नेतृत्व स्वीकारल्याबद्दलच टाळेबंदी ठोकली आहे. आंदोलनं, हिंसाचार पुढेच राहिला ! काही मॅनेजमेंटनी तर त्यांच्या कामगाराना असं स्पष्ट सांगितलं आहे की, दुसरी कुठलीही युनियन चालेल, पण त्या दत्ता सामंतांना आणू नका. '

श्री. पाटील यानी डॉ. सामंतांच्या चळवळीतील घडामोडींचा आढावा सविस्तरपणे घेतला. काही ठिकाणी स्वतःचं मतही मोकळेपणानं मांडलं. आमची मुलाखत चालू असतांना भोवताली कामगारांचं कोंडाळं होतंच. कारखाना सुरू करायचा की नाही, असं विचारणारे फोनही येत होते. त्या सगळ्यांना तोंड देत श्री. पाटील बोलत होते.

युनियनचं कार्यालयही तसं छोटंसंच आहे. एक मोठी खोली आणि एक डॉ. सामंतांची छोटी केबिन. मोठ्या खोलीत दोन लोखंडी कपाटं, पाच-सहा टेबलं-खुर्च्या आणि माणसांची गर्दी. विविध संप-लढ्याच्या वेळची पोस्टरे भिंतीवर चिकटवलेली. दोन फोन. तीन-चार क्लार्क. कागदपत्रं आणि फायलींचे ढिगारे. डॉ. सामंतांसारख्या कामगार नेत्याचं ऑफिस एवढं लहान असेल असं वाटलं नव्हतं. खरं तर आता ते अपुरंही पडत आहे.

¤

ही झाली डॉ. दत्ता सामंत यांच्या चळवळीची बाजू. त्यांच्या पत्नी, त्यांचे कार्यकर्ते यांनी मांडलेली. पण केवळ त्यावरून सध्या मुंबईमध्ये दबदबा निर्माण करून राहिलेल्या या कामगार नेत्याचं संपूर्ण चित्र उभं राहू शकणार नाही. म्हणून मुंबईतले श्री. भाई भोसले, दत्ताजी साळवी, दत्ताजी सावंत, एस. वाय. कोल्हटकर इत्यादी कामगार-नेत्यांच्याही भेटी घेतल्या. डॉ. सामंत आणि मुंबईतल्या सध्याच्या कामगार जगताविषयी या अनुभवी मंडळींनी काही मतं व्यक्त केली, काही अंदाजही मांडले. पण त्याविषयी पुढील अंकी !

–सतीश कामत

¤

# इतर कामगारनेत्यांच्या मुलाखती...पुढील अंकी